(Registered under Act XXV of 1867.)

THE POEMS

OF

VÂMANA PAṆDITA.

(THE GREAT MARÂTHÎ POET OF THE MAHÂRÂSHTRA.

"A true poem is a gallery of pictures"—*SIR JOHN LUBBOCK.*

VOL. I.

EDITED WITH

CRITICAL AND EXPLANATORY NOTES

BY

VÂMANA DÂJÎ OKA.

PRINTED AND PUBLISHED

BY

TUKÂRÂM JÂVAJÎ

PROPRIETOR OF JÂVAJÎ DÂDÂJÎ'S "NIRṆAYA-SÂGARA" PRESS.

BOMBAY.

1894.

Price 3½ Rupees.

महाराष्ट्रकविवर्यवामनपंडितकृत

कवितासंग्रह.

जैसा चंडांशु सतेज व्योमीं । तैसाचि केवळ वामनस्वामी ।
ज्याची श्लोकरचना ये भूमीं । भूमंडळावरी अपूर्व गा. ॥
श्रीधर.

भाग पहिला.

हा

वामन दाजी ओक

यांनीं अनेक हस्तलिखित प्रतींच्या आधारें शुद्ध करून, अर्थनिर्णायक व अवांतर माहितीच्या टीपा देऊन व परिशिष्टें जोडून तयार केला;

आणि

मुंबईत जावजी दादाजी यांच्या "निर्णयसागर" छापखान्याचे मालक तुकाराम जावजी यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

१८९४.

किंमत ३॥ रुपये.

महाराष्ट्र भाषेचें व कवितेचें

आस्थापूर्वक अध्ययन

करूं पाहणाऱ्या सज्जनांस

हा ग्रंथ

सप्रेम अर्पण करतों.

'काव्यसंग्रह' कार.

अनुक्रमणिका.

अनुक्रमांक.	काव्यनाम.	पृष्ठांक.	ग्रंथसंख्या.
	१. रामायणांतील आख्यानें.		
१	रामजन्म	१–५	४८
२	अहल्योद्धार	५–१०	६५
३	सीतास्वयंवर	१०–२३	११५
४	भरतभाव	२३–३१	९२
५	लोपामुद्रासंवाद	३१–३४	३४
	२. महाभारतांतील आख्यानें.		
६	विराटपर्व–अध्याय पहिला	३५–४२	९३
	,, ,, दुसरा	४२–५५	१५९
	,, ,, तिसरा	५६–८०	२६३
	,, ,, चौथा	८०–८५	६२
	,, ,, पांचवा	८५–९९	१३८
	,, ,, सहावा	९९–११८	२०१
	,, ,, सातवा	११८–१३९	२०९
	,, ,, आठवा	१३९–१५६	१३४
७	स्थालीपाक	१५६–१५७	७
८	भीष्मयुद्ध (भीष्मप्रतिज्ञा)	१५७–१६०	३१
९	भीष्मशरपंजर	१६०–१६४	२९
१०	जयद्रथवध	१६४–१६७	२७
११	पार्थभाग्य (अर्जुनभाग्य)	१६८–१६९	१०
१२	शुकरंभासंवाद	१६९–१७१	११
१३	दंपत्यचरित्र (अश्वस्नान)	१७१–१७३	१६
	३. श्रीमद्भागवतांतील आख्यानें.		
१४	शुकाष्टक	१७३–१७५	१२
१५	दशावतारचरित्र	१७५–१७६	१०

अनुक्रमांक.	काव्यनाम.	पृष्ठांक.	ग्रंथसंख्या.
१६	ध्यानमाळा (विष्णुध्यान)	१७६–१७८	१६
१७	विष्णुध्यान (ध्यानसवाया)	१७९–१८१	१४
१८	भूगोलवर्णन	१८२–१८८	३०
१९	नामसुधा–अध्याय पहिला–चरण पहिला	१८८–१९५	५३
	,, ,, ,, ,, दुसरा	१९५–१९८	२०
	,, ,, ,, ,, तिसरा	१९९–२०२	३३
	,, ,, ,, ,, चौथा	२०२–३०५	२५
	,, ,, दुसरा ,, पहिला	२०५–२११	४९
	,, ,, ,, ,, दुसरा	२११–२१७	६९
	,, ,, ,, ,, तिसरा	२१७–२२२	४८
	,, ,, ,, ,, चौथा	२२२–२२९	६२
	,, ,, तिसरा ,, पहिला	२२९–२३२	२८
	,, ,, ,, ,, दुसरा	२३२–२३७	६२
	,, ,, ,, ,, तिसरा	२३७–२४२	५२
	,, ,, ,, ,, चौथा	२४२–२४५	३२
२०	नृहरिदर्पण (प्रऱ्हादचरित्र)	२४५–२६२	१५४
२१	गजेंद्रमोक्ष	२६३–२६६	१२
२२	वामनचरित्र (प्रथम)	२६६–२७०	४१
२३	,, (द्वितीय)	२७०–२७१	४
२४	भागवतरामायण(संकलितरामायण)अध्याय पहिला	२७२–२७६	३२
	,, ,, ,, दुसरा	२७६–२८०	३१
	,, ,, ,, तिसरा	२८१–२८४	३६
२५	कृष्णजन्म	२८५–२८९	२८
२६	मृत्तिकाभक्षण	२८९–२९१	२२
२७	बालक्रीडा (प्रथम)	२९२–३०३	१०३
२८	,, (द्वितीय)	३०३–३०४	७
२९	गोरसहरण	३०५–३०७	२१
३०	उखळबंधन	३०७–३१३	५४

अनुक्रमांक.	काव्यनाम.	पृष्ठांक.	ग्रंथसंख्या.
३१	वनसुधा—अध्याय पहिला	३१३–३१८	३६
	,, ,, दुसरा	३१८–३१९	१२
	,, ,, तिसरा	३१९–३२३	२६
	,, ,, चौथा	३२३–३२७	३३
३२	ब्रह्मस्तुति--चरण पहिला	३२८–३४७	१९४
	,, ,, दुसरा	३४७–३८६	४१२
	,, ,, तिसरा	३८६–४०४	१६६
३३	हरिविलास (कालियामर्दन)—अध्याय पहिला....	४०५–४११	४९
	,, ,, ,, दुसरा	४११–४१८	६३
	,, ,, ,, तिसरा....	४१८–४२२	४५
	,, ,, ,, चौथा	४२२–४२७	५२
	,, ,, ,, पांचवा....	४२७–४३१	४८
	,, ,, ,, सहावा....	४३२–४३५	४१
	,, ,, ,, सातवा....	४३५–४३९	३९
	,, ,, ,, आठवा....	४३९–४४२	३८
	,, ,, ,, नववा	४४२–४४४	१९
३४	वेणुसुधा—प्रसंग पहिला	४४४–४४८	३८
	,, ,, दुसरा	४४८–४५२	२७
	,, ,, तिसरा	४५२–४५७	४५
३५	कात्यायनीव्रत (गोपीवस्त्रहरण) (प्रथम)	४५७–४६६	९४
३६	,, ,, (द्वितीय)	४६७–४६९	१७
३७	यज्ञपत्न्याख्यान (ऋषिपत्न्याख्यान)	४७०–४७९	७०
३८	रासक्रीडा	४७९–५०८	१८४
३९	गोपीगीत	५०८–५१३	५१
४०	कंसवध (प्रथम)	५१३–५१६	२४
४१	,, (द्वितीय)	५१७–५१८	४
४२	द्वारकाविजय—सर्ग पहिला—विवाहविजय	५१८–५२८	५६
	,, ,, दुसरा—हरिमंदिरविजय	५२९–५३४	५४

अनुक्रमांक.	काव्यनाम.	पृष्ठांक.	ग्रंथसंख्या.
	द्वारकाविजय—सर्ग तिसरा—नारदातिथ्यविजय	५३४—५३९	३६
	,, ,, चवथा—लीलाविनोदविजय	५३९—५४८	९२
	,, ,, पांचवा—मुक्तिप्रदविजय	५४८—५५१	३४
४३	रुक्मिणीपत्रिका	५५१—५५३	१६
४४	रुक्मिणीविलास	५५४—५७३	१६०
४५	मुकुंदविलास (जरासंधवध)....	५७३—५८६	६७

एकंदर ग्रंथसंख्या १२७७.

परिशिष्टांची अनुक्रमणिका.

१ अधिक पद्यें ... ... पृ० १—५

२ पाठभेद ... ... पृ० ६—३७

३ अधिक टीपा ... ... पृ० ३८—६५

४ शुद्धिपत्र ... ... पृ० ६६—९१

सूचनाः—यांतील पहिलीं दोन परिशिष्टें तयार करण्याचे कामीं रा० मोरो गणेश लोंढे, गोविंद विष्णु श्रीखंडे, वासुदेव दत्तंभट गुळवणी व 'काव्यसंग्रह'हितेच्छु यांनीं व पुढील दोन परिशिष्टें तयार करण्याचे कामीं रा० मोरो गणेश लोंढे व दत्तात्रय घनश्याम सबनीस, वकील, यांनीं आमच्यासाठीं फार श्रम घेतले व आपला अमोलिक वेळ खर्ची घातला, म्हणून आम्ही त्यांचे फार फार आभार मानतों. (२) या भागांतील पहिल्या शहाण्णव पानांवरील टीपा कै० **ज० बा० मोडक** यांच्या हातच्या आहेत.

'काव्यसंग्रह'कार.

वामनपंडितकृत स्फुट काव्यें.

१. रामायणांतील आख्यानें.

रामजन्म.[1]

(श्लोक.)

हृदयिं आठवुनी पद[2]सारसा, वदतसें अवतारकथारसा. ।
सुरस जो मुनि वाल्मिक गातसे सकळ रामकथा, तुम्हि गा तसे. ॥ १
प्रगट रामचरित्र कलौ[3] करी, जितचि मुक्ति तया अजि लोकरी; ।
म्हणुनि गा रघुनायक राम हा, तदनुरूप विलास करा महा. ॥ २
शुक्लपक्ष, मधुमास[4], वसंतीं, रामजन्म, नवमी तिथि, संतीं ।
वर्णिला. वदति अर्थहि लोकीं. त्या कथा निपुण तूं अवलोकीं. ॥ ३
योगीं[5] अशा जन्म न, राघवाचा तो योग आला. अशि गोष्टि वाचा. ।
काळांत ही उत्तम जन्मकाळ श्रीरामजन्मीं करिती सुकाळ. ॥ ४
जनीं मनीं भक्तिकळा समृद्धि[6] केल्या, जशा चंद्रकळासमृद्धि[7]; ।
वाढे सुखें चंद्र मनोभिमानी[8] तो शुक्लपक्षीं जन जन्म मानी. ॥ ५
गोड रामरस केवळ संतीं सेविला प्रथम मास वसंतीं; ।
त्या रसें मधुर तो मधु[9] झाला; कीं जयांत अजि जन्म अजाला[10]. ॥ ६
ऋतूंचा धनी सूर्य काळाभिमानी, वसंतासि जो उत्तमत्वेंचि मानी. ।
वडील[11] स्ववंशीं प्रभूजन्मकाळीं, तया दाखवी उत्सवाच्या सुकाळीं. ॥ ७
रामावतारार्थ जगीं भुकेल्या भक्ती जनीं त्या श्रवणादि[12] केल्या. ।
नवप्रकारें भजती अजाला. जन्म प्रभूचा नवमीस झाला. ॥ ८

नवदिन नवरात्रीं भक्ति लोकीं करा हो !
नवविध निजभक्ती सूचवी किंकरा हो ! ।

---

१. हें प्रकरण रामायणाच्या बालकांडांत आहे. २. पदकमलास. ३. कलियुगीं. ४. चैत्रमास. ५. कोणाच्याच जन्मकाली असा योग यावयाचा नाहीं अशा योगावर रामाचा जन्म झाला, असा भावार्थ. ६. पुष्कळ. ७. वृद्धि. ८. मनाचा अभिमानी. (मनाची देवता चंद्र आहे.) ९. मधु (चैत्र) हें नांव पावला, असा भावार्थ. १०. जन्मरहित रामाला. ११. सूर्य. १२. श्रवण, कीर्तन, पादसेवन, स्मरण, अर्चन, वंदन, दास्य, सख्य, आत्मनिवेदन, अशा नवविधा भक्ति.

नवरसनवमीस स्वामिचा जन्म झाला
नवरस नव अर्पा प्रीतिनें त्या अजाला. ॥ ९
नवविधा नवरात्रि महाधनें, गुणकथा श्रवणादिक साधनें ।
करुनि शेवटिं आत्मनिवेदना, भजति संत अहो ! रघुनंदना. ॥ १०
चित्त जो उपसमीपचि वासीं राघवीं करिल, तो उपवासी. ।
भक्तिवांचुनि दुज्या विषयातें सेवितां, सुख गमे विष यातें. ॥ ११
अयोध्येमधें लोक ऐसेचि सारे, विनाराम जे नेणती हे पसारे, ।
तयाचेंच गाती असें गीत नाना. न ज्या कीर्तनीं अन्य वार्ता तनाना. ॥ १२
टळटळित दुपारीं जन्मला रामराणा,
म्हणुनि सकळ गाती, ठाउकें हें पुराणा. ।
दशरथगृहमाथां सूर्य आला अहो ! तो
कुलतिलक पहाया. तोचि मध्यान्ह होतो. ॥ १३
त्या सुखा रवि अखंड अपारा वाटतें स्मरतसेल दुपारा. ।
स्तब्ध यास्तव असेच घडी हो ! कीं स्मरोनि सुख तें उघडी हो ! ॥ १४
स्वयें अंतरिक्षींहुनी लेंकुरातें अहो भास्करें लावियेलें करातें. ।
'झणी उष्ण लागे' म्हणे 'राघवातें'. दुरूनीच दावी अशा लाघवातें. ॥ १५
सूर्य यास्तव असे गगनींच. हें विचारुनि नये मग नीचें. ।
सावली करुनि आडचि पाहे. उष्मशंकित करी स्वकृपा हे. ॥ १६
'छाया' म्हणे 'बाइल हे मला जे घेऊनियां हे करहेम लाजे; ।
जातांचि ती अनवधान मातं देखोनि सोडील रघूत्तमातें.' ॥ १७
आणिखी प्रगट कौतुकराती वाल्मिकिप्रभृति येथ करीती. ।
मेषराशिपदवी बरवी हो ! घे तई तदवलंब रवी हो ! ॥ १८

---

१. नवरसांनी युक्त अशा नवमीस नवविधाभक्ति दाखविण्यास्तव, नवमीस जन्म घेतला, असा भावार्थ. २. नवविध भक्तीतील एक. ३. उप म्ह० समीप. ४. राहण्याविषयीं. (येथें उपवासी या शब्दाचा अवयवार्थ सांगितला आहे.) ५. मायारूपी जग. ६. जन्मकाळच्या सुखास. ७. निरंतर. ८. सूर्य मध्यान्हास आला म्हणजे एक मुहूर्तमात्र विश्रांति घेतो, अशी शास्त्रोक्ति आहे; त्यावर ही उत्प्रेक्षा. ९. किरणातें. १०. विचार करून. ११. खालीं. १२ रामाला ऊन लागेल अशी शंका मनांत धरून १३. सूर्यस्त्री. (वरील श्लोकांत सांगितलेली.) १४. निर्बंध. १५. वाल्मिक आदिकरून. १६. त्या राशीचें अवलंबन. मेषराशीस सूर्य होता, असा भावार्थ.

पुत्रउत्सव जयास विराजे, उत्तमासनिंच बैसवि राजे. ।
सूर्य[1] ये परम उच्चपदातें. सेविती ग्रह समस्त पेदातें. ॥ १९
प्रगटला प्रभु ज्या विमैलक्षणीं, ऋषिवरां सुख दे शुभलक्षणी. ।
म्हणति, 'मारुनियां पुरुषाद[5] हा करिल शुभ्र यशें स्व दिशा दहा.' ॥ २०
दशरथ स्वसुतानन पाहतो. निजमुखें सुखि होउनि राहतो. ।
जगपटीं सुखतंतु विराजतो. प्रगटला नयनीं रघुराज तो. ॥ २१
रवीच्या करें श्यामता ये घनासी. तयांचाच संताप तो मेघ नासी. ।
तया सूर्यवंशीं घनश्याम राम करी काळवैवस्वताचा विराम. ॥ २२
जसें चातकाला घनाचेंच पाणी, स्वभक्तां तसा राम कोदंडपाणी. ।
म्हणूनी घनश्याम हा राम झाला, जया कारणें जन्म वेणें अजाला. ॥ २३
धुंग धुंग रवें[13] तुंगें[14] मृदंगीं. संग संग नटती स्वहृदंगीं[15]. ।
अंगें[16]भंग बहु दावित [17]रंगीं. रामरंग सुखसिंधुतरंगीं. ॥ २४
दुमदुम ध्वनि वाजति दुंदुभी. सहित रावण रॅक्षसवृंद[18] भी. ।
सुख नरां सकळां अमरां महा. प्रगटतांचि रघूत्तम राम हा. ॥ २५
रविकुळांत रघूत्तम राम हा उपजतां सुख दे अमरां महा. ।
सकळ पूर्ण मनोरथ मेदिनी करि तयांत अहो ! प्रथमे दिनीं. ॥ २६
ब्रह्म पूर्णगुणवैभव लोकीं जन्मतां, मग धरा अवलोकी. ।
योग्य लेंकिसें गमे नवरा हो ! जो मनीं म्हणति मानव राहो. ॥ २७
तो न्हाणितां राघव दानवारी, हस्तांत कन्यार्पणदानवारी ।
श्रीभूमि संकल्प करूनि घाली. विवाह तात्काळ करूं निघाली. ॥ २८
आणीक आनंद अपार झाला कीं, 'लाधलें पार्थिवियां रजाला.' ।
ऐशा सुखें राघवजन्मकाळीं जनासि घाली धरणी सुकाळीं. ॥ २९
असें सर्वभूतांसही वेगळाले दिले सोहळे. दोष त्यांचे गळाले. ।
जळें न्हाणितां राम कोदंडपाणी, 'महादोष गेले' म्हणे आजि पाणी ॥ ३०

---

१. उच्चस्थानीं. (सूर्याचें उच्चस्थान मेषराशी आहे.) २. रामपदातें. ३. सुमुहूर्ती. ४. राम. ५. नरभक्षक. (राक्षस.) ६. पुत्रमुख. ७. जगरूप वस्त्रांत. ८. काळेपणा. पाण्यामुळें, असा भावार्थ. ९. मेघास. १०. सूर्याचा. ११. सूर्यपुत्र यमाचा. १२. अंत. घन सूर्यसंतापनाश करतो, तसा हा घनश्याम सूर्यपुत्राचा नाश करी, असा भावार्थ. १३. नाद. १४. मोठा. १५. आपल्या हृदयरूप अंगांत. १६. हावभाव. १७. नृत्यांत. १८. राक्षससमुदाय. १९. पृथ्वीची कन्या सीता तीस. २०. दानवांचा शत्रु राम. २१. कन्येच्या अर्पणाचें दानोदक. २२. सुपिकांत.

तारील पाषाण असें जळाला वाटे. म्हणे 'दोष जळो' जळाला. ।
तेव्हां तरी तारकशक्ति राम देईल आम्हांसि मनोभिराम.' ॥ ३१
देखूनियां जन्म असा अजाला, आनंद मोठा उदकासि झाला. ।
ऐसाचि आनंद समस्तभूतीं श्रीराघवाची करि हो विभूती. ॥ ३२
भयें राक्षसांच्या सदा जो विझाला, स्वयें अग्नि तो दीप्त कुंडांत झाला. ।
म्हणे अग्नि, 'आला मला पाळणार, यया ऊपरी यज्ञही चालणार.' ॥ ३३
'स्वसुत राघवदास्य सुखें करी; विभव हें अवलोकिन लौकरी.' ।
पवन घे अशि रामसुखें धणी, प्रगटतां कपिमारुतिचा धनी. ॥ ३४
पुत्र राम पर मानव साचा, व्यर्थ अन्य परमा नवसांचा. ।
पुत्र वास चुकवी नरकाचा. दुर्गती न चुकवी नर कांचा. ॥ ३५
रामभक्तसुत मानव लोकीं तत्पिता न नरका अवलोकी. ।
गोष्टि हे अलिकडेच वदावी, त्यासि तो स्वपद राघव दावी. ॥ ३६
वंशजांत करि राघवसेवा, कीं कथा करिति त्यांत वसे वा. ।
वंश धन्य करि सर्व अहो! तो, एकही जरि असा नर होतो. ॥ ३७
वंश धन्य करि राम धरित्री आर्पितां हृदय रामचरित्रीं. ।
पाडिली नगरि ओसें[11] यमाची रामकीर्ति अशि या नियमाची. ॥ ३८
वायूस आनंद अपार झाला कीं, 'याचिया पायिंचिया रजाला ।
लाधेल, सेवील रघूत्तमातें, स्वपुत्र[12] तो धन्य करील मातें.' ॥ ३९
श्रीरामजन्मसमयीं जन 'राम राम' प्रेमें म्हणे. ध्वनि उठे हृदयाभिराम. ।
आकाश तो निरवकाश सुखेंचि झाला, कीं लोकशब्दकृततापे[13] तयीं विझाला.॥ ४०
एक शब्दगुण त्यासहि वाणी. रामनाम न वदे जनवाणी. ।
खेद हा परम जो गगनासी. रामशब्द सहजें मग त्यासी. ॥ ४१
सुमित्रासुताच्या अहो! अग्रजाला जगीं जन्म झाला परेशा अजाला. ।
असा सर्व भूतांसि आनंद झाला. अपेक्षी अहल्या पदांच्या रजाला. ॥ ४२
ऋषि समस्तहि राघवकीर्तनीं चरित गाति, निरूपिति, नर्तनीं. ।
बहु सुखी ऋषिवाल्मिकि वै[16] खरी करुनि दाखविली निज वैखरी[17]. ॥ ४३ ॥

---

१. पाण्यांत तरण्याची शक्ति. २. मनाला आल्हाद करणारा. ३. मूर्ति. ४. वायु. ५. परिपूर्ण समाधान. ६. श्रेष्ठ. ७. कच्चा. ८. ज्याचा पुत्र रामभक्त असा. ९. वंशांतील पुरुषांत. १०. कथेंत. ११. ओसाड. १२. मारुति. १३. वाचिक पातकें. १४. आकाश. १५ कमताई. १६. निश्चयें-करून. १७. वाणी.

विश्वामित्र, स्वामिच्या जन्मकाळीं, नाचों लागे, त्या सुखाच्या सुकाळीं. ।
कीं, 'मी आतां आणिन स्वाश्रमातें, नाशील श्रीराम माझ्या श्रमातें. ॥ ४४

भविष्यातें पाहे, करुनि हृदयीं ध्यान, मुनि तो.
सुखें नाचों लागे, त्वरित रघुनाथा नमुनि, तो. ।
स्ववंशीं रामाचें गुणचरित ऐसें समजला.
म्हणे, 'हें हो! भाग्य त्रिभुवनवरिष्ठास मजला. ॥ ४५

श्रीमद्भागवतांत, आणि इतर ग्रंथीं, महाभारतीं,
श्रीमद्रामकथा निरूपिलि बरी. व्यासाचिही भारती. ।
गातां तेचि शुकादि गोत्रज बळी मध्यें वसिष्ठान्वयीं,
माझा वामन राम गाइल तयीं लक्षूनि सर्वान्वयी. ॥ ४६

उपाध्याय रामास मानें मुनी हो! स्ववंशीं स्मरे भक्त जो ने मुनी हो! ।
सुखें राम सेवी अशा गोत्रजाला. स्मरोनी ऋषीमात्र संतुष्ट झाला. ॥ ४७
इत्यादि रामचरितीं रस हे अपार. श्रीव्यासवाल्मिकिहि नेणति अंतपार. ।
हा ग्रंथ वामननिरूपित राघवाचा वाचा. हरील मग ते सकळाघ वाचा. ॥४८

अहल्योद्धार.

(श्लोक.)

करुनि नमन सीतावल्लभाच्या पदांतें,
कथिन पदरजाच्या कीर्तिच्या संपदांतें; ।
जड शिळ तनु झाली जे अहल्यामतीची,
निज चरणरजें ते उद्धरू राम तीची. ॥ १

सुरेंद्रं अहल्यासतीशीं रमाया, तिला दाविली गौतमाकार माया. ।
प्रिया आत्मयाची तसा भाव दावी. अहंकार बुद्धीस ते पैं वदावी. ॥ २
अहंकार इंद्र प्रियात्मत्व दावी; रमें बुद्धिशीं, ते अहल्या वदावी; ।
शिळा देह; जो मी गमे ज्या मतीतें; जगीं उद्धरू तो पदें राम तीतें. ॥३
चिच्छक्ति चित्स्फुरण निर्मळ ज्या मतीतें, आत्मा सदा प्रिय गमे सुखधाम तीतें. ।
ते आत्मता तशिच मानुनि मीपणातें संपादिते तनु शिळापण आपणातें. ॥ ४
अहल्या तशी, स्वप्रियाकार माया न जाणोनि, गेली पराशीं रमाया. ।
घडे या निमित्तें शिळाशाप तीतें पती मानितां त्या शचीच्या पतीतें. ॥ ५

---

१. आपल्या वंशीं. २. वाणी. ३. वसिष्ठाच्या वंशांत. ४. सर्वपाप. ५. हें प्रकरण रामायणाच्या बालकांडांत आहे. ६. आपली. ७. ज्ञानशक्ति. ८. ज्ञानस्फुरण.

गौतमें, करुनि कोपतीव्रता, शापिली निजसती पतिव्रता. ।
पाववूनि अधमाधमा गती, मानिली निरपराध मागुती. ॥ ६

शापूनि होय अनुतप्त मुनी सतीतें कीं, 'ठावुकें न सुरकृत्रिम जीस, तीतें ।
म्यां शापिलें, तरि जडात्मकता मतीची नाशी रघूत्तम तशी हरु राम तीची. ॥ ७

सागरीं दगड राघव तारी. या शिळेसि विभु तो अवतारी ।
उद्धरी. जिस जड भ्रम तीतें राम उद्धरि जसा कुमतीतें.' ॥ ८

कानीं असें वचन आधकतां पतीचें, झालें अचेतन शिळामय रूप तीचें. ।
[1]नासा, स्तन, श्रवण, केशहि वेगळाले देखूनि, [2]बाष्प मुनिच्या नयनीं गळाले. ॥ ९

अवयव अवघेही हे यथापूर्व सारे,
कुरळ पसरले ते [3]मूर्धजांचे पसारे. ।
करितिल वनिं चूर्ण श्वापदांचेच [4]पेटे.
म्हणुनि मुनिमनीं हा शोकवन्हीच पेटे. ॥ १०

देखतां मुनि तिला, तनु कंपा पावली; उपजली अनुकंपा; ।
शोक होउनि अपार सतीचा वेचवी तप कृपारस तीचा. ॥ ११

'विनावृक्ष येथें नसो जीवजाती. गज व्याघ्र निर्जीव होऊनी जाती. ।
हिला पाय लागो [5]मृगांकाननाचा. घडो [6]जंगमा त्याग तो काननाचा;' ॥ १२

वचन हें निघतां ऋषिआननीं, वसति जंगम जीव न काननीं. ।
विपिनशासन ये रिति नेमुनी, निजतनू [9]बदरीप्रति ने मुनी. ॥ १३

साठी सहस्रांवरुषीं अजाला वंशीं रवीच्या मग जन्म झाला. ।
तो राम सीतावरणप्रसंगें ये त्या वना कौशिकविप्रसंगें. ॥ १४

तो स्थावराविण न देखत जंगमातें. सर्वज्ञ रामहि वदे, 'अजि सांग मातें. ।
हांसे, म्हणे मुनि, '[10]सुरां विधिपूर्वकां ही तूं निर्मिता; विदित से तुज सर्व कांहीं. ॥ १५

सर्वज्ञ राम अजि लौकिक भाव दावी, म्यां कां तयाप्रति न पूर्व कथा, वदावी ?' ।
सांगे म्हणोनि ऋषिवर्य [11]मुनींद्ररामावार्ता दिवाकरकुलांबुधिचंद्र रामा. ॥ १६

कथि कथा [12]कुशिकान्वयनंदन. श्रवण तें करितो रघुनंदन. ।
सकळ पाहति गौतमआश्रमा नयनिं देखति विप्रवधूश्रमा. ॥ १७

---

१. नाक. २. अश्रु. ३. केशांचे. ४. वर्ग. ५. चंद्रवदन रामाचा ६. जनावरास. ७. अरण्याचा. ८. अरण्यास आज्ञा ९. बदरिकाश्रमाप्रत. १०. ब्रह्मदेवादिदेवांना. ११. अहल्येची वार्ता. १२. कुशिकवंशाला आनंद देणारा विश्वामित्र.

शिळा सारी नारी; हसित अधरीं मंद मिरवे;
मुखीं चंद्रज्योत्स्ना; अवयव यथापूर्व बरवे; ।
ऋषी विश्वामित्राप्रति सकळ देखूनि पुसती,
'मिषें कोण्या हांसे' म्हणति 'वद जी! गौतमसती.' ॥ १८
दिलें तयां उत्तर कौशिकानें कीं, "शाप हा आयकतां स्वकानें, ।
झाली सती ते अतिदीनेवाणी; आक्रंदली सुस्वर दीन वाणी. ॥ १९
करूनी गळा मोकळा सारसाक्षी रडे कीं, 'अगा सर्वसंसारसाक्षी! ।
पतिप्रीतिकामी, नसें पापकामी; अशी ते पहा पावलें शाप कां मी? ॥ २०
पतिव्रता मी पतिहार कंठीं घालूनि, धर्में निज काळ कंठीं. ।
वेशें तया इंद्र भुजंग माते वे, तो डसे दुष्ट भुजंग मातें. ॥ २१
ज्याला तपें सकळ भूत भविष्य ठावें; ऐशा पतीसहि असें तम कां उठावें? ।
गेली, स्वकांत म्हणऊनिच, जे रतीतें, शापें तिला रचियला अपकार तीतें.'॥ २२
इत्यादि शोक परिसोनि मुनी सतीचा, मानी मनीं निरपराध विलास तीचा. ।
आली कृपा तंव बहू ऋषिगौतमातें, बोले त्यजूनि अति दीर्घतमा तमातें. ॥ २३
म्हणे,'स्पर्शला काम देवाधमातें अहल्ये! तसा झोंबला क्रोध मातें. ।
भली तूंचि, मी इंद्र दोघे समान. त्रिलोकीं न होतील आम्हांस मान. ॥ २४
चित्तीं मला उपजला अनुताप साचा. दुर्वार शाप अति दारुण तापसाचा. ।
हें नाशिलें सुकृत म्यां तव घातपातें. आतां कृपेंकरुनि वेचिन हो तपातें. ॥ २५
हा शाप आणि पुरुषांतर तूजला गे! स्पर्शे अवलिपत, तयीं अघ तूज लागे. ।
दोहींस या परिहरूनि, समागमातें माझ्या पुन्हा मिळशि तूं; वर माग मातें.'॥ २६
हे आयकोनि अबला ऋषिवर्यवाणी, 'आतां नको करुं' म्हणे करुणेसि वाणी. ।
दे एक थोर वर, येरिति कीं कदापी मी न च्यवेन; मज कोणहि लोक दापी.' ॥ २७
ऋषि म्हणे, 'अशि हे वर मागती; कशि घडे इशि, हे परमा गती?' ।
बहुत दीर्घ विचारुनियां मुनी हसितवक्त्र वदे तिस नेमुनी. ॥ २८
म्हणे, 'सूर्यवंशांत पूर्णावतारी शिळा सागरामाजि जो देव तारी; ।
घनश्याम तो राम लावू पदांतें तुलें, आणि दे चिंतिल्या संपदांतें.' ॥ २९
पडे शब्द कानीं जसा हा सतीच्या, सुखें येत रोमांच देहास तीच्या. ।
जगीं पूर्ण जीच्या निजानंद झाला. मनीं आठवी रामचंद्रा अजाला. ॥ ३०

---

१. चंद्रप्रभा. २. दीनासारखी. ३. कमलनेत्री. ४. लोटीं. ५. जार. ६. क्रोध. ७. भकेन.
८. विचार करून.

झाली शिळा, परि मनीं सुख तें सतीच्या, अद्यापिही दिसतसे मुखिं हास्य तीच्या.।
रामाचिया स्मरतसे हृदयीं पदांतें, ह्या हास्य सूचवि मनोगत संपदांतें.' ॥ ३१
हें आयकोनि मग यारिति हो! प्रसंगें इंद्राचिही पुसियली गति विप्रसंघें. ।
बोले ऋषी, 'स्तिस जों मुनि दे वरा या, तों ये कृपा कुतनु देखुनि देवराया.' ३२
अहल्या सती शापिली कोपतापें, सुरेंद्रासि तेव्हां तपाच्या प्रतापें ।
म्हणे, 'प्रीति ऐशी जयाला भगाची, तनू हो, सहस्त्राभगीं दुर्भगा ची.'॥ ३३
तेव्हां मुनीतें अनुताप झाला, देखोनि अक्रोध महा द्विजाला; ।
समागमें इंद्रहि काननातें चाले स्वयें, झांकुनि आननातें. ॥ ३४
देखोनि दीन मुनिसत्तम देवराया; शापापहार करि, येरिति दे वरा या; ।
कीं, 'हीं भगें दशशतें, नयनाकृतीतें पावूनि सूचवुत भाव जनीं कुतीतें'.॥ ३५
केलीं भगें नयन; यांत अशी कृपा हे कीं, लोचनीं दशशतीं अतिदूर पाहे; ।
चित्तीं धरूनि अनुताप, अशीं कदापी कर्मे नको करुं, असा सविवेक दापी.॥ ३६
निरोप देऊनि सुराधिपातें, शिळा सती आळवि अश्रुपातें. ।
गेला तपस्वी परमा तपातें. सेवीतसे [3][4]वर्षहिमातपातें. ॥ ३७
तदारभ्य हा ईस कांतारवास. स्मरे हे शिळा होउनी राघवास. ।
सुखें त्या मुखीं हास्य सद्भाव दावी, मुनी हो! इची काय शोभा वदावी?" ॥ ३८
असें विश्वामित्रा हसित पुसतां विप्रनिकरीं,
तयातें हे वार्ता कुशिकसुत तो वर्णन करी. ।
कर श्रीरामाचा धरुनि, ऋषिवृंदांतुनि मुनि
पुढें ने श्रीरामा, 'पद इस' म्हणे 'लावि नमुनी.' ॥ ३९
श्रीराम तेव्हां तिस पादपद्मा लावी, वसे ज्यांत अखंड पद्मा; ।
तों 'राम राम' ध्वनि आननांत त्वरें उठे गर्जत काननांत. ॥ ४०
तें[11] जों उठे गर्जत 'राम राम,' प्रतिध्वनी होति मनोभिराम. ।
ते कौशिकादि द्विज रामवाणी उच्चारितां, काय सुखासि वाणी[12]? ॥ ४१
स्पर्शे कांचन करि परिसाचा, काळिमा हरुनि त्या परि साचा.।
देह हेमपरि सुंदर झाला, लागतांचि हरिपादरजाला. ॥ ४२
जयिं मतिस चिदात्मा चित्पदीं भाव दावी,
जडतनु तिचि तेही ब्रह्म तेव्हां वदावी. ।

---

१. विप्रवर्यांनें. २. नीच कुल्यातें. ३. वृष्टि. ४. उष्ण. ५. तेव्हांपासून. ६. वनवास. ७. विप्रसमूहानें. ८. गाधिसुत विश्वामित्र. ९. पादकमल. १०. लक्ष्मी. ११. ती अहल्या. १२. तोटा.

कपटपुरुषवेषें हे दशा जे सतीतें,
रघुपति पदपद्मीं स्पर्शतां नास [1]तीतें. ॥ ४३

[2]पदरजें उठतां, [3]कुशल क्षणीं, प्रथम पाय [4]यवांकुशलक्षणी ।
दिसति; शोभति अद्भुत नूपुरें; स्मरति ज्यासि विरिंचि तनू पुरे. ॥ ४४
उठे तों पुढें राम कोदंडपाणी; गळां हार मुक्ताफळांचे सुपाणी; ।
घनश्याम दृष्टी दिसे कामिनीच्या; प्रभा [5]अंबरीं दिव्य [6]सौदामिनीच्या. ॥ ४५

सजलजलदवर्णा दुःखसंसारभंगा
कनकरुचिरवर्णा सूर्यकोटिप्रभंगा ।
सशर करिं धनू, त्या राघवा, सानुजातें,
स्तवित कमलनेत्रा [7]कुंडलास्यांबुजातें, ॥ ४६

पदरजा जशि लाधलि दुर्लभा, परमविस्मित गौतमवल्लभा, ।
करुनि मागुति मागुति वंदना, स्तवितसे स्वमुखें रघुनंदना. ॥ ४७
ब्रह्मादिही हुडकिती पदनीरजाचा जो रेणु, लाभ मज आजि तया रजाचा; ।
केलें मला परम धन्य जगन्निवासा! नासूनी शाप, ननु दुःख, अरण्यवासा.॥४८

स्वपदरज जयाचें उद्धराया उपाय
त्रिगुणविरहिता या देह ना, हात पाय; ।
प्रथम नवल हें कीं जन्म त्याही अजाला
तदुपरि चरणाच्या रेणुचा स्पर्श झाला. ॥ ४९

चाले वदेही वरदान देही; तथापि हा राघव दान देही; ।
न देह हा; भाग्य अहो जनाचें; विचित्र कर्तव्य निरंजनाचें. ॥ ५०
मनुष्य या शुद्ध निरंजनाला जो मानितो, त्या अबुधा जनाला ।
मोहावया राम तसेंचि दावी; विचित्र याची करणी वदावी. ॥ ५१
सुरनदी भुवनत्रयपावनी पदरजें प्रभु तो मज या वनीं ।
जड शिळत्व निवारुनि दीसतो; धरिन मी मनिं [10]यामिनिदीसें[11] तो. ॥ ५२
सेव्य जो सकळ देवदानवीं, त्या शिवासहि शिरीं सदा नवी; ।
ते नदी जशिच पादनीर जी, धन्य मी तशिच पादनीरजीं. ॥ ५३
विधि भवासहि पावन नीर [12]जी जनन त्यासि तुझ्या [13]पदनीरजीं. ।

१. दशेतें. २. 'पदरजें उठतां कमलेक्षणी' असाही पाठ आहे. ३. उत्तम समयी. ४. यवांकुश-चिन्हित पाय. ५. आकाशीं. ६. विजेच्या. ७. कुंडलआस्यअंबुजातें. ८. मायारहित. ९. 'मज या वनीं' असाही पाठ आहे. १०. रात्र. ११. दिवस. १२. गंगा. १३. पदकमळीं.

मज शिळेसिहि हे तनुसंपदा तव[1] पदींच नमो अजि या पदा. ॥ ५४
पदरजेंचि पवित्र नदी सती, मजहि ते पद पावन दीसती; ।
दिसतसे प्रभुचा मज वेषही, त्रिभव हें किति वर्णिल शेषही ? ॥ ५५
मनुजआकृति, बाणधनुर्धरा, जलजलोचन कौस्तुभकंधरा,[2] ।
नयनिं देखतसें, तरि याविना इतर दैवत मानुनि सेविना. ॥ ५६

ज्याचें पदाब्जरज धुंडिति वेदवाचा; नाभीस संभव सरोरुहसंभवाचा;[3] ।
घेणार नामरससार पुरारिवाणी;[4] तो रामचंद्र भजतां मज काय वाणी ? ॥ ५७
या दीनपालनकथा खलशासनाच्या गाती, निरूपिति, सभे कमलासनाच्या, ।
त्या राघवाविण दुजा कवणा भजावें ? सर्वात्मता शरण एक तयास जावें.॥५८

धरूनि स्तनीं लग्न संगीत वीणा, तुतें राघवा ! गाय वाणी[5] प्रवीणा; ।
कुचाग्रावरी वर्षते नेत्रपाणी, हृदब्जीं जिच्या राम कोदंडपाणी. ॥ ५९
तुतें ब्रह्मलोकीं सदा गाय वाणी; नसे जीस गातां निजानंदवाणी; ।
स्तनाग्रावरी तेधवां अंबु ज्यांचें, अहो भाग्य त्या दिव्य नेत्रांबुजांचें. ॥ ६०

रघुपती ! तुज गाउनि भारती सफळ मानितसे निज भारती, ।
तनुवरी गुढियाच उभारती, उपजवी सनकादिसभा रती. । ६१
विधाता पिता आणि तत्पुत्रदारा तुतें गाति गा रामचंद्रा ! उदारा ! ।
असा तूं जगद्धाम विश्वाभिरामा ! तुझे पादपद्मींच मी मुक्त रामा ! ॥ ६२

जे संपदा कमळजा[6] सकळां सुरांची, जे माउली विधिहरादिक वासुरांची ।
तेही स्तनीं पद तुझें निजसंपदा तें मानी, तया नमन मी करितें पदातें. ॥६३

आक्रमी स्वचरणें त्रिजगातें राम हा, म्हणुनि शास्त्रहि गातें, ।
त्या पदा नमुनि, गौतमजाया घे निरोप पतिसंनिध जाया. ॥ ६४
श्रीत्रिविक्रम विराम वामनीं नित्यही प्रियपणें नवा मनीं, ।
चित्स्वरूप करि कामना शिला, वामनें इतर काम नाशिला. ॥ ६४

सीतास्वयंवर.[7]

(श्लोक.)

श्रीस्वयंवरवधू नवरा हो ! तो अखंड मनिं राघव राहो, ।
भग्न जो करि धनुष्य भवाचें,[8] बीज तो हरु अनादिभवाचें.[9] ॥ १

१. 'तव पदीच नसो अजि आपदा' असाही पाठ आहे. २. ग्रीवा. ३. कमलोद्भव ब्रह्मयाचा. ४. महादेव. ५. सरस्वती. ६. लक्ष्मी. ७. हें प्रकरण रामायणाच्या बालकांडांत आहे. ८. महादेवाचें. ९. अनादिसंसाराचें.

वंदूनियां पद तया प्रभुराघवाचे, सीतास्वयंवर निरूपिन लेश वाचे; ।
जें व्यासवाल्मिकिमुखांतिल सार साचें; संक्षेप मी कथिन रूप तया रसाचें.॥ २
राम उद्धरुनि गौतमजाया, दे निरोप पतिसंनिध जाया; ।
कौशिकासह गृहा जनकाच्या ये; स्वयंवरवधूजन काचा. ॥ ३
रावणादिक पती असुरांचे, वृंद वृंद नृपभूमिसुरांचे. ।
मान्यता जनक तो करि, पूजी; सौं मुनींत दशकंठरिपू जी. ॥ ४
बुद्धि जे अनुभवी जनकाची मूर्ति त्या निजमुखा कनकाची. ।
पाहतां क्षणि पुरे न मनाची; न स्मृति स्फुरतसे नमनाची. ॥ ५
तो भक्तिसंस्कार वरी विदेहा, पाडी पदीं दंडचि जेविं देहा; ।
उठे, करी त्यावरि पूजनातें; करूनि पायीं अवनेजनातें. ॥ ६
आले बहू आणिकही घरा जे, पूजी यथायोग्य मुनींद्र राजे;
त्यानंतरें आणवि त्या धनुष्या, न जें ढळे दैत्यसुरां मनुष्यां. ॥ ७
त्रिशत गण शिवाचे सत्वरें त्या धनुष्या
उचलिति, न ढळे तें अन्यदेवां मनुष्यां. ।
तिहिं बहुबहु कष्टें ठेविलें चाप रंगीं.
दचकति नृप सारे देखतां अंतरंगीं. ॥ ८
वाटे तयां परम दुर्लभ ते नवोढा. जेव्हां पुरोहित म्हणे 'धनु कां न ओढा?'
कोणी धरूनि बसला बसल्याचि ठाया. उत्साहवृद्धि न मनाप्रति दे उठाया.॥ ९

(घनाक्षरी.)

सीतास्वयंवरीं वीर, प्रबळ बळाढ्य धीर, ।
नृपवर थोर थोर, सभे घनदाटले. ॥
त्यांच्या पूजनीं उपचार, महा जनक उदार,
करी, मनीं वाक्य सार, निज कर जोडिले. ॥
'ऐका सकळही पण; मृडकोदंड कठिण, ।
निजभुजबळें गुण, चढवुनि ओढणें.॥
गुणनिपुणप्रवीण, सर्वही सुजाण, पैण ।
पुरवील हा जो पण, त्यासि सीता अर्पणें.' ॥

१. पुण्यातें. २. नवरी. ३. परंतु.

वाक्य ऐकुनी तयाचें, चित्त भंगलें भूपांचें. ।
कोणी न बोलेचि वाचे, टकमक पहाती. ॥
अवघे तटस्थ भूप, कोणी न बोलेचि चूंप. ।
तेव्हां होउनी सकोप, बोले लंकाधिपती. ॥ १०

(सवाई.)

तों दशकंठ अकुंठ विसां भुजिं तें विषकंठधनू उचली,
कष्टत कोष्टवरि, द्विज ओष्टहि चावुनि, ज्या जरिनें खचली. ।
चाप उरीं दडपे, झडपे, मग आननपंक्ति धरे रचली;
वासुनि दांत मुखांत दहांत पडे, मति गाढ तमीं पचली. ॥ ११

(घनाक्षरी.)

कोणी उचलीना चाप, बहु पावले संताप; ।
कोणी उफराटी थाप, चढवीतां चाखली. ॥
रावणें जो केला ताण, भुईं पडला उताण, ।
शक्ति कराया उत्थान, अंबिकेनें राखिली. ॥
दडपे धनुष्यें ऊर; दाही कंठीं घुरघुर; ।
जेणें ऐशी दशा क्रूर, कधीं नाहीं देखिली. ॥
तोंही पावतां विराम, उठे दाशरथी राम; ।
तेव्हां मूर्ति अभिराम, जनीं मनीं देखिली. १२

(श्लोक.)

नित्यमुक्त जरि नित्य विरक्त, श्री[1] स्वयें स्वचरणीं अनुरक्त, ।
हे अनन्यविषया निजरामा यानिमित्त उठणें रघुरामा. ॥ १३
म्हणे विश्वामित्र स्वमनिं, 'सकळांचे भरंवसे
कळों आले; आतां मजजवळि विश्वंभर वसे. ।
तया या श्रीरामाविण जनकजा अन्य न वरी.'
म्हणोनी बोले कीं 'उठ रघुपती! साध नवरी.' १४
श्रीराम तेव्हां मुनिपादपद्मा वंदी, जयाचे स्वपदींच पद्मा[2]. ।
'आज्ञा गुरूची' म्हणऊनि 'साची करीन' बोलोनि उठे तसाची. ॥ १५
शृंगारवीरकरुणादि नवां रसांची लीला जगद्गुरुचिया पदसारसांची
सप्रेम तो दशम, त्यासह, त्या नवांतें दावी सभेसि, उठतां, सुरमानवांतें. ॥ १६

१. विष. २. लक्ष्मी.

(घनाक्षरी.)

दावी सीतेसि शृंगार, परि दिसे सकुमार; ।
त्यांत बीभत्स विकार निर्विकार दाखवी. ॥
विप्र म्हणती, 'किशोर चढवितां चाप घोर ।
कठिण हो!' हाचि थोर कृपारस राघवीं. ॥
म्हणती 'मुंगी सपक्ष' मूढां हाचि हास्यपक्ष. ।
मानिला हो वीर दक्ष देवदैत्यदानवीं. ॥
संतां शांत, सीताधव चाप मोडी अभिनव. ।
मोडी रौद्र, त्याचा रव भयानक सूचवी. ॥ १७

(श्लोक.)

शृंगारशृंग उदयाचळरामचंद्रा, श्रीरंगतुंगहृदया, रघुरामचंद्रा, ।
अंगांगसुंदरवरा, नवमेघरंगा, रंगांगणीं जनकजा जडि अंतरंगा. ॥ १८
शृंगारशृंगालयकेसरी हो सांगा अनंगा नटकेसरी हो; ।
कासे विकासे पट केसरी[1] हो, श्री शंकली पंकजकेसरीं हो. ॥ १९
अनंगरंगांबुधिच्या तरंगीं रंगीं शुभांगीं जडि अंतरंगीं. ।
'भंगील हा हो धनु केविं रंगीं?' म्हणे कुरंगीनयनी सुरंगी. ॥ २०
शृंगाररूप पहिला रस चाखवीला; बीभत्स शोककर त्यांतचि दाखवीला; ।
कीं पाहतां विषय मानुनि त्या मलाही चिंतानळीं मन करीलचि काम लाही. ॥ २१
सूर्यवंशपतिच्या सकुमारा देखतां रघुपतीस कुमारा ।
चाप तें कठिन, हा मृदु भारी, हें मनांत भय काम उभारी. ॥ २२
लज्जावती फार. तथापि त्याची शंका न सीता धरि हो पित्याची. ।
म्हणे, 'अहा तात! अशा पणातें केलें तुवां संकट आपणातें?' ॥ २३
'बहु कठोर' म्हणे 'धनु' जानकी. 'निकट कांसवपृष्ठसमान कीं. ।
रघुपती तरि हा लघु आपण; अहह दारुण तात! तुझा पण. ॥ २४
मदनशत्रुशरासन हें महा; मदनमूर्तिच केवळ राम हा; ।
करिल सज्ज कसा धनु आपण? अहह दारुण तात! तुझा पण. ॥ २५
मज नये नवरा दुसरा मनां, निजपणीं दृढ हे स्मर! कामना. ।
रघुपती तरि हा लघु आपण; अहह दारुण तात! तुझा पण.' ॥ २६

---

१. केशरी रंगाचा.

प्रतिज्ञा सांडावी मति अशि न माने स्वजनका,
वदे दुःखें तेव्हां सखिजवळि निंदूनि जनका, ।
म्हणे 'वैरी बाप त्यजुनि पण, रामासि मजला
न दे, या देहातें त्यजिन, मज नाहीं समजला.' २७
सखीशीं असें बोलतां सारसाक्षी, कृपाक्लिन्न तो होय संसारसाक्षी; ।
तिला आणि सर्वां जशी देव दावी, तशी गोड एथूनि लीला वदावी.॥ २८
मंडपांत मग तो जनकाच्या, त्या स्वयंवरवधूजनकाच्या ।
अंगणांत विभु ये; कनकाच्या, या प्रभा म्हणति लोक न काच्या. ॥ २९
रामचंद्र उठतां जनकाच्या मंडपीं नवरिच्या जनकाच्या, ।
या वयांतहि जगज्जनकाच्या न प्रभा म्हणति सज्जन काच्या. ३०
छावा उठे दशरथप्रभुदिग्गजाचा; घे चाप, इक्षुसम, तें, पति भर्ग ज्याचा; ।
शुंडा स्वबाहु उचलूनिच चालिला हो; घेती समस्त नयनीं प्रभुचाचि लाहो. ३१
गजशिशु गति जैसी, जेविं शुंडा उभारी,
रघुपति उचलूनी ये तसा बाहु भारी, ।
करि करि चिमणासा इक्षुभंग स्वहस्तीं,
प्रियहि भव धनुष्या ध्वंसि तैसा स्वहस्तीं. ॥ ३२
घे इक्षु वारण जसा करपुष्करानें, श्रीराम चाप उचली, करपुष्करानें, ।
विध्वस्तकानन दशाननअंबुजाचें चापप्रताप हरि आननअंबु ज्याचें. ॥ ३३
दशमुखकमळांतें, हस्तपद्मा विसांतें,
पडत असुर मूर्छेमाजि, अब्जा तिसांतें; ।
तनुजलजवनीं त्या वारणा अन्ययाला
दृढ मृडधनु वाटे, उत्सवो दिव्य याला. ॥ ३४
पैंआटवीस गज इक्षुमिषें निघाला; आला तथापिहि सरोजवनासि आला; ।
तोंडें दहा पसरिलीं, सरली अहंता; पायीं उरीं ढकलि चाप तदीयहंता. ॥ ३५
पाहूनि पूर्वी उठतांचि राम, श्रीमूर्ति देखूनि मनोभिराम, ।
आली कृपा ते अशि विप्रसंगा; सिंहावलोकें परिसा प्रसंगा. ॥ ३६
जन वदति, 'रमा हे आजि हो रामरामा.'
मुनि वदति मुखें जे गाति कीं राम रामा. ।

---

१. कमलनेत्री. २. आर्द्र. ३. शिव. ४. रामाचा. ५. हत्ती. ६. आपल्या शुंडेनें. ७. सोंडेच्या अग्रें. ८. हस्तकमलानें. ९. कमलांचें वन. १०. रामाची स्त्री.

उडति, उडविती जे विप्र अंगोस्तरातें,
प्रभुहि भवधनुष्या मोडि या दुस्तरातें. ॥ ३७

एवं दशाननउरावरि चाप हा तें हाणोनि लात उचली; जन तें पहातें; ।
पाश्रीं उरीं ढकलि राम दशास्यहंता; ज्याचीं मुखें पसरलीं सरली अहंता.॥ ३८

कीर्तिचा तरि जगीं रव याचा; दीसतो मृदुकिशोरवयाचा; ।
हो तथापि जय राघवराया; ये रमा त्वरित यासि वराया. ॥ ३९

मोडो त्वरें हें भवचाप हातीं, ऐशा कृपेनें द्विज जे पहाती; ।
तो भाव दावी स्वकृपारसाचा; जरि स्वयें पूर्ण अपार साचा. ॥ ४०

'मुंगीस पक्ष फुटले, उठला तसा रे;' अन्योन्य हें वदति, हांसति चट्ट सारे. ।
श्रीराम हास्यरस ये रिति भाव दावी, आतां कथा किमपि वीररसीं वदावी.॥ ४१

मोठ्या गजासहि जसा चिमणा हरी तो, गंडस्थळें अति विदारुनि संहरीतो; ।
मोडील हें धनु असें कुशळांसि वाटे, चित्तांत वीररस ये नयनांसि वाटे.॥ ४२

संत पात्र विभुशांतरसाचें; प्रीतियुक्त निज अंतर साचें; ।
या सभे करिति वर्षति दृष्टी; प्रेम ज्यां न भवदुःख अदृष्टी. ॥ ४३

अद्भुतांत विभु अद्भुत दावी; ते कथा विशद लेश वदावी; ।
केविं वोढिल धनुष्य भवाचें? आयका सुख निजानुभवाचें. ॥ ४४

स्वउत्तरीयांबर त्या समाजीं बांधोनियां चाप तयास मौजी. ।
दशाननाच्या हृदयावरूनी घे, मस्तकीं कुंतळ आवरूनी. ॥ ४५

घंटापताकांसह चाप हातीं घेतां, स्त्रिया पूरुषही पहाती. ।
किशोरही थोर पराक्रमी तो, जाणों उसातें गज आक्रमीतो. ॥ ४६

घे आणि सज्जन मिषें करि चाप हातीं ओढी. त्वरें, नवल सर्वहि हें पहाती; ।
स्वल्पा वयांत जन मानिति अद्भुतातें, या अद्भुतें स्फुट करी सरसामृतातें.॥ ४७

रौद्रावरी रौद्ररसासि घाली; गोडी रसज्ञांत अशी निघाली; ।
कीं रुद्रचापावरि रुद्रभावा योजी; असें रौद्ररसस्वभावा. ॥ ४८

श्रीमद्राघवहस्तपद्मगुण ये कर्णांत हो जेधवां,
मोडे हें भवचाप; अर्थ इतुका दावी जगीं तेधवां; ।
कीं श्रीरामकरारविंदगुणही कर्णांत येतां स्वयें
मोडे हें भवसायकासन, असा भावार्थ हा निश्चयें. ॥ ४९

---

१. भासे. २. स्पष्ट. ३ कंबरेंत. ४. केश. ५. संसाररूपी धनुष्य.

जेव्हां कथेची गति हे वदावी; धनुष्यभंगीं रस रौद्र दावी; ।
कडाडितां चाप भयानकांहीं करी असा उग्र जनास कांहीं. ॥ १०

कडकडकड चापीं जेधवां शब्द जाला,
तडतड विधिअंड त्रास दे [1]अब्जजाला; ।
तडफडि फणिराणा; कंप भूमंडलाला;
खडबडि कनकाद्री; धाक [2]आखंडलाला. ॥ ११

(घनाक्षरी.)

करीती खळासि दंड ऐसे रामबाहुदंड, ।
तिहीं मृडचाप चंड मोडितां कडाडिलें. ॥
भांड ब्रह्मांड अखंड, साता द्वीपां खंड खंड, ।
होऊं पाहे खंड खंड, गगन गडाडिलें. ॥
राक्षसांत मुंड मुंड, रावणादि पुंड पुंड, ।
होती त्यांचे पिंड पिंड, हृदय तडाडिलें. ॥
भ्याले भूप लंड भंड, गज दिग्गज उदंड, ।
[3]तोंडीं उगळितां गंड, शोणित भडाडिलें. ॥ १२

घंटा ज्यासी जडजड, पताकांची फडफड, ।
करी चाप कडकड, मोडी राम जेधवां. ॥
अब्जजादि तडतड, गिरीवरी खडखड, ।
नक्षत्रांचे धडधड, लोळे व्योम चांद्रवा. ॥
भ्याले वीर धडधड, ज्यांचे मनीं [4]धडधड, ॥
राक्षसांचे धडधड कांपले हो तेधवां. ॥
रावणाची बडबड राहे, पडे हडबड, ।
काळघन गडगड आटले हो तेधवां. ॥ १३

(श्लोक.)

सद्भक्ति दे मूर्ति नवां रसांची, देखोनि नेत्रीं गति मानसांची ।
तें वर्षती प्रेम तयाचि वाटे, एवं दहावा रस त्यांसि [5]वाटे, ॥ १४
मना सदा प्रीति सुखा निजाची मूढां जनांतें न कळोनि जाची, ।
सप्रेम विद्याप्रद मूर्ति साची, भक्तांसि वाटे दशमा रसाची. ॥ १५

---

१. ब्रह्मदेवाला. २. इंद्राला. ३. 'तोंडीं डळों येतां गंड' असाही पाठ आहे. ४. भयादिकानें जी उरांत धडकी ती. ५. भासे.

सुसहि नवरसांची रामरूपेंचि केली,
तरि दशम रसाच्या आवडीनें सुकेली; ।
दशम सुरस ओते; त्यांत रूपें नवांचीं
दिसति; सफळ विद्या तेधवां मानवांची. ॥ ५६

रामरूप नवही रस पाहे; राम त्यावरि करीच कृपा हे; ।
प्रेम तो दशम त्यां रस दावी, यानिमित्त रसरीति वदावी. ॥ ५७
मोडी असें जों भवचाप[1] हातीं, तों लोक रामीं रस हे पहाती. ।
ते जानकी ये प्रिय देवराया रंगांत[2] मातंगगती[3] वराया. ॥ ५८
गजगती जगतीप्रति दाविते; वसुमती[4] सुमती सुख भाविते; ।
स्वतनुजा तनु जाणतसे धरा; नवरि ते वरिते मणिकंधरा[5]. ॥ ५९
नव सुधा वसुधातनया स्मरा; जनमनीं न मनीं वश जे स्मरा[6]; ।
स्वपति तो पतितोद्धर[7] तो खरा; नवरि ते वरिते रघुशेखरा[8]. ॥ ६०
जगपित्यास जगज्जननीच ते वरि; न जाणति हें जन नीच ते; ।
नवरि जे वरिजे जगदीश्वरें[9], अमळ ते मळते न दुज्या वरें. ॥ ६१
ध्वनि उठे चरणीं लघु भूषणीं; मन समर्पित ये रघुभूषणीं; ।
परमहंसगतीच[10] जया प्रिया परमहंसगती[11] वरि ते प्रिया. ॥ ६२
स्मर तिला रतिलाच न ईश तो; अतनु[12] जो तनुजोत्तम दीसतो; ।
नृपति तों[13] पतितोत्तम भासती; नवरि ते वरिते प्रभुतें सती. ॥ ६३
अनादि हाचि प्रिय नाथ जीचा; मुखेंदु तो या रघुनाथजीचा; ।
लक्ष्निही अन्य मुखांबुजा ते पाहे नृपाच्या न मुखांबुजातें[14]. ॥ ६४
शवापरी मानुनियां नृपांगें, लक्ष्निियां तुच्छपणें अपांगें[15], ।
सर्वोत्तमा त्याचि रघूत्तमाला, अर्पी गळां श्री निजहस्तमाला. ॥ ६५
कमळजा मळजालसुरादिकीं नवरि ते वरिते स्वअनादि कीं; ।
स्वपति तो पतितोद्धर, त्याविना इतर ते तरते गुण भाविना. ॥ ६६
सुवर्णमुक्तादि[16]सुधा शुभांगीं[17] त्याली अलंकार असे शुभांगी[18]. ।

---

१. शिवधनुष्य; (पक्षीं) संसाररूपी धनुष्य. २. मंडपांत. ३. गजगामिनी. ४. पृथ्वी. ५. ग्रीवा, कंठ. ६. मदनाला. ७. पाप्यांचा उद्धार करणारा. ८. श्रेष्ठ. ९. पतीनें. १०. संन्याशांना उत्तम गति देणारा. ११. हंसासारखी मनोहर गति जीची. १२. शरीरहीन. १३. तर. १४. वदन-कमलास. १५. कटाक्षें. १६. सोनें व मोतें इत्यादिकांची कांति. १७. मस्तकीं. १८. सुंदरी.

अंगांगशृंगार यथाविभागीं सीता उभी ते प्रियवामभागीं. ॥ ६७
अर्पी गळां हार ज्या सुकाळीं सीता सुखाच्या पडली सुकाळीं. ।
विचित्र वाद्यें जन वाजवीती, सीतापतीचें यश गाजवीती. ॥ ६८
गेलीं अयोध्येसि सहस्र पत्रें कीं, 'राघवें हस्तसहस्रपत्रें; ।
भवायुधध्वंसबळांत रंगीं यशोब्धि केला धवला तरंगीं. ॥ ६९

भवधनु रघुवीरें भंगिलें विश्वसारें;
तुम्हि सहपरिवारें, पत्र वाचूनि सारें, ।
निजतनयविवाहालागिं यावें प्रभावें.'
जनक दशरथातें हें लिही प्रेमभावें. ॥ ७०

भिजवि सजळनेत्रें पत्र तें, ज्यांत वाची
दशरथ नृप साची कीर्ति ते राघवाची. ।
ठंक सकळ सभा ते राहिली; प्रेमपाणी
स्रवति नयनचित्तीं राम तो चापपाणी. ॥ ७१

करि त्रिभुजयवार्ता भग्न वार्ता भवाची;
नवल न धनुकांबी ध्वंसिली हे भवाची. ।
श्रवणिं निघत, नाशी दुःख संसार सारा;
दृढपण मृडचापाहूनिही ज्या असारा. ॥ ७२

दशरथनृपसंगें सर्व आमात्य, योद्धे,
इतरहि जन, जाती; नीघती जे अयोध्ये; ।
सजलनयन सारे राघवातें पहाती;
'नवल' म्हणति 'यानें मोडिलें चाप हातीं.' ॥ ७३

पूजूनियां जनक त्यां सकळां स्वहातें, येऊनि दूर, बहुसादर ने गृहातें; ।
श्रीरामकीर्ति वदनेंचि किती वदावी? यालागिं चापशकलें नरदेव दावी. ॥ ७४
असें देखतां मोडकें चाप, भारी शरीरीं गुढ्या रोमराजी उभारी; ।
स्वमांडीवरी राम घेऊनि माय स्वयें प्रसते; प्रेम चित्तीं न माय. ॥ ७५

म्हणे श्रीकौसल्या, 'परमसुकुमारा रघुपती !
कशीं हातीं तुझ्या जडित जड चित्तांत खुपती; ।

---

१. हाव. २. उत्तम काळीं. ३. विपुलतेंत. ४. कीर्तिसागर. ५. पांढरा. ६. लाटांनीं. ७. तटस्थ, चकित. ८. प्रेमाश्रु. ९. गळती. १०. धनुष्य आहे हातीं ज्याच्या. ११. संसाराची. १२. नाशिली. १३. महादेवाची. १४. शिवधनुष्याहून. १५. राजा जनक. १६. रोमांचपंक्ति.

अशा या हस्ताब्जें[1], उचलुनि धनू, दोन तुकडे
कसे केले ? पाहों न शकति बळी थोर जिकडे. ॥ ७६

नसे अंत या रामकीर्तिप्रवाहा; असो तें; पुढें रामसीताविवाहा ।
जनां देखतां फार आनंद झाला; अजा[2] पद्मजा[3] भेटली श्रीअजाला[4]. ॥ ७७

रामानुजां देखुनि सुप्रभावां, कन्या तिघी तीं भरतादिभावां ।
विदेह[5] तो देत विवाहरीती; कीर्ती जयांच्याच भवा हरीती. ॥ ७८

श्रीविदेहतनया सुकुमारी, पूर्ण शांति निज भूमिकुमारी ।
आत्मयासि वरि होउनि रामा, मूर्तिमंत सगुणा अभिरामा[6]. ॥ ७९

रायें विवाहास मुहूर्त केला; लागे हरिद्रा[7] नृपकन्यकेला; ।
सुवासिनींच्या करपुष्करांनीं[8] सुरत्नकुंभाकरपुष्करांनीं; ॥ ८०

चहूंही मोक्षांचे कलश चहुकोनीं मिरवती;
न जे भ्रमीं हेमीं[9] दिसतिहि खरेसे म्हणविती; ।
गुणीं शुभ्रीं दावी सगुणपण संतांस सुमती
असें न्हाणें वारी अभिनव वधू शांतिसुमती. ॥ ८१

चढे तीस सर्वात्मतेची हरिद्रा, न जे ठाउकी भेद[10]बाधा दरिद्रा; ।
तिचें शेष ये षड्गुणा रामचंद्रा, अविद्याग्नि[11]संतप्तविश्रामचंद्रा. ॥ ८२

एक राम जानें देवदेवें[12] कीं, भाव हा उभय[13]देवदेवकीं; ।
जान्हवी पुरवि काम[14] कामना, वापिकाखननकाम का मना. ॥ ८३

जीव जे प्रकृति[15]अष्टकवर्गी, तृप्त ते सकळ अष्टकवर्गी; ।
ज्योतिषी द्विज पुरोहित सारे, त्यांत एकहि न मोहितसा रे. ॥ ८४

गुण[16]त्रयांच्या तटिनी[17]प्रवाहीं, सत्वांबु[18] शोधूनि पृथक् विवाहीं, ।
ते घालिती कोळघडी[19] द्विजाती; सत्यें घड्या रामनिमित्त जाती. ॥ ८५

---

१. करकमलानें. २. जन्मरहिता. ३. कमलापासून झालेली लक्ष्मी म्ह० सीता. ४. जन्मरहित जो परमेश्वर म्ह० राम त्याला. ५. विदेहदेशाचा राजा जनक. (विदेहदेश गंडकीनदीच्या पूर्वेस होता.) ६. सुंदर अशाला. ७. हळद. ८. हस्तकमलांनीं. ९. सोन्यांत. १०. परमात्मा व जगत् हीं भिन्न मानणारा. ११. अज्ञानरूपी अग्नीनें संतप्त झालेल्यांस विश्रांतिरूप चंद्रासारखा सुखकारक. १२. देवश्रेष्ठ. १३. दोहोंकडील देवदेवकस्थापनविधि. १४. यथेष्ट. १५. प्रकृति, महतत्त्व, अहंकार, आणि पंचमहाभूतें असे जे आठ त्यांच्या वर्गी. १६. सत्व, रज, तम, हे तीन गुण. १७. नदी. १८. सत्वगुणरूपी उदक. १९. कालमापक घटिकापात्र.

राजवीत विविधा निगमातें, वे नृप श्रुतिचिया उगमातें; ।
आणिला निजगृहा नवरा हो; 'जो मनीं' म्हणति मानव 'राहो.' ॥ ८६
पूजूनि राम निगमोदित बोधरीती, चित्तंत आड पट मायिक जो धरीती, ।
काढावयासिच निषेधुनि घेत हातीं, शांतीसि अंतरहि हेंचि असें पहाती. ॥ ८७
श्रीराममंगळकथा जन गात नाना; अध्यात्ममार्ग बघतांचि वृथा तनाना. ।
न भ्रांतिचा पट फिटे म्हणुनी, द्विजाती गाती सुमंगळ सुधारस चित्रजाती. ॥ ८८

ब्रह्मा वृद्ध; सकाम कामरिपु तो रुद्र स्मशानीं वसे;
दैत्यत्रस्तसुरेंद्र; इंद्रगुरुही इंद्राभिमानी असे; ।
दुर्वासादि अशान्त; शांत मजही जो कांत इच्छीच ना;
माळा हे कमळा, विचारुनि, गळां घाली जगज्जीवना. ॥ ८९

'इच्छीना मजला सुरासुर भला ऐसा दिसेना मला,'
आशेशीं रमला जिच्या नर, तिला तो दाससा भासला; ।
श्रीवांछादिमला शिवे न, शमला, त्या या घनश्यामला
माला हे कमला, विचारुनि, गळां घाली जगन्मंगला. ॥ ९०

श्रीमद्भागवतांत, आणि इतर ग्रंथीं, महाभारतीं,
श्रीमद्रामकथा निरूपित; बरी व्यासाचिही भारती. ।
गाती तेचि शुकादि गोत्रज कुळीं मध्यें वसिष्ठान्वयीं;
माझा वामन राम गाइल तया लक्षूनि सर्वान्वयीं. ॥ ९१

पौरोहित्यहि निंद्य, तें विधिपिता दे या कुळाचें मला;
'या संबंधमिषेंचि लाधसि' म्हणे 'रामा घनश्यामला.' ।
तो मी आजि पुरोहितत्व करितों, वैवाहिकें मंगळें
गातों रामरसें, कृतार्थहि असें केलें जगन्मंगळें. ॥ ९२

विश्वामित्र म्हणे, 'पवित्र चरणें माझ्या करीं आश्रमा;
संगें ये मिथिलेसि; पादकमळें नासीं अहल्याश्रमा; ।
मद्वाक्यें भवचापभंग करितां माला रमा कंधरीं
घाली, आजि विवाह मंगळदिनीं सीतेसि हातीं धरीं.' ॥ ९३

१. वेद. २. श्रुतीचा उगम म्ह० परमेश्वर. (राम. ३. वेदप्रोक्त ४. चैतन्यरूपी तंतु. ५. मदनाचा शत्रु. (शिव.) ६. आलेला. ७. कोपिष्ठ. ८. लक्ष्मी म्ह० सीता. ९. विचार करून. १०. वाणी. ११. वसिष्ठाच्या वंशांत. १२. ब्रह्मदेवाचा बाप. १३. मिथिला ही विदेहदेशाची राजधानी होती. १४. गौतमाची स्त्री. १५. कंठांत.

(धनाक्षरी.)

सावधान सावधान, कांहीं नाहीं व्यवधान; ।
आत्मलाभाचें निधान, लग्न बहु जवळी. ॥
म्हणे ज्योतिषी आचार्य, काळगणनादि कार्य ।
झालें, बोल जें हें कार्य घडीजेल कवळी ? ॥
ॐ पुण्यादि हें अक्षर मुखा येतां पदाक्षर, ।
निरसे दिसे अक्षर, तंतु नेत्रीं सकळीं. ॥
शांति आत्मा वधू वर, वरितां हो परस्पर, ।
अक्षति अक्षततर मुक्तिचि मुक्ताफळीं. ॥ ९४

(श्लोक.)

गातां द्विजीं राघवमंगळाला, जो आड मायापट, तो गळाला; ।
परस्परें अर्पिति अक्षतांतें, मुक्ताफळां नूतनअक्षतांतें. ॥ ९५
संतप्त सोनें जशि जोति यांची, सीताशरीरावरि मोतियांची, ।
श्रीइंद्रनीळाचिसमें समान, श्रीरामदेहावरि भासमान. ॥ ९६
जइं नवरि वरी हो श्री अजा श्रीअजाला;
तइं अगडधडाधों घोष इत्यादि झाला; ।
ध्वनि गगनिं अशब्दीं स्थावरा जंगमाचा
प्रकृतिपुरुषयोगें चिज्जडासंगमाचा. ॥ ९७
कामक्रोधहुताशनीं तडफडां होऊनियां भाजल्या
लाजा वृत्तिमयी, न या चिदनलीं त्या होमितां वाजल्या; ।
सातां आवरणांत सप्तपदिही होतां, पुढें तो पती
तेव्हां कांत दुजा कधीं न वदवे, वार्ताच या लोपती. ॥ ९८
आत्मा सुवर्ण सचराचरवास मुद्रा ऐशा धनें भरवि देहचतुःसमुद्रा; ।
विद्याकरें भवदरिद्रिपणासि नाशी; संतोष तो सुरनरां कमळासनासी. ॥ ९९
तत्त्वब्रह्मसमन्वयें ध्वनि उठे, ते ताल घेती श्रुती;
आलापी व्यतिरेकल्पक रिती, कीं तन्न तन्न श्रुती; ।
वेदांता गण, तर्ककर्कश खडे सांडूनि जे शोधिती
गीतागीत, तदर्थनाचहि असें तेथें जना बोधिती. ॥ १००

---

१. न मोडलेले असके तांदूळ. २. सीतारूपी माया. ३. रामरूपी परमेश्वर. ४. चित् म्ह० चैतन्य आणि जड म्ह० चैतन्यरहित पदार्थ. ५. अग्नीत. ६. लाह्या. ७. कान. ८. पैर.

दशहि इंद्रिय अश्व तनूरथीं दशरथाख्य चिदंश महारथी ।
स्वसुखनंदन उत्सव पाहतो; श्रुतसुतैक्यसुखीं स्थिर राहतो. ॥ १०१

कुलस्त्री कौसल्या सुमति निगमोक्ता कुशलता
करी कामें, टाकी श्रुतिविहितवार्ता विषलता; ।
धरी स्वात्मारामप्रभुसि उदरीं, युक्ति नमनीं
करी सर्वात्मत्वें, प्रकटहि तथा बुद्धि जननीं. ॥ १०२

आणी शांति सुनेचिया सुनमुखा पाहावया ते सती;
वृत्ती कोटि वराडिणी अवधिया ज्या चिन्मया दीसती; ।
शुद्ध ब्रह्म सुवर्ण, विश्व नग, जें होऊनि साकारलें;
अर्पी तें पहिलें सुनेसि विधिनें सासू गळां कारलें. ॥ १०३

कामादि सा कुरसवर्जित षड्रसाचा निःकामनादि परिपाक विपाक साचा; ।
सायुज्यतादिक चतुर्विध अन्नजाती, जें ज्यासि इष्ट, जन सेवुनि तेंचि जाती.॥१०४

समारंभ इत्यादि तो कोण वर्णी? वधूचा पिता तृप्ति दे सर्ववर्णीं; ।
हरी दुःख हें स्वल्पही रामवार्ता; निरोगी करी अल्पमात्रा भवार्ता. ॥१०५

ओवाळितो स्वपुरुषार्थ चतुर्थहोमीं, रामावरूनि म्हणऊनि चतुर्थ हो मी. ।
दे सर्व आंदण फणींद्रहि जें न मोजी; 'न्यूनासि पूर्ण करिं तूंचि' म्हणे 'नमो जी!' १०६

साडे करी सजळलोचन; कन्यकेला सद्वंशजा निरवितां जन धन्य केला. ।
कांत स्वशांति तिस घेउनि ये अयोध्ये; श्रीराम आणि जन सर्व अमात्य योद्धे. ॥

आद्यंत अध्यात्मचि हे कथा रे, जे वर्णितां न भ्रम शोक थारे; ।
अध्यात्मरामायण नाम याचें ठेवी असें व्यास अनामयाचें. ॥ १०८

परंतु साधारण मानवांची वचा अजी हा महिमा न वाची; ।
म्हणोनियां राघवलोकलीळा उग्याचही संहरती केलीला. ॥ १०९

अध्यात्मरामायण गीत संतीं, हे कोकिळा जे वदली वसंतीं; ।
आतां रुचीनें जन घेति सारे; वदों तया रामकथारसा रे! ॥ ११०

जिंके पुरीस फिरतां, जमदग्नि आला, जो भंगितां भवधनुष्य भडाग्नि झाला; ।
ज्याला जगांत घडली बहुराजहिंसा, तो क्षत्रिधानळ करीं रघुराज हिंसा. ॥ १११

---

१. 'आली' असाही पाठ आहे. २. कारल्याच्या आकाराचा दागिना. ३. 'निष्पाकतादिपरिपाकविपाक साचा' असाही पाठ आहे. ४. ईश्वरस्वरूपीं मिळून जाणें या मुक्तीला 'सायुज्य मुक्ति' म्हणतात. ५. सलोकता, सरूपता, समीपता, व सायुज्यता या चार प्रकारच्या मुक्ति. ६. 'स्वपुरुषार्थचतुष्ट होमीं' असाही पाठ आहे. ७. शेष सहस्रमुखांचा. ८. 'दमादि योद्धे' असाही पाठ आहे. ९. कलियुगांत होणारें पातक. १०. थंडसा.

दशरथ नृप त्याला कंकणें आणि चोळी;
[1]भृगुवर, लपतां तो, हस्त सक्रोध [2]चोळी; ।
दशरथसुत जिंकी राम तैशास वाटे;
दशमुखविजयाचें काय आश्चर्य वाटे? ॥ ११२

(घनाक्षरी.)

राम असतां किशोर भेटे जमदग्नी घोर; ।
क्षत्रियांत गर्व थोर, त्यातें दूर जो करी. ॥
अन्यरामवीररस आयकावे हे सुरस; ।
तुटे नामें हे कुरस भवरोग लौकरी. ॥
रावणासि बांधी धीर [4]बाहूसहस्राचा वीर, ।
कापी तशाचेंही शीर, परशु जो घे करीं. ॥
ऐसा भृगुकुळीं राम, जिंकी त्यासि रघूराम; ।
दशग्रीवादि संग्राम प्रेमें गावा किंकरीं. ॥ ११३

(श्लोक.)

ऋषित्वेंच ठेवूनि विप्रोत्तमाला, तयांतील रामांश रामीं मिळाला; ।
अयोध्येप्रति श्रीस घेऊनि पावे; सदा हेचि हो मंत्र त्याचे जपावे. ११४
सीतास्वयंवर असें, बरव्या मनानें, लक्षुनि, शास्त्र अवलोकुनि, वामनानें ।
भाषाप्रबंध रघुनाथकथारसांचा केला; [5]प्रसाद अवघा [6]पदसारसांचा. ॥ ११५

भरतभाव.

(श्लोक.)

करुनि वंदन जानकिनायका, भरतभाव निरोपिन, आयका; ।
जननि टाकुनी रामपदीं निघे; सुकृत तो मति हे समजोनि घे. ॥ १
भरत जवळि नाहीं; [8]मातुलग्रामवासी;
भरतजननि धाडी [9]काननां राघवासी; ।
दशरथ मृत झाला, राम जातां वियोगें;
तृण बहुतदिसांचें अग्निच्या जेविं योगें. ॥ २

---

१. भृगुकुलश्रेष्ठ. (परशुराम.) २. घांसी. ३. भासे. ४. सहस्र भुजा ज्याला होत्या असा सहस्रार्जुन वीर. ५. प्रसन्नता. ६. चरणकमळांचा. ७. हें प्रकरण रामायणाच्या अयोध्याकांडांत आहे. ८. मामा. ९. वनास.

मग भरत वसिष्ठें आणिला जो अयोध्ये,
नगरि गतधवा ते, आणि निर्वीर्य योद्धे, ।
जन मृतसम देखे; हेतु कांहीं कळेना;
जननिकृतकुचेष्टा बुद्धितें आकळेना. ॥ ३

वृत्तांत सांगे भरतासि माय, स्वानंद जीचा त्रिजगीं न माय; ।
भेदूनि वक्षस्थळ शब्द तीचा, करी महाक्षोभ महामतीचा. ॥ ४
जाळील तीतें निजदृष्टिपातें पाहे असा, हालविनाच पातें; ।
म्हणे, 'अहो पापिणि! पापरूपे! जळो तुझें तोंड जडस्वरूपे! ॥ ५
जाळीन हें तोंडचि जाण आधीं, मुखें जया देसि अनंत आधी; ।
न माय तूं, वैरिण होसि साची; माझे मनीं भाव खरा असाची. ॥ ६
केला तुवां देखत भर्तृघात; क्षणें तिवाटा रचिल्या तिघांत; ।
शत्रुघ्न मी, लक्ष्मण राम जोडे; राजा तिजा, तीस अनर्थ जोडे. ॥ ७
गिरिवनाप्रति राम रमापती दवडिल्यावरि, मृत्युमुखीं पती ।
निजविला; मज हे विधवा धरा म्हणसि भोग अयोग्य वसुंधरा. ॥ ८
वना धाडिलें जेधवां रामराया, तुवां हेतु केला स्वभर्ता मराया; ।
अहा! रामसीता अशा दंपतीतें वना धाडिलें; मारिलें कां पतीतें? ॥ ९

नकळत पतिताचें खादलें अन्न ओकी
तरि पतित नव्हे तो, पापरूपे! अहो कीं; ।
म्हणुनि उदरिं तुझ्या देह हा जन्मला गे!
त्यजिन तरि मला हें पाप तूझें न लागे. ॥ १०

हे अग्नितापित घृतांत तनू तळेना; प्रत्यक्ष तो कधिंहि पातक आंतळेना; ।
रामापराधिनिसुतास शिवेल कां? जी! घे ब्राह्मणोत्तम न अंत्यजपात्रकांजी ॥ ११
राजर्षियोगें निजधर्मपूतें जीं कां स्वधर्में वधिती रिपूतें; ।
शस्त्रें न तीं आतळतील मातें, त्वद्गर्भसंभूतनराधमातें. ॥ १२
मारील सद्य मज, खाइन त्या विखातें, कीं पापियास निज पातक जेविं खातें. ।
तूं पापिणी त्वरित जाशिल रौरवासी; होसी सदा निरयदारुणलोकवासी. ॥ १३

---

१. मृतभर्तृका. २. समजेना. ३. न सामावे. ४. उदार मन आहे ज्याचें अशा भरताचा. ५. मनोदुःख. ६. तीन वाटा. ७. संपादे. ८. पाप्याचें. ९. अग्नि. १०. स्पर्शेना. ११ महारादि नीच जातींतील मनुष्याच्या भांड्यांतील कांजी म्ह० पेज. १२. नरकविशेष. १३. नरक.

(घनाक्षरी.)

अहो कैकयि! हें काय केलें तुवां? हाय! हाय! ।
न म्हणवे तुज माय, जन्मोजन्मीं वैरिणी. ॥
सर्वजगदभिराम वना धाडिला तो राम; ।
केलें विख्यात कुनाम, कीं हे पतिमारिणी. ॥
तुझ्या वधें न अधर्म; तुज मारावें हा धर्म; ।
परि निंदील हें कर्म राम पापकारिणी! ॥
नाहींतरी प्राण आज्य तुझें घालूनियां प्राज्य, ।
जाळूनियां सामराज्य दाखवितों करणी.' ॥ १४

(श्लोक.)

धिक्कारूनी गोष्टि मातेसि सांगे; कौसल्येच्या ये गृहा सानुरागें; ।
त्यातें देखे जेधवां राममाय, श्रीरामाचा शोक लोकीं न माय. ॥ १५
मोकळा करुनि कंठ तेधवां, आठवूनि मनिं जानकीधवा, ।
ते[3] रडे, भरतही तसा रडे; जोंवरी नयन होति कोरडे. ॥ १६
म्हणे, 'बांसरा! घात झाला असा रे! तुझ्या माउलीचेच हे खेळ सारे. ।
वृथा धाडिला राम माझा वनासी; न देखों शके त्या जगज्जीवनासी.॥ १७
अरे! राघवें व्यापिले लोक सारे; तरी नावरे शोक माझा कसा? रे! ।
तृषाक्रांत डोळे घनश्यामरामा पहायास रे! सर्वलोकाभिरामा. ॥ १८
जानकी जनकराजकुमारी, पाय कोमळ जिचे सुकुमारी, ।
चालली जशि वना अनवाणी, बोलली कटकटा जनवाणी. ॥ १९
सूनु सूनहि वनाप्रति जाती; आणि जे जित असेल कुजाती; ।
मानवी तनु पशूंत गणावी; ते शिळा परि सजीव म्हणावी.' ॥ २०
भरत शोक अनेक तिचे असे परिसतां, मग बोलत तो असे; ।
'जननि! गोष्टि समस्तहि हे खरी; परिस येविषयीं मम वैखरी. ॥ २१
मी ब्रह्महत्याशतपाप लाहें, ठावें असे लेश जरी मला हें; ।
खड्गें वसिष्ठासि अरुंधतीतें वधीं, जरी ठाउक हें मतीतें.' ॥ २२
म्हणे राममाता, 'अरे बांसरा! मी तुझा जाणतें प्रेमउल्हास रामीं; ।
तुला रामसेवेविणें काम नाहीं; न राज्यादिकांची जया कामना ही'. ॥ २३

---

१. 'आहा' असाही पाठ आहे. २. अज्ञा म्ह० शेळी इच्या दुधानें तूप. ३. ती कौसल्या. ४. हे बालका. ५. पुत्र. ६. भाषण, मत.

तो वसिष्ठ वदला भरतातें रामपादनिजलाभरतातें; ।
पाळि यावरि समस्त धरा हे; राजनीति करिं; सावध राहें. ॥ २४
रायें तुतेंचि दिधलें स्वनृपासना रे! संपूर्ण तूं जननिची करिं वासना रे!' ।
शब्दार्थ हे नकळती गुरुलाघवाचे, साचे म्हणूनि पद आठवि राघवाचे.॥ २५

(घनाक्षरी.)

म्हणे भरत, 'हा राम! त्राहें त्राहें मेघश्याम! ।
वसिष्ठ हा गुरुनाम, तोही मज कोपला. ॥
अंतरले तुझे पाय; तया राज्याचे उपाय ।
सांगे मज, हाय! हाय! नव्हे गुरु आपला. ॥
अग्नितुल्य वाटे राज्य, मज जाळि सार्वभौमराज्य. ।
वरी ऋषी घाली आज्य, त्याणें जीव तापला. ॥
दावीं सत्वर चरण; किंवा स्वामी! दे मरण; ।
तुझ्या नामाचें स्मरण, त्याचा भाव संपला.' ॥ २६

(श्लोक.)

स्मरोनि ऐसें रघुनंदनातें, त्या राघवाच्या पदवंदनातें ।
जावें, असा भाव धरूनि, साच बोले वसिष्ठाप्रति ही तसाच. ॥ २७
'राजाधिराज रघुराजचि एक जाणा; पाहों चला सकळ जाउनि त्या सुजाणा; ।
आम्ही समस्त जन किंकर राघवाचे; जें रामनाम जपतों अजि नित्य वाचे.२८
विना राक्षसी कैकयी, काननातें चला सर्व, पाहूं मृगांकाननातें; ।
प्रयत्नेंचि घेऊनि येऊं गृहातें; न येतां समर्पूं शरीरें स्वहातें. ॥ २९
येणार ते या, अथवा नका ही; राहेन मी हें न घडेचि कांहीं.' ।
बोलोनियां स्पष्टचि चालिला हो; शोकांतही घे प्रभुनामलाहो. ॥ ३०
'हा राम! हा राम!' असेंचि वाचे; चित्तांत पाय प्रभुराघवाचे; ।
त्यजी कुलाचार्यहि रामवाटे; कीं तो गुरू त्यास गुरू न वाटे. ॥ ३१
'येणार ते या, अथवा नका ही' शब्दांत या अर्थ सखोल कांहीं; ।
कीं जो गुरू अंतर रामपायीं पाडी, त्यजावा गुरु तो उपायीं. ॥ ३२
'श्रीरामही टाकुनि राज्य मातें जो घे म्हणे, त्या ऋषिसत्तमातें ।
गुरुत्व कैचें? तरि मी उपेक्षा करीन; त्याची न मला अपेक्षा.' ॥ ३३

---

१. सार्वभौमत्व. २. तूप. ३. चंद्रासारिखें मुख ज्यांचें अशा रामातें.

या कारणें 'या अथवा नका ही, राहेन मी हें न घडेचि कांहीं' ।
ऐशी उपेक्षा वदनीं वदे तो; श्लोकांत या व्यासचि भाव देतो. ॥ ३४
नाहींतरी या, अथवा नका ही, गुरूस बोलेल; घडेल कांहीं; ।
रामानिमित्तें गुरुही त्यजावा; वाक्यांत भावार्थ असा भजावा. ॥ ३५
रामानिमित्तें जननीस टाकी; पाणी न पी राज्यनदीतटाकीं; ।
लंघूनियांही गुरुसंगतीतें पावे, अहो दे गुरु ज्या गतीतें. ॥ ३६
गुरुविणें न घडे परमा गती; गति शुकादि गुरूसचि मागती; ।
परि गुरू करि अंतर राघवीं; न गुरु तो ठक दांभिक लाघवी. ॥ ३७
तो बाप, जो राघवभक्ति दावी, तशीच जी मायहि ते वदावी; ।
जो राम दावी, गुरु तोचि साच; श्रुत्यर्थ, इत्यर्थ असे असाच. ॥ ३८
वसिष्ठ घे राज्य म्हणे न साच; परंतु भावार्थ नव्हे तसाच; ।
त्याच्या परीक्षार्थचि बोलिलाहो; त्याहूनि आधीं मुनि चालिला हो. ॥ ३९
आज्ञा गुरूची अवघे करीती; सच्छिष्य ते लोक अलोकरीती; ।
परंतु त्याच्या वचनें तयातें न टाकिती सत्पददातयातें. ॥ ४०
राम तोचि गुरु; भेद असेना; भिन्न भाव तरि राम दिसेना; ।
राम टाकि म्हणणेंचि गुरूचा त्याग आत्मसुखकल्पतरूचा. ॥ ४१
'तूं टाकि माझ्या वचनेंचि मातें' शब्दें अशा, जो गुरुसत्तमातें ।
टाकील, शिष्याधम तो गणावा; टाकी न जो उत्तम तो म्हणावा. ॥ ४२
राम न त्यजि, तईंच गुरूतें न त्यजी स्वसुखकल्पतरूतें; ।
जो असें वचनही न मनी, तो श्रीगुरू न, मनिंही नमनीं तो. ॥ ४३
लंघूनि शब्दहि असा, गुरु तो उपेक्षी शिष्यासि त्या; मग कसा गुरु तो अपेक्षी ?।
जो रामनिष्ठ, गुरुनिष्ठचि निर्विकारें, सोडी वसिष्ठ भरतासि तया प्रकारें.॥ ४४
म्हणे परीक्षार्थचि 'टाकि मातें,' तसा म्हणे 'टाकि रघूत्तमातें.' ।
उल्लंघितां शब्दचि इष्ट वाटे; म्हणोनि लागे ऋषिवर्य वाटे. ॥ ४५
प्रकरणीं पुढिल्या गुरुराज तो भरतसंगतिनेंच विराजतो; ।
जरि पथीं गुरु होय समागमीं; तरिच राम मिळे निगमागमीं. ॥ ४६
वसिष्ठ, तो, आणि समस्त माया, रामार्थ टाकूनि समग्र माया, ।
सेना, प्रजा, सर्वहि त्याच वेळे जाती; जसे लंघिति सिंधु वेळे. ॥ ४७

१. मार्गाला. २. वेदशास्त्रांत. ३. माता. ४. ममता.

पायीं निघे भरत सानुज रामवाटे; रामाविणें इतर इष्ट न काम वाटे. ।
माथां जटामुकुट, वल्कल नेसला, हो! श्रीरामवेष, वदनीं प्रभुनामलाहो. ४८
रामवल्कलजटादिक रीती; वेष तो उभय बंधु करीती; ।
राम सानुज तशा भरतातें देखती सकळ रामरतातें. ॥ ४९
तों भेटला गुहकनाम किरात वाटे; श्रीरामभक्त परमाप्त तयास वाटे; ।
गंगातटीं रघुपतीशयनास दावी; ते भक्ति काय म्हणुनी मुखिं हो! वदावी? ५०
दर्भनिर्मित तया शयनातें देखतां, उदक ये नयनातें; ।
भूतळीं भरत घालुनि घे हो! त्या स्थळींहुनि न चित्त निघे हो. ॥ ५१
रामवृत्त रघुवंशवरातें सर्व वर्णुनि, गुहाख्यकिरातें, ।
लंघुनी सुरनदी, भरतातें ने ससैन्य रघुराजरतातें. ॥ ५२
'ब्रह्मा रमा वंदिति नित्य ज्यातें, त्या राघवाच्या चरणांबुजातें ।
पाहूं बरें,' हे भरता असोशी; वियोग तो प्राणवियोग सोशी. ॥ ५३
कैकेयीच्या दुष्टभावें जळाला; इच्छी रामाच्या पदाच्या जळाला; ।
तों स्वामीच्या देखिलें आश्रमातें; कांहीं चित्तें टाकिलें हो श्रमातें. ॥ ५४
पादचिन्हित तये वसुधेतें देखतां तृषित जेविं सुधेतें; ।
रामचंद्रपदसारसमुद्रा वाढवी भरतसौख्यसमुद्रा. ॥ ५५
घालुनि घे भरत, देखुनि त्या रजातें; शत्रुघ्नही अनुसरोनी निजाग्रजातें; ।
चित्त स्मरे प्रभुचिया पदनीरजातें; प्रेमप्रवाह नयनीं सुखनीर जातें. ॥ ५६
तळुंवरी गुढियाच उभारती; कविमुखें किति वर्णिल भारती? ।
भरत ये रितिनें अजि लोळला; प्रभुपदाब्जरजीं बहु घोळला. ॥ ५७
'हा राम! राम! रघुनंदन!' हेंचि वाचे; चित्तांत ते चरण दीसति राघवाचे; ।
'ते रेणु हे, मुकुटमंडण जे शिवाचे;' ऐसें म्हणे, त्यजुनी भाव अहो जिवाचे. ॥ ५८
भरत पदरजीं त्या घोळला दीर्घकाळ;
त्रिभुवनिंहि सुखाचा होय तेव्हां सुकाळ; ।
'न मिळति पदरेणू जे विरिंच्यादिकां ही,
सुलभ मज' म्हणे 'हें भाग्य माझेंचि कांहीं.' ॥ ५९

---

१. कोळी. २. भासे. ३. उत्कट इच्छा. ४. दग्ध झाला. ५. पदकमलाचें चिन्ह. ६. कमलातें. ७. आनंदाश्रु. ८. कमल. ९. ब्रह्मादिकां.

देखोनि राघवपदाब्जरजास वाटे, लोटांगणीं गडबडी सुख फार वाटे; ।
आनंदनीर[1] हृदयीं नयनांबुजाचें[2], चित्तांत रामपद घे रज अंबुजाचें[3]. ॥ ६०
वामअंकगत भूमिकुमारी, वामबाहु सुरता सुकुमारी; ।
वल्कलांबर जटा अभिरामा, देखतो भरत त्या रघुरामा. ॥ ६१
दूर्वादलश्यामल दीप्ति[4] देहीं; सेवी पदें लक्ष्मण तो विदेही[5]; ।
गंगातटीं सेवित मंदवातें, देखे अशा श्रीरघुपुंगवातें[6]. ॥ ६२
देखोनि ऐसें रघुनंदनातें, धांवे त्वरेनें पदवंदनातें; ।
अलभ्य जो हर्ष सुरादिकांही, तो होय; त्यामाजिच शोक कांहीं. ॥ ६३
रडे; फुंदफुंदे; शिरीं पादपद्मा धरी; सद्म[8] मानीतसे नित्य पद्मा[9]; ।
बळें क्षेमें[10] दे त्यास ओढूनि राम, स्वभक्तप्रिय स्वामि विश्वाभिराम. ॥ ६४
मांडियेउपरि बैसविला हो; अश्रुनीर पुशि दे सुखलाहो; ।
'बांसरा! न रड; सांग सुवार्ता;' अब्द हा निववि दुःखदवार्ता[12]. ॥ ६५
तों देखिला गुरु वसिष्ठ; तयास वंदी; ब्रह्मण्य देव जडला चरणारविंदीं[13]; ।
तों माउल्या तिघिहि सत्वर पावल्या हो; भेटोनियां तिघिहि सत्वर सेविल्या हो. ६६
'पिता सुखी कीं?' म्हणतांचि, रामा रडोनि त्या सांगति सूपरामा. ।
रडे अहो रामही लोकरीती; स्त्रिया पुन्हा शोक महा करीती. ॥ ६७
सपिंडीक्रिया राम गंगेतटाकीं करी, आणि तो पिंड गंगेंत टाकी; ।
रडे, लोकदृष्टीस शोकश्रमातें प्रभू दावुनी, ये पुन्हा आश्रमातें. ॥ ६८
तों वदे भरत गोष्टि मनाची; प्रार्थना बहुत आगमनाची ।
मांडिली; परि न राघव मानी; देखतां सुरवरांस विमानीं. ॥ ६९
झणि फिरे स्वपुरीप्रति राम हा, म्हणुनि औधि मनीं अमरां[16] महा; ।
भरतशब्द तदर्थ नये मना; पुरवणें प्रभुला सुरकामना[17]. ॥ ७०
'आज्ञा पित्याची मज मोडवेना; वत्सा! तुझी गोष्टिहि तोडवेना; ।
घालूं नको बा! मज संकटांत; नको पडों या सहसा हटांत.' ॥ ७१
अशी आयके जेधवां रामवाणी; मुखश्री करी बंधु तो दीनवाणी; ।
म्हणे, 'तातआज्ञा मृगांकानना[18] रे! मला सांग; जाईन मी कानना रे!'॥ ७२

---

१. अश्रु. २. नेत्रकमलाचें. ३. कमळानें. ४. कांति. ५. विरक्त. ६. श्रेष्ठातें. ७. कमलास. ८. घर. ९. लक्ष्मी. १०. आलिंगन. ११. दुःखरूपी दावाग्नीनें पीडितेला. १२. ब्राह्मणांचा सत्कार करणारा. १३. पादकमलीं. १४. जन्ममरणा. १५. मनोरथा. १६. देवांना. १७. देवांची इच्छा. १८. हे चंद्रवदना रामा.

'बापा ! ऐसें वर्ततां तों विशेषें आज्ञाभंग प्राप्त दोघां अशेषें; ।
एवं राज्यातें तुवां रे ! भजावें; ताताज्ञेनें कानना म्यांच जावें.' ॥ ७३
अशी आयके जेधवां रामवाचा, करी कर्म, जें बंध तोडी भवाचा[1]; ।
पुढें पांचवा भाव त्यामाजि वाचा; स्मरा, आयका, बंध तोडा भवाचा.॥ ७४
येना असा भरत देखुनि रामराया, गंगातटीं रचुनि दर्भ बसे मराया; ।
पाहे वसिष्ठमुनिवक्त्रसरोरुहातें[2] श्रीराम, आणि खुण दाखवि हो स्वहातें. ॥ ७५
कीं 'सांग गुह्य अवतारचरित्र याला, जें तारितें चहुं युगांत जगत्रयाला' ।
बोले वसिष्ठ मग संनिध जाउनीयां 'कां प्राण टाकिसि ?' म्हणे समजावुनीयां. ७६
'हा राम मारिल दशाननासी, यालागिं जातो प्रभु काननासी; ।
नको निवारूं भरता ! तयाला; ब्रह्मादिकांच्या पददातयाला. ॥ ७७
येणार मागुति चतुर्दशवत्सरांतीं; राहो वनांत तितुके दिन आणि रातीं; ।
आत्माच तो, तुज वियोग तयाशिं नाहीं; येऊनियां करिल जे तव कामना ही.'॥
हें आयकोनि, जरि शोकहि दूर केला, प्रत्यक्ष दर्शनसुखास बहु भुकेला; ।
तेव्हां, उठोनि भरतें पदवंदनातें केलें, दुरूनि; म्हणतो रघुनंदनातें. ॥ ७९
देखोनियां गमननिग्रह[3] राघवाचा, बोले उभा भरत निश्चयरूप वाचा; ।
'वर्षें चतुर्दशवरीच धरीन देहा; त्यानंतरें त्यजिन, यास निरोप दे हा. ॥ ८०
वर्षें द्विसप्तभरि काल समाप्त झाला; त्यानंतरें अजि तुझ्या चरणांबुजाला ।
स्पर्शें शिरें न जरि देह, तयाच वारीं, यातें त्यजीनचि विरिंचि[4] जरी निवारी.॥
वर्षें चतुर्दशहि रक्षिन, शासनातें[5] अंगीकरीन, न बसेन नृपासनातें; ।
सिंहासनावरि तुझ्या पदपादुका मी पूजीन जो तव पदांबुजलाभकामी.' ॥ ८२
पादुका जडित आणुनि हातें, रामचंद्र चरणांबुरुहातें[6] ।
लावुनी, निजशिरीं भरतानें वंदिल्या रघुवरांघ्रिरतानें. ॥ ८३

भरतजननि जागी होय रामप्रतापें;
विकल रघुपतीच्या द्रोहपापानुतापें; ।
रडत म्हणतसे, 'मी पापिणी रामराया!
न धरिन तनु; आज्ञा ये स्थळीं दे मराया.' ॥ ८४
रघुपति तिस बोले, 'टाकि हा शोक माते!
इतुकिहि मम माया, जींत ही सृष्टि भाते[7]; ।

---

१. लेकराला. २. कमलातें. ३. निश्चय. ४. ब्रह्मा. ५. आज्ञेतें. ६. चरणकमलातें. ७. शोभते.

सकलहि सुरकार्या स्यांचि हा हेतु केला;
अमर दशमुखाच्या मृत्युतें हो भुकेला. ॥ ८५

म्हणी हो कैकेयी! बुडविशि तुं शोकांत हृदया,
तुझी माझे ठायीं सुमति भरताहूनि सुदया; ।
तुतें मी कौसल्येहुनि अधिक माते! समजतों;
तुवां ऐसें केलें म्हणउनि, न वाटेच मज तों. ॥ ८६

म्हणे मंथरा, 'रामराज्यार्थ सिद्धी करीतो तुझा हो पती हे प्रसिद्धी'. ।
तुवां इष्ट मानूनि त्या भारतीतें, दिला टाकुनी कंठिंचा हार तीतें. ॥ ८७
शरीरीं तुझ्या यापरी देवमाया! रिघोनी करी ये रितीनें भ्रमा या; ।
तुझा यांत अन्याय कांहींच नाहीं; करी मोह माया विरिंच्यादिकांहीं.॥ ८८
करुनि मारुति बुद्धि सकोमला, क्षणभरी विसरूंचि नको मला; ।
तरि असा न पडे भ्रम मारुती; जितचि पावशि हो परमा गती.' ॥ ८९
भरतभाव असा बरवा मनें सुरस सेवुनि सादर वामनें; ।
अजि समर्पियला पदवंदनीं, रचुनि पद्यपदें रघुनंदनीं. ॥ ९०
हरिगुणीं ग्रथिल्या यमकां पहा; धरिल थोर भयें यम कांप हा; ।
हरिगुणाविण हो यमकां करी, करि न दंड धरी यम कां करी? ॥ ९१
राम तुष्ट अशिया यमकां हो; आणिखी नियम संयम कां हो; ।
वामनें हरिगुणीं रसनेला अर्पितां, अनुभवीं रस नेला. ॥ ९२

लोपामुद्रासंवाद.[2]

वंदूनि श्रीराम संसारसाक्षी, ज्याचे अंकीं जानकी सारसाक्षी;[3] ।
लोपामुद्रेशीं[4] तिशीं[5] शब्दमाला झाल्या, अर्पूं त्याचि सर्वोत्तमाला. ॥ १
मारूनि रावण, विदेहसुता[6]श्रमातें नासूनि, ये कलशसंभव[7]आश्रमातें. ।
तो सिंधु बिंदु करि, हा मनिं गर्व वाहे त्याची वधू, विदितसे मति राघवा हे.॥२
'न तीपुढें सेतुकथा वदावी,' म्हणोनि सीतेप्रति भाव दावी; ।
'बोलोनिही सांवरिजे स्ववाचा,' हा शब्द तो सूचवि लाघवाचा. ॥ ३
विचारी मनीं सर्वसंसारसाक्षी, जरी वारिली जानकी सारसाक्षी, ।
सदा सेतुलीलानिजभ्यास तीतें; वदेल स्ववाचें ऋषीचे सतीतें. ॥ ४

---

१. वाणीतें. २. हें प्रकरण रामायणाच्या युद्धकांडांत आहे. ३. कमलनेत्री. ४. अगस्तिमुनींची पत्नी. ५. सीतेशीं. ६. जनककन्येच्या दुःखास. ७. अगस्तीच्या आश्रमास. ८. स्त्री.

पापरी कधुनि ते शुकवाणी राम गोष्टि अशि कौतुकवाणी; ।
क्षारसिंधु करितांचि समुद्रा, हे करी कुशळबुद्धिस मुद्रा. ॥ ५

'सर्व कथा कथि अगस्तिवधूसि सीते! [1]क्षाराब्धिसेतुरचना न कथीं सतीतें. ।
कीं चूळ जो जलधिचा करि, त्या मुनीची कांता म्हणेल तव वल्लभकीर्ति नीची.' ॥ ६

'प्रमाण आज्ञा' म्हणऊनि, [2]रामा वंदूनि जातां मुनिवर्यधामा, ।
पुसे तिला क्षेम, तया प्रसंगीं संवाद हा राघवविप्रसंगीं. ॥ ७

'राम तो स्वरत नित्य विरक्त, हा नसेल तुजशीं अनुरक्त, ।
कीं असेल सुख तें वद सीते! सांग गोष्टिहि सुखप्रदसी ते. ॥ ८

काय बोलत असे अभिराम, श्रांत तूज अवलोकुनि, राम? ।
सांग आणिकहि वल्लभवार्ता. ज्या कथा करिति सौख्य [3]भैवार्ता.' ॥ ९

'स्वरत अद्वय राम असे खरा, मजसि यांशि गुणें रघुशेखरा? ।
स्थिरचरात्मपणें रमणें सये! जरि अहंममतादि न यास ये.' ॥ १०

'विरक्त बाई! रघुराज साचा, भोळा नव्हे राजसतामसांचा; ।
[4]नै या बहू [5]कल्पतरूपमातें हे सोहळे [6]कल्पितरूप मातें. ॥ ११

जशि बहु [7]रवितप्ता सावली गोड वाटे,
तशि बनिं पतिलाडें मानितें [8]कोड वाटे; ।
घरिंहुनि मज बाई! सोहळे [9]काननाचे;
[10]संजलजलदसंगें मोर हो! कां न नाचे? ॥ १२

[11]पथीं मार्गें, मार्गें परम[12]अनुरागें रघुपती
उभा राहे, पाहे; गुणहि मुनि हे हेचि जपती. ।
[13]कृपापांगें अंगें निववि, करि संसार [14]धिर्वसा;
[15]धरा माता, [16]भ्राता शशिच [17]सविता होय दिवसा. ॥ १३

रघुपतिसह शय्या भूमि हे माय वाटे,
मृदु सुपथिंहुनीही माय त्या पायवाटे. ।

---

१. 'क्षाराब्धिसेतुरचना नगरी सतीतें' असाही पाठ आहे. २. सुंदरी. (सीता.) ३. संसारानें पीडितास. ४. 'दया बहू कल्पतरूपमातें' असाही पाठ आहे. ५. कल्पवृक्षतुल्यातें. ६. कल्पिल्याप्रमाणें. ७. सूर्याच्या उष्णानें तापलेल्यास. ८. कौतुक. ९. वनाचे. १०. जलयुक्त मेघाबरोबर. ११. 'पथीं मार्गें मार्गें' असाही पाठ आहे. १२. प्रीतीनें. १३. कृपाकटाक्षें. १४. हव्यासाचा संसार. १५. पृथ्वी. १६. भाऊ. १७. सूर्य दिवसास चंद्रासारखा सुखद होय म्हणून तो भाऊच होय. (सीता लक्ष्मीचा अवतार असल्यामुळें चंद्र तिचा भाऊ झाला.)

श्वशुर दिनमणीही होय एणांक भाऊ,
न कळत जन ऐसे क्लेश निःशेष भावू. ॥ १४

पवन वनसुवासें, उष्ण होतांचि, वाटे
उपजवि सुख, पुत्रस्वामिनी ज्यासि वाटे; ।
तनु करि अनुसूया नित्य ओली सुगंधें;
नव्हति अझुनि बाई! म्लान पुष्पें सुगंधें. ॥ १५

तिथें पावलों अत्रिच्या आश्रमातें, तयाची वधू ते हरी हो! श्रमातें; ।
तयीं हार हे गंध लावूनि घाली, स्वे आतिथ्य कौशल्य दावूं निघाली. ॥ १६
ये देखतां बहु कृपा मज दत्तमाते, पूजूनि ये रिति वदे सति उत्तमा ते; ।
'वेणी फणी करिल हो! तुज कोण वाटे? बाईट हें मज' म्हणे सति 'फार वाटे'. ॥
'म्लानता कधि न येो सुमनातें, केश क्लेश न कल्स्त मनातें; ।
गंध आर्द्रचि असो' अनुसूया दे असा वर, न जीस असूया. ॥ १८

करतळ न दुखों दे फोड हो जेविं पाणी,
वनिं धरि मन माझें ये रिती चापपाणी; ।
'कनकमृग' म्हणें तों पाठिसी राम लागे,
दशमुख हरि ऐशामाजि मेला मला गे! ॥ १९

मृग प्राण सोडी, तयीं दीनवाणी 'अरे लक्ष्मणा! धांव' ऐशी सुवाणी ।
वदे, तों मला रामवाणीच वाटे, म्हणोनि बळें लाविलें त्यांस वाटे. ॥ २०
न जातां, तया बोलिलें दुष्ट वाचा, 'अरे! घात तूं इच्छिसी राघवाचा; ।
तुला प्राप्त होणार का देवेरा! मी? धरीसी असा कां' म्हणें 'भाव रामीं.' ॥ २१
अशा शब्दबाणीं सुमित्रात्मजाला अहो! विंधितां, तो मृतप्राय झाला; ।
रडे, जाय तो राघवा लोकपाळा, करूं काय आतां? म्हणें मी कपाळा. ॥ २२
जाय तो रडत दाटत कंठ, प्राप्त होय मजला दशकंठ; ।
पद्मिनी उपडितो गज हस्तीं, ने तसा उचलुनी मज हस्तीं. ॥ २३

अशि सकळ अनर्था मूळ माझीच वाणी;
धरुनि मज पळे, तैं होय मी दीनवाणी; ।

१. सूर्यही. २. मृगांक, चंद्र. ३. 'स्व आतिथ्य कौशल्य दावूनि घाली' असाही पाठ आहे. ४. दत्तात्रेयमातेस. (अनुसूयेस.) ५. येवो. ६. पुष्पांतें. ७. मत्सर, हेवा. ८. हात. (तळहातींच्या फोडाप्रमाणें असा भाव.) ९. दीनासारिखी. १०. 'त्यांचि वाटे' असाही पाठ आहे. ११. हे दिरा. १२. लक्ष्मणाला. १३. कमलिनी. १४. शुंडेनें.

बहुत मजनिमित्यें राघवें शोक केला.
करुण म्हणुनि; न स्त्रीकामकामीं भुकेला. ॥ २४
मज निमित्त करी गडि वानरां, सुलभ जो न सुरां, अथवा नरां; ।
धरि मदर्थ असा व्यवसाय कीं, दशमुखा वधि राघव सायकीं. ॥ २५
धरि[१] करीं कमला[२] कमलापती मथुनि सिंधु, तसाचि मला पती. ।
जलधिमध्यपुरींत[३] तिचा धणी, वधुनि, दे मज आत्मसुखें धणी. ॥ २६
जे जळांत बुडणार तीर्थें, ते, थोर पर्वत अहो पतिव्रते! ।
सागरीं तरति, सेतुवाट ते, हे अतर्क्य करणीच वाटते. ॥ २७
परततां जलधीवरि पाहतें, तरति पर्वत, विस्मित राहतें; ।
जळ तळीं, वरि हो धरणी, सये! करि नसे तुलना करणीस ये[५].' ॥ २८
समुद्रावरी सैन्य ये पायवाटे, मनीं हें सदा जीस आश्चर्य वाटे, ।
कशी सेतुची गोष्टि तीच्या मुखाचे नये? बोल ते बीसरे राघवाचे. ॥ २९
शरीरीं भरे वर्णितां रामवारें, उठाणें मनाचीं तयीं दुर्निवारें; ।
पतीचीं यशें जे निरूपीत जाते, वदे गोष्टि हेही विदेहात्मजा ते. ॥ ३०
विदेहात्मजा पावली विस्मृतीतें, म्हणे, 'बांधिला सिंधु' जों त्या सतीतें ।
जसें हास्य ये, स्वामिचे भारतीतें[६] स्मरे, तों स्फुरे हा चमत्कार तीतें. ॥ ३१
'क्षाराब्धिसेतु म्हणि सांगसि तीस सीते! जीचा पती जळधि चूळ करी, तशीतें;' ।
शब्दांत या रघुपतीच खुणेस दावी, कीं क्षार मूत्र अशि गोष्टि पुन्हा वदावी. ॥ ३२
म्हणे लोपामुद्रा, 'चुळभरि समुद्रा करि पती;
तया या आयासें करुनि उतरे कां रघुपती?' ।
'द्विजाच्या हो! मूत्रा शिवति अपवित्रा न कपि ते',
म्हणे सीता 'नाहीं तरि सगिरिसप्ताब्धिहि पिते.' ॥ ३३
लोपामुद्रेशीं असा राघवाचा संवाद; श्रीजानकीची मुखाचा ।
बोले वाणी; बुद्धि जे वामनाची वर्णी; रामीं हेचि सेवा मनाची. ॥ ३४

---

१. बाणांनीं. २. लक्ष्मी. ३. समुद्रांतल्या नगरींत. (लंकेंत.) ४. तात्काळ. ५. या कृत्यास तुलना करी असा नसे. ६. वाणीतें. (लोपामुद्रेस हसें येतांच सीतेस रामाच्या बोलण्याचें स्मरण झालें.)

महाभारतांतील आख्यानें.

विराटपर्व.

(श्लोक.)

अध्याय पहिला.

वंदूनि पादकमळा कमळावरानें[1] जें पूजिलें हर विरिंचि[2] सुरेश्वरानें[3], ।
आरंभि तत्प्रियकथानक वैभवाचें वाचा करि, सकळ दोष हरी भवाचे. ॥ १
न ज्यांत ये हरिकथा अणि तत्प्रियांची, धिग् वैखरी जरि सरस्वति आलयाची.।
चातुर्य व्यर्थ, कविता जनभाळणा हो; शोभेल किंशुकफुलीं सुरभींळ ना हो! ॥ २
नेणें सद्गुरुलक्षणें क्षणलवें तत्संग संरक्षणें,
केलीं नाहिं निरीक्षणें तमभरें मनेत्रदुर्लक्षणें; ।
माझा थादा मायबाप मजला तारी दयाईक्षणें;
त्याचे पंक्तिस षड्रसान्न समयीं केलीं सदा भक्षणें. ॥ ३
प्रभावें तया षड्रसान्ना रसाच्या, मनोभृंग किंचित् कथासोरसाच्या ।
हरीच्या जडे कीं कृपा अक्षपातें; सदा पाहिलें माझिया वक्षपातें. ॥ ४
ऐका कथा सरस भारतवंशकाची; काची मती श्रम हरी जन साधकाची; ।
लाधेल उंच पद सज्जन अक्षराचें; होतां च या श्रवण सत्कथनाक्षराचें. ॥५
श्रीमद्भारत वेदसार म्हणवी अष्टादशी पर्व जें,
त्यांमाजी चवथें विराट वदला श्रीव्यास आपूर्व जें, ।
वैशंपायन सांग सांगत कथा, जन्मेजयाच्या मना
जेणें होय विशेष पूर्वजकथा ऐकावया कामना. ॥ ६
म्हणे भूपती, 'भारताची कथा रे! न ऐकें तरी काळ वाटे वृथा रे! ।
न थारे मनीं स्वल्प संदेह, जाची, तरी सांग पूढें स्थिती पूर्वजांची. ॥ ७
वर्षें द्वादश लोटली न घटली ज्यांची धि रे! काननीं;
ते जैशी द्रुपदात्मजा विचरली सत्वें मृगांकाननी; ।
तें सर्वज्ञमुखें तुझ्या कडुनियां आकर्णिलें विस्तरें;
आतां सांग चरित्र जें प्रगटलें अज्ञातवासांत रे!' ॥ ८

---

१ विष्णु. २. ब्रह्मा. ३. इंद्र. ४. संसार. ५. वाणी. ६. पळस. ७. कपाळ. ८. अवलोकन. ९. कमळ. १०. अरण्यांत. ११. चंद्रमुखी.

मुनि म्हणे, 'अइकें नृपकेसरी ! सग्‍गुणतेस तुझ्या न टिके सैरी[1]; ।
करिसि प्रश्न अलौलिक फारसा; करुनियां मन निर्मळ आरसा. ॥ ९
प्रमाग संवत्सर द्वादशांचें, वनीं क्रमोनी अतिदुर्दशांचें, ।
'अज्ञातवासास कसें करावें?' तो धर्म बोले अतिशोकरावें[2]. ॥ १०
सुचेना पुढें कांहिं त्या अद्वयातें; विचारी तदा द्वंद्व बंधुद्वयातें. ।
'असे लोटणें बाप हो ! एक साला; महादुष्ट संताप होये कसाला. ॥ ११

क्षुधा बाधी, साधी कवण तर्‍हि या वायुतनया ?
न याया सिंधूला सकळ नृपती लीन विनया; ।
न याच्या सामर्थ्यासम बळि असे अन्य दुसरा;
सराया युद्धीं या कठिण कर दुर्मुष्टि घसरा. ॥ १२

गांडीवपाणि[3] तरणीकर[4]तुल्य भा ज्या, भाज्यांपरी खुडि शिरें रिपुचीं सभा ज्या; ।
ऐसा कसा परम संकटवासकाळीं कालिंदिवल्लभसखा प्रभू सकाळीं ? ॥ १३

नकुळ कुळमणी हा शस्त्रपाणी सदा ही,
अगणितरिपुवृंदें[5] बाणअग्नींत दाही; ।
अनुज हि नकुळाचा त्यापरी विक्रमी[6] रे !
ज्वलित ज्वलन[7] जैसा दावि होई समीरें[8]. ॥ १४

सुधा[9]तुल्य जीची अती गोड वाणी, बरी साजिरी गोजरी गोडवाणी; ।
अशा द्रौपदीच्या धरी काळजीला, न ठावा अशा संकटीं काळ जीला.' ॥ १५

अशा नाना दुःखें विलपत नृपा धर्मसुत रे !
तरे ज्याच्या नामें जन भवनदी सौख्यवत रे ! ।
तरी सत्वाचा तो उदधि[10] न शिवे पातकमळा;
मला सौजन्याचा सदय मधुजा चित्तकमळा. ॥ १६

ऐकोनि त्याच्या वचनप्रभावा, भावामनीं सौख्य न सत्वभावा. ।
भावार्थ कीं हा अमुच्या श्रमानें, माने जणूं टाकिल स्वप्रमाणें. ॥ १७
आम्हांनिमित्त श्रम होति समग्र ज्यातें, हें जाणुनी विनविती मग अग्रजातें; ।
'कां क्लेश फार करिसी ? नृपसत्वशीळा ! शीळापरी मन किजे आपदीं[11] सुशीळा !

१. बरोबरी. २. स्वरानें. ३. गांडीव नामक धनुष्य आहे हातीं ज्याच्या. ४. सूर्याचे किरण. ५. समूह. ६. पराक्रमी. ७. अग्नि. ८. वाऱ्यानें. ९. अमृत. १०. सागर. ११. विपत्तींत.

चिंता धरीं न अमुची च जिवीं, क्रमाया मायानदीस परि संकट निक्रमा या: ।
माया मनांतुनि तुला निज बाळकाची, कार्चीं मुलें श्रमति कीं महिपाळकाचीं.' ॥
कुंतिचा मधिल बाळक त्यारें, बोलिला अमृतरूप विसारें; ।
स्वर्गपाळरमणीशिं रमेना; शाप दे म्हणुनि सुंदर मेना. ॥ १०
षंढत्व पावसि असें चतुर प्रवीणा ! वीणा करीं वदलि शाप वेंधू नवीना. ।
वीणार जे मज, तिच्या कळलें पतीतें; तीतें म्हणे, 'कवण शाप दिला पती तें?' ॥
नाकेश जाणुनि पुढील भविष्यमाणा; 'मानाब्द एक इच्छिला वचन प्रमाणा ।
मानीं; न हानि तुज संकटिच्या प्रसंगीं; संगीत नृत्य शिकवीं निज क्षिप्र संगीं.'
ऐक त्यावरि नृपा ! नकुळाचें बोलणें परम सानुकुळाचें; ।
अश्वशिक्षण कळा कुसरी त्या जाणता, अन नसे च सरी त्या. ॥ २३
'नाचवीन तुरगास लगामीं; लावितां कर करीं नमनामीं; ।
वायुवेगगति ते समरांगणीं, नाकलोकपति पाहुनियां गणी.' ॥ २४
'सेवीन अश्वां नरपुंगवाच्या;' वाचाळ माद्रेय वदे 'सताच्या ।
श्रेणी भल्या राखिन एकनिष्ठे;' हें [illegible] ॥ २५
'पाकक्रियाकुशळ मी निपुणांत राया ! हें [illegible] ।
आहे उपाय मज हा तनुपोषणासी, पाहोनि पाक [illegible].' ॥ २६
त्यावरी वदे अग्निसंभवा, भोगणार जे नित्य वैभवा; ।
'सत्वशीळ तूं त्या तुला कसा मोह योग्य ? हा टाकिं ओकसा. ॥ २७
सैरंध्रि मी होउनियां सुशीला ! शीलावती राजजाया अशीला ।
शीळाचित्ता मी तया मानिनीची नीचा सेवा सेविं पद्माननीची.' ॥ २८
ऐकोनि हें वचन पंकजलोचनीचें, नीचीं मुखीं भरतसे जळ लोचनींचें. ।
ऐसा युधिष्ठिर म्हणे, 'सुख पावलों कीं, लौकीक योग्य अबळे ! कर भाव लोकीं.' ॥
सकळ बंधु ते आणि योषिता म्हणति, 'ऐक जी ! सत्वभूपिता ! ।
केविं लोपसी ? ज्या तुझ्या नसे उदय ऊपमे देव मानसे. ॥ ३०
कष्ट भोगिले काननीं तसे, हे नव्हेत कीं बहु अनीतसे. ।
परघरांत हा वास नष्ट कीं, भोगणें तुम्हां परम कष्ट कीं.' ॥ ३१
म्हणे धर्म, 'मी घेउनी विप्रवेशा, सुखें राजगेहीं करीन प्रवेशा; ।
सदां खेळुनी तोषवीं अक्ष राया, मनोदेशिचा जाणिजे अक्षरा या.' ॥ ३२

---

१. अप्सरा. २. मेनका अप्सरा. ३. स्त्री. (अप्सरा). ४. इंद्र. ५. पंक्ति, समूह. ६. द्रौपदी. ७. शिल्पज्ञ स्त्री. ८. कमळमुखीची. ९. कमलनेत्रीचें. १०. फांसे.

कंक बल्लव आणि बृहन्नळा नाम कुंतितनयांस कूशळा ! ।
दामग्रंथि नकुळास नाम रे ! तंतिपाळ सहदेव जाण रे ! ॥ ३३
योजूनि ऐशा परमा हितातें, त्यानंतरें धौम्य पुरोहितातें ।
वंदोनि त्या, त्या अवनीपतीनें भीमादिबंधू सहदंपतीनें. ॥ ३४
कूळ गोत्र सकळ प्रवरासी जाणता परम विप्रवराशी, ।
त्या गुरूस विनयालय वाचा, त्वत्समागम म्हणे दइवाचा. ॥ ३५
'प्रमाण एक सरलें खल दुर्जनाचें, नाचेल ही तव सवें सुख काननाचें; ।
नाचेल देखत अम्हा दुसऱ्या प्रमाणी, माणिक्यतुल्य वधु बंधुजनाच मानी. ॥ ३६
आज्ञा तरी क्रमण वत्सर मत्स्यदेशा, दे शार्वरींत गमनास हितोपदेशा; ।
देशाटणा सकळ साधियलें नरानें; रानें वनें बहुत याच कि दे वरा ने. ॥ ३७
जेथें सदा धर्मदिवा नवाहे; वाहे नदी भागिरथी प्रवाहें; ।
वाहे मृषा आण न देशवासी; सदा मनीं आठवि केशवासी. ॥ ३८
जेथें द्विजावांचुनि देव नाहीं; वाहींभ वाटे नवयौवना हीं; ।
नाहीं [illegible] गीं आठवि पूतनारी. ॥ ३९
असो [illegible] जा सदा लोक गुणाकरा जी, ।
राजी [illegible] राजीत देशीं करुं आसरा जी.' ॥ ४०
तेव्हां तो वदला पुरोहित हि तें जें वर्तिजे आपदीं;
'दीजे मान त्यजोनि सावध मनें हे रक्षिजे द्रौपदी; ।
दीनाचे परि मानिती जन' तरी थोरींव दावूं नये;
येती शोधित शत्रुदूत, लपिजे तेणें पुढें मान ये. ॥ ४१
जेणें राजमनोगतास सुख ये, ऐशी गिरा बोलिजे;
जेथें देशनिधीवधूजन बिदीं, त्या पंथि ना चालिजे; ।
जे जे राजसमंधिक प्रिय सखे, लीनत्व त्यांसी किजे;
जेव्हां सांगिल भूप, कार्य तयिं तें अयोग्य ही ऐकिजे. ॥ ४२
झाले जरी बहुत हीन, तरी त्रयाला विद्वान विप्र, हुतवाहन, क्षत्रियाला ।
ओमानितां, त्वरित होय अपाय साचा;' सांगे असा मुनि समुद्र दयारसाचा. ॥ ४३
'क्षत्री प्राबल्य राष्ट्रे बहु तव अनुजें जिंकिले विक्रमानें;
मानें ऐश्वर्यसिंधू अनुपम असती बाण ज्यांचे क्रमानें; ।

---

१. राजानें. २. अरण्य. ३. विराटराजाचा देश. ४. रात्र. ५. खोटी. ६. तरुणी. ७. पवित्र. ८. कृष्ण. ९. कमलनयना. १०. अग्नि.

माने हा वास दुष्ट श्रमकर क्रर साजो सदा दुःखदायी;
दायादीं ओळखीला, तरि मग च पुन्हां काननींची विदायी.' ॥ ४४
असो. यावरी वंदुनी पाय त्याचे, म्हणे धर्म, 'आम्हांस कुंतीपित्यांचे ।
स्थळीं तूं च कीं ज्ञानवंता उदारा! अशीर्वाद दे गुप्त राह्या सदारा.' ॥ ४५
पांच बंधु वनितेसह ते जी! चालिले मुनिसवें रवितेजी. ।
शस्त्रबद्ध शर कार्मुकपाणी आठवूनि हरि अंबुजपाणी. ॥ ४६
यामिनी शशिप्रिया जयिं माजे, चालती पथिं समस्त समाजें; ।
दाटलें तम समग्र भरानें; एक वर्ण दिसती नभ रानें. ॥ ४७
पथीं चाले, हाले जगति, गति हंसापरि पदीं;
पदींद्राचें ध्याया सबळ पति ऐशीस अपदी; ।
नवीनें पद्में तीं पदतल महा कोमळ तसें;
अशी सौंदर्याची लहरि रजपंकें मळतसे. ॥ ४८
ते पाय ठेवीं जगतीतळा या, अशक्त जे पापमळातळाया. ।
तेव्हां धरा स्पर्श पवित्र तीचा मानी, स्वभाराहरणीं सतीचा. ॥ ४९
न साहे जिला भार रत्नीं नगांचे, चढे ऊतरे घाट यत्नीं नगांचे; ।
जरी कष्ट भारी पथीं काननींचे, तरी सत्व मोठें मृगांकाननीचें. ॥ ५०
क्षणें क्रोधभात्रें चतुर्वंश जाळी, क्रमी ते पदीं दाट दुर्वंशजाळी; ।
मृगेंद्रादिकां त्या स्थळीं स्वस्थ जीणें, पतींच्या बळें मानिलें तुच्छ जीणें. ॥ ५१
दाट वृक्ष झटतां बदरींचे, ज्यांत गर्जति मृगेंद्र दरीचे, ।
राहती विविध श्वापदजाती, त्या पथीं गजगतीपद जाती. ॥ ५२
असे लागले दाट दुर्वृक्ष पाहे, सरे जोंवरी अंधकारी क्षपा हे. ।
यमूनानदी टाकुनी सव्य भागीं, पुढें चालिले कौरवांचे विभागी. ॥ ५३
अशी चालतां ते शशीरूप तंगे, प्रभातेस यायास केलें पतंगें. ।
बहू मातला थाट ऐणीकुळाचा; असे धर्म तो क्षत्रियांच्या कुळाचा. ॥ ५४
प्रगटला भला भूपती रवी; दिग्वधूवरी किरण मीरवी; ।
सर सरोवरें कमळकाननें मधुर बोलती स्वरुपकाननें. ॥ ५५

१. अरण्य. २. स्त्री. ३. बाण. ४. धनुष्य आहे हातीं ज्यांच्या असे. ५. कमळ आहे हातीं ज्याच्या. ६. रात्र ७. चंद्र. ८. आकाश. ९. विपत्ति. १०. अलंकार. ११. पर्वत. १२. चंद्रमुखीचें. १३. बांबूची जाळी म्ह० वेट. १४. सिंह. १५. बोरीचीं झाडें. १६. गजगामिनी. १७. रात्र. १८. डावा. १९. सूर्यानें. २०. हरिणी. २१. अरण्यें. २२. तोंडानें.

नानाफुलीं कुसुम[1]पादप[2] फुलले हो, ते पाहतां मन जिचें पथिं क्षोभलें हो; ।
ते द्रौपदी सहपती अति लोभली हो; विश्रांतिची सरस वाट म्हणे भली हो. ॥ ५६

'मत्स्यादेश सुखा[3]डिक सीमा लागली, परमदिव्य कशी मा[4] ? ।
नांदती सरस शेतमळे रे! न्यून काय कुसमा कमळा रे!' ॥ ५७

त्यानंतरें राहवुनी, मुनीचा निरोप मागे धणि आवनीचा[5]; ।
'तुझ्या प्रसादें प्रकृतिश्रमातें साहोनि, सेवूं नृपआश्रमातें.' ॥ ५८

बोलोनि ऐसें नमि पाय त्याचे, जो धौम्य ठायीं जननीपित्याचे; ।
प्रदक्षणा सव्य ऋषीस घाली; तशी पार्षती[6] त्यांसवें ही निघाली. ॥ ५९

बोलती विटपिं[7] रम्य पिकावली[8], कल्कलाट करिती कपिकावली[9]; ।
मांडिलें सरस नृत्य शिखावळीं[10]; पाहतां द्रुपदि फार सुखावली. ॥ ६०

'हे तापली महि रवीकरकर्कशानें; जाईल यान[11] नसतां श्रम हा कशानें? ।
आतां न पंथ क्रमवे' श्रमली पदीं जे, धर्मा म्हणे अनळसंभव[12] द्रौपदी जे. ॥ ६१

अश्रांत देखूनि वनप्रिया रवा सांगे कनिष्ठा वचन प्रिया रवा; ।
'हे द्रौपदी जे सुकुमार राणी, चालोनियां कष्टलि फार रानीं.' ॥ ६२

जो सखा परम लोकपित्याचा, राखितो ध्वज सदा कपि त्याचा; ।
तो युधिष्टिर रवी सरता धरी स्कंधयान करवी अमृताधरी. ॥ ६३

पुढें देखिले पंथ शेतामळ्यांचे; गुरें चारिती स्तोमें[13] त्या गोवळ्यांचे; ।
म्हणे धर्म बंधूजनप्रीयराशी, 'पहा पैल त्या मत्स्यनाथापुरासी.' ॥ ६४

गांडीवपाणी शरसज्ज हस्तीं; हस्तींद्र जेणें अणिला समस्ती; ।
हस्तीन्हग्रामेश[14] जनप्रसिद्धा, सिद्धा सुबद्धा रणचंडयोद्धा. ॥ ६५

बोले धर्म सुधर्मवाक्य कुशळा बंधूजना लागुनी;
'क्षत्री चापकरी समस्त हि तुम्ही लोपाल कैसे गुणी? ।
आतां गांडिव आदि सर्वहि ठिवा हे पंच इष्वास[15] रे!
वर्षानंतर साधिती जय; असे यांचाच विश्वास रे!' ॥ ६६

पूज्यमान विजयादशमीचा[16], तो विशाळतरु एक शमीचा; ।
ज्या समीप जळती शवराशी, पार्थ दावित महीशवरासी[17]. ॥ ६७

---

१. फुलें. २. झाडें. ३. सुखाची. ४. शोभा. ५. पृथ्वीचा. ६. द्रौपदी. ७. वृक्षांवर. ८. कोकिलपंक्ति. ९. वानर. १०. मोरांनीं. ११. वाहान. १२. अग्नीपासून उत्पन्न झालेली. १३. समूह. १४. हस्तिनापुरचा राजा. १५. धनुष्यें. १६. आश्विनशुद्धदशमी. १७. राजश्रेष्ठाला.

काढोनि संभार शरासनांचे[1], कदंब भाते रिपुनाशनाचे, ।
बांधोनि कृष्णाजिनिं[2] मोट भारी, चढे तरू तो प्रियकंठभारी[3]. ॥ ६८
सदा रक्षिता स्थावराजंगमाचा, गळां शोभतो स्तोम[4] भुजंगमांचा[5]; ।
नमस्कारुनी त्या अशा भूतपाळा, बहू वीनवी धर्म शंभू कृपाळा. ॥ ६९
'शस्त्रास्त्रविद्या पुरती शिकाया, प्रसाद तूझा नरवेशिका या; ।
कृपाकटाक्षें शर, चाप, भाते रक्षीं, जयांची अतुल प्रभा ते.' ॥ ७०
स्तवोनि दिक्पाळ समस्त कीं ते, ठेवोनि शस्त्रें शमिमस्तकीं, ते ।
प्रदक्षिणा घालुनि, ये कसाला, प्रमाण केलें नृप एक साला. ॥ ७१
'उतावळा भीम बहू मनाचा, न साह या स्तोम रिपूजनांचा, ।
येईल शस्त्रास अणावयातें, प्रमाणदीनाविण दे न यातें.' ॥ ७२
सांगोनि ऐसें शमिच्या रुहातें[6], हातें धरी तुंडसरोरुहातें[7]; ।
भीमा म्हणे तो, जगमित्र ज्याचा, कनिष्ठ बंधू वर मित्र ज्याचा. ॥ ७३
'प्रमाण केल्यास्तव एक साला, अज्ञातवासांत भरू कसाला; ।
ऐशा प्रमाणीं मज भाक देशी, तेव्हां सुखें राहिन मत्स्यदेशीं.' ॥ ७४
हांसोनी भिम बोलिला, उकलिला चित्तांतुनी भूपती;
ज्याचा क्रोधभडाग्निधूम्र उठतां शत्रूतृणें लोपती; ।
'स्वामी ! तूं जननी, पिता, समजतां सर्वज्ञ दिव्या दशा,
ऐसा कोण कुशीळ कीं करि तुझी सत्यप्रतिज्ञा मृषा[8].' ॥ ७५
गंभीरवेदी गति चालणारी, तीतें म्हणे धर्मजि, 'चाल नारी !' ।
चतुष्ट बंधूं सह द्रौपदीशीं, ये धर्म वेगें त्रिदशानदीसी. ॥ ७६
अज्ञातवासी श्रममग्न गा ! ते पाहोनि नेत्रीं सुरनिम्नगा[9] ते, ।
आनंद चित्तें सुरनीर तीचें घे द्रौपदी, तेज जिला रतीचें. ॥ ७७
सारोनि स्नानादिक पांडवांहीं, निःशस्त्र तेव्हां धरु चंड बाहीं; ।
प्रार्थोनियां बाप यमास धर्में, 'रक्षीं' म्हणे 'या समयीं स्वधर्में.' ॥ ७८
केली प्रतिज्ञा नदि ऊतराया; प्रसादनौका तव तातराया ! ।
नष्टवास करणी अनुवर्ती तो युधिष्ठिर, स्तवी समवर्ती. ॥ ७९
होउनी मग प्रतक्ष कृतांतें[10] दीधलें अभय फार सुतातें; ।
'अज्ञातवासीं गुण रूप साचें न ओळखे लोचन डोळसाचें.' ॥ ८०

---

१. धनुष्यांचे. २. हरिणाच्या कातड्यांत. ३. प्रिय आहे कृष्ण ज्याला तो. ४. समूह. ५. सर्पांचा. ६. वृक्षाला. ७. मुखकमलास. ८. खोटी. ९. देवनदी भागीरथी. १०. यमानें.

ऐशा वरा त्या दिधलें पित्याला, 'साचें करीं' धर्म वदे पित्याला. ।
प्रसन्न वैवस्वत[1] बोलिला रे, 'कोणी न जाणे तुमची लिला रे ! ॥ ८१
राहाल संवत्सर एक मानें,' वरदान ऐसें दिधलें यमानें; ।
.... ॥ ८२
देऊनि ऐसें वरदान मानें, गंतव्य केल्यावरि त्या यमानें, ।
स्तवी बहू गोकुळदेवि भद्रा[2], बंधु प्रिया ज्यासि असे सुभद्रा; ॥ ८३
'जय जय विश्वकुटुंबिने ! सुनयने ! कृष्णे ! जगन्मोहने !
जय जय दीनदयाघनेंदुवदने ! गोगोरसादोहने ! ।
जय जय सर्वविभूषणे ! बहुगुणे ! विश्वात्मके ! निर्गुणे !
जय जय पांडवरक्षणे ! लव क्षणें सांभाळ दिव्य क्षणें.' ॥ ८४
प्रसन्न झाली वरदा भवानी, गर्जिन्नली थोर नभांत वाणी; ।
आनंदनें तेथुनि चालले ते, ऐकें नृपा ! सावध त्या लिलेतें. ॥ ८५
त्यानंतरें नृपति वेषधरी यतीचा, जो स्वामि होय सकळां नरभूपतींचा; ।
तेव्हां अपूर्व करणी घडली प्रशस्ता, आला अकस्मित रवी समदंडहस्ता. ॥ ८६
कमंडलू घे अपसव्य हातीं; उष्णीष[3] आरक्त शिरीं सुजाती; ।
विचित्र वस्त्रें कुसरी सुरंगी, पाहोनि हांसे नयनीकुरंगी[4]. ॥ ८७
पवित्रें[5] बरीं पंच शाखीं[6] कुशांचीं[7]; झळाळीत शोभा लघू अंकुशाची; ।
कपाळीं त्रिरेखावळी नाम साजें; गळां जानवीं दिव्य शोभा विराजे. ॥ ८८
ऐशापरी धर्म धरी सुवेशा; भीमादिबंधु द्रुपदी सुकेशा; ।
तिहीं स्ववेषा धरुनि प्रकारें, पाहोनि आनंदलि निर्विकारें. ॥ ८९
निजजनामधें ओळखी सरे; नाम ठेविलें गुप्त तीसरें; ।
जय जयंत हे धर्म भीम रे ! विजय ठेविलें पार्थनाम रे ! ॥ ९०
आतां पुढें भेटुनि मत्स्यराया, अज्ञातवासाव्हक मत्सरा या, ।
सेवोनि त्यातें असतील साही, भावार्थ अध्यायदुजीं असा ही. ॥ ९१
मी नेणता परि मला वदवी हरी तो, जो विश्वसंचय रची अणि संहरीतो; ।
हें भारतीं चरित तारुनियां मनाला, दावील कीं जनिं जनार्दन वामनाला. ॥ ९२
श्रीहरिप्रिय कथानक सारें, ऐकतां हरिपथा न कसा ? रे ! ।
पावणार नवलाव कामना, आवडेल नर तोचि वामना. ॥ ९३

---

१. यम. २. गोकुळांतील केवळ भद्रकाली देवीच असा कृष्ण. ३. डोक्यास गुंडाळण्याचें वस्त्र.
४. हरिणी. ५. पवित्रकें. ६. पांच बोटांत. ७. दर्भांचीं.

अध्याय दुसरा.

गजवदन हरी जो सच्चिदानंदराशी,
सुरवरपति शास्ता जंगमाभूधरासी;
वदति निजप्रियाच्या दिव्य कीर्ती विचित्रा;
श्रवणपठणमात्रें तारिती ज्या पवित्रा. ॥ १

मुनि म्हणे, 'जनमेजय! भारता! परम सावध सच्छ्रवणीं रता!।
अइक वृद्धपितामहसत्कथा; विशद निर्मळ दाविल सत्पथा. ॥ २
घेऊनि धर्मादिक वेष सारे, समागमें द्रौपदि राजसा रे!।
सेवूनि मत्स्येशनिकेतनातें[१], केलें प्रतिज्ञादिक गोपनातें[२]. ॥ ३
निशी[३] मारिलें कीचका भीमसेनें; नरें[४] भंगिलें शत्रुच्या भीमें[५] सेनें;।
सुभद्रासुता[६] मत्स्य दे कन्यकेला[७], हरी भेटुनी शब्द हा मान्य केला.' ॥ ४
वैशंपायन सांगतां अशि कथा, जन्मेजयो बोलिला,
'स्वामी! त्वद्वचनामृतें श्रवर्णितां[८] हे पूर्वजांची लिळा,।
माझें चित्त असक्त, कीं परिसिजे विस्तार याचा बरा;
कैशी ते द्रुपदात्मजा[९] विचरली निर्दोष एकांबरा? ॥ ५
कैसे जाउनि भेटले नृपतिला हे पांच ही एकदां?
किंवा भिन्न अभिन्न धीरमत ते, कीं द्रौपदी ये कदां?।
पहिल्यानें नृप काय वाक्य वदला? हेही कशा उत्तरा
देऊनी, नृप तोषला, वद भला त्या सर्वही विस्तरा. ॥ ६
कृष्णा सती गजगती वरंमानिनी[१०] ते, देखोनि काय वदली नृपभामिनी[११] ते?।
कां भीम कीचक वधी? वद गोष्टि साची; वेवस्थ शत्रुस कसा हरि सव्यसाची[१२]?॥ ७
कां दे विराट निज बाळककन्यकेला? ऐकावया श्रवण फार असे भुकेला;।
आतां दया करुनि विस्तर सांग त्याचा; तूं अग्रगण्य निगमागमसांगत्यांचा[१३].'॥ ८
ऐशा परी संचय प्रश्न वाचा, वाचाळ तो बाळक पांडवांचा।
वाचस्पतीतुल्य[१४] गिरा[१५] समर्पी अर्पी अशाचे पदिं सर्पदर्पी[१६]. ॥ ९

---

१. घराला. २. लपविण्यास. ३. रात्री. ४. अर्जुनानें. ५. भयंकर. ६. अभिमन्यूला. ७. उत्तरेला. ८. ऐकतां. ९. द्रौपदी. १०. उत्तम स्त्री. ११. राजाची स्त्री. १२. अर्जुन. १३. वेदशास्त्रज्ञांत. १४. बृहस्पति. १५. वाणी. १६. सत्रांत सर्पांना शिक्षा करणारा जनमेजय.

ऐकूनि प्रश्न द्विजसत्तमानें, मानेस डोलोनि सुखश्रमानें, ।
'माने' म्हणे, 'प्रश्न तुझा भला हो ! लाहो कथेचा तुज चांगला हो.'॥ १०

असो. त्यावरी पांच बंधू सैदारा विराटाल्या चालिले ते उदारा ! ।
महाथोर प्राकार दुर्गास चित्रें; बहू वप्र शोभीत ते वन्हियंत्रें. ॥ ११

सरसघनजळाच्या माजि नक्रादिकांचे
फिरति समुह सारे, त्या अशा खंदकांचे, ।
नगरमुखकपाटें हेमकोंड्याकड्यांचीं,
तदुपरि लघुगृहें तीं चंदनाच्या कड्यांचीं. ॥ १२

शिशुरविकिरणांचें तेज जैसें प्रभाते,
कनकमयपंताकीं दिव्य तैशी प्रभा ते. ।
सघन नगर शाखी नांदती लोक सारे,
वणिज कणिज वस्त्री सर्व विक्रीय सारे. ॥ १३

नगरमुखप्रदेशीं शृंखला देह भातें,
धनुष करकरीसे वेढनी लोहभाते, ।
निशिदिन चौकशीनें जागती तासतासीं;
नृपहि बहुत विश्वासूक मानी दुतासी. ॥ १४

कृष्णवर्ण करवाळ करींचे, भंगणार मदें बोळकरींचे, ।
तिष्ठती नगरशाखमुखीं ते, भीम मल्ल मृगशाखमुखी ते. ॥ १५

वाजती बहु भयाण नगारे, ऐकतां रिपुभयानन गारे; ।
गर्जती रवें भयंकर तुंडें; जे रिपू रण वटी कर तुंडें. ॥ १६

ऐशापरी परम राजित राजधानी पाहूनि, विस्मित कुरूद्भव सावधानी; ।
त्यानंतरें सकळ सज्जित स्व स्व वेशें स्त्रीबंधुयुक्त नृप धर्म पुरी प्रवेशे. ॥ १७

वेढनी खवधुसी अवघे ही, जाय धर्म मग मत्स्यसुगेहीं; ।
शोभला नृपतिमत्सर मानें, ना जयासि मदमत्सर माने. ॥ १८

दुरूनि देखे नृप येत यांतें, पुसे उभे सेवक जे तयांतें. ।
'हा येतसे कोण? प्रभा जयाची दिसे महा सुंदर राजयाची'. ॥ १९

---

१. लाभ. २. स्त्रीसह. ३. धंरास. ४. तट. ५. किल्ला. ६. तोफा. ७. सुसर. ८. सोनें. ९. बाळ. १०. बावटे, ध्वज. ११. काळ्या रंगाचे. १२. तरवारा. १३. गर्व. १४. लहान हत्तींचे. १५. नाद. १६. पांडव. १७. लक्षयुक्त.

अंगप्रभा लोक प्रकाशवी त्या, ऐसा सभा दिव्य प्रकाश वी त्या, ।
निःशंक [1]कंठीरव ये तसा तो देखोनि शंके नृप ये तसा तो. ॥ २०
नृपाभोंवते [2]स्तोमें मंत्रीजैंनांचे बहू बैसले वीर धीरा मनाचे; ।
उभे [4]भाट [4]बंदी, नृपांच्या [5]वळी त्या मुखें वर्णिती राजवंशावळी त्या. ॥ २१
येतां युधिष्ठिर असा नृपतीसभा जी! मंत्रीजना सहित मत्स्यपती उभा जी! ।
राहूनि नम्र निज उत्तम आसनासी ओपी यतींद्र परिपूरितवासनासी. ॥ २२
पाहे तटस्थ नृपती यतिआननाला; हा विप्र होय अइसें मनीं मान नाला; ।
ज्याचा प्रकाश घँटवी रविकीरणांतें, खद्योत सर्व नृप हा रवि कीं रणातें.॥२३
मग म्हणे नृप त्या यतिसत्तमा, 'परम पावन तूं पुरुषोत्तमा! ।
कवण सांग मनांतील कामना? श्रवण इच्छित या मनकामना.' ॥ २४
करी ताण जो हेम अंकूश हस्ती, नृपा तो म्हणे 'स्वस्ति' अंकूशहस्ती; ।
फिरे पिंगदृष्टी जसा एकला हो! न शंके तसा धर्म ही बैसला हो!॥ २५
जो पारमेष्ठ्यपदवीसुविराजमान, मानापमानरहित आजि कसा समान; ।
ज्याच्या पुढें जळति दीपक पंचशाखी, तो धर्मराज करि आशिष पंचशाखी.॥२६
तो नम्र वाचा नृप वीर साचा पाहूनियां शब्द सुधारसाचा, ।
बोले यती, 'एकचि वत्सरा या सेवूं तुझें ओकें चि मत्स्यराया!' ॥ २७

पुन्हा पूसे राजा, 'कवण मज तूं सांग बरवें;
रवें तूझ्या चित्तीं अखिल सुखसौभाग्य वरवे; ।
यतीवेषाची हे तनु तव नसे योग्य विमळा!
मळानें ना लोपे दिनकरमहातेजकमळा. ॥ २८

भावार्थ सारा वद सत्य साचा; हा वेष स्वागीस किती दिसांचा? ।
कोठूनि येणें घडलें कृपाळा? तूं भाससी अग्रगणी नृपाळा. ॥ २९
वदावें खरें नाम साधू! पित्याचें, सदा सेविला जो तुम्हीं भूप त्याचें; ।
स्वदेशा तुम्हीं टाकिलें? कीं नृपानें बळें काढिलें दुर्मतीच्या कुपानें? ॥३०
वदा हेत तो काय आहे मनींचा?' म्हणे नम्र वाचा धणी अवनीचा. ।
'जरी पाहिजे वित्त, गो, हस्ति, वाजी, तरी अर्पितों सर्वही वैभवा जी!'॥३१
तेव्हां युधिष्ठिरनृपा पडिला विचार; जो नेणता रव प्रपंचिक ऊपचार; ।
'राखोनि सत्य वदुं केंवि अशा नृपा या? जो आश्रयो दिन अमंगळियां लपाया.'॥३२

---

१. सिंह. २. समूह. ३. प्रधानांचे. ४. स्तुतिपाठक. ५. पंक्ति. ६. मुखाला. ७. लोपवी. ८. काजवे. ९. पवित्र. १० सार्वभौमत्व. ११. आशीर्वाद. १२. गृह. १३. पृथ्वीचा.

त्यावरी नृपा! धर्मवैखरी सत्यपाल्नी जे सदा खरी, ।
काय बोलिली ऐक त्या रवा, परम कौतुका शील गौरवा. ॥ ३३
'मी जन्मतांच मम तात दुजा कृतांत, तो पावला कनकशी शरिरा कृतांत ।
तेव्हां ऋषीजन वनीं बहु रक्षती ते; हा धर्मपुत्र म्हणती मज सन्मती ते. ॥३४
राहिलों प्रथम भूसुरवाडीं; घेतली बहुरसी सुखवाडी; ।
सेविला नृपति त्यावरि साचा धर्म, जो उदधि शांतिरसाचा. ॥ ३५
मला आणि धर्मा नसे भिन्न भावो; न जाणेल जो वर्म तो भिन्नभावो; ।
अहो सर्वही राज्यभारास त्याच्या करीं, मानुनी धर्म ठायीं पित्याच्या. ॥ ३६
सदा धर्मरायें सुखें पाळिलें रे! बरे पूरवीले मनाचे ळळे रे! ।
मला सर्व ही धर्म तो प्रीय कीं रे! सखा, सोयरा, बंधु या लौकिकीं रे! ॥३७
जननि जनक हो बंधु भूधरा! सकळ ही मला धर्म तो खरा; ।
त्या मला अभिन्नत्व फारसें बोलणेंचि हें क्लेश फारसें. ॥ ३८
तया संगती लोटलें या बयातें; असे काम जो या स्थळा यावयातें, ।
नृपा आयकें सावधाना मनानें, वना धाडिला धर्म दुर्योधनानें. ॥ ३९
गेला वनास जयिं धर्म सबंधुदारा; संपत्तिदान करी तो बहुसा उदारा! ।
खेळोनियां परम सादर अक्षपाटा, म्यां हारिलें सकळ विस्तृत अक्ष पाटा.॥ ४०
उदासीन मी हिंडलों या क्षितीतें; मनी मानुनीयां बहू साक्षि तीतें; ।
गुरु देवता या अशा काम नासी पुरायासि माझ्याचि ऐशा मनासी. ॥४१
'एक्या घरीं शरद एक यतिव्रतानें राहें' म्हणूनि वदला गुरु तीव्रतेनें; ।
तूं धर्मतुल्य नरवीर पराक्रमी रे! आहेसि, वत्सर तवालयिं हा क्रमीं रे! ४२
व्याघ्रपाद मम गोत्र कुलीना! जाण निश्चित नृपेंद्र सुलीना! ।
अक्ष खेळुनि तुलां रिझवीं रे! हेत हाच मनिंचा पुरवीं रे!' ॥ ४३
ऐकूनि तद्वाक्यसुधाकरासी, मत्स्येंद्र जोडोनि वदे करासी; ।
'राहा सुखें वत्सर एक माना; धर्मा असेंची मजलागिं माना. ॥ ४४
खेळोनि अक्ष, मजही बहु प्रीति त्याची, संतोषयुक्त असणें; मज सेविल्यांची ।
श्रेणी उभी सतत, त्या निज सांग कामा; भिन्नत्वभाव न धरीं यति! पूर्णकामा!'॥ ४५

---

१. वाणी. २. यम. ३. ब्राह्मणसमूहांत. ४. विपुलता, सुख. ५. सागर. ६. हे राजा. ७. फांसे; सारीपाट. ८. आश्विन कार्तिक मिळून होणारा शरदृतु. मागें अ० १ श्लो० ६७ पहा. परंतु एथें 'शरद्' शब्दानें एक वर्ष घ्यावयाचें. ९. फांसे. १०. अमृत.

म्हणे, 'राया! मातें सकळ जन ही कंक म्हणती;
　　बहू जाणें विद्या, शकुन, वचनादीक, गणती; ।
नसे कोणी एथें तुजविण दयापाळक मला;
　　दयाळा भूपाळा! अखिल तव राजीत कमला[1]' ॥ ४६

विराटही त्या समयीं नृपेंद्रा! कृतार्थ झाला अइसा यतींद्रा ।
ठेवूनियां वत्सर एक भावें, वर्ते जसा धर्म गुणी स्वभावें. ॥ ४७

ऐशापरी धर्म उदारधी तो सेवीत राजा गुणवारिधी तो; ।
नेमासनीं बैसुनि राजगोष्ठी[2], ऐके वदे सुंदर राज गोष्टी. ॥ ४८

भीमसेन मग मत्स्यपतीतें भेटला परम मल्लगती तें; ।
दाखवीत निज बल्लववेशें, एकला नृप सभेस प्रवेशे. ॥ ४९

ज्याचें दीर्घ शरीर पाहुनि पळे गंभीरखेदी रणीं;
　　ज्याची अंगप्रभा प्रकाशतनुभा तेजप्रभा कीरणीं; ।
ज्याच्या शब्दभयें करी किरकिरी वैरी गिरीकंदरीं;
　　ऐके तत्क्षणिं गर्गरीत मंवडी मूर्छा वरी आदरी. ॥ ५०

ऐसा भीम न भी मदेंद्र[3]अयुत[4]श्रेणीस जो दापिता;
　　ज्याचा हस्त समस्त मस्तकरिपूराशीस जो मापिता; ।
त्यानें हस्तकिं लाटणें, उचटणें, बीळी, पळी, फुंकणी
　　घेऊनी, बळिमत्तवारणगती[5] आला सभारंगणीं. ॥ ५१

ओपिती नृप जया नजरा हो! दिव्य तेज वपुहीन जरा हो; ।
जो न भी सुरवरांसि जरा हो! तो करी नृपवरा मुजरा हो! ॥ ५२

मत्स्या अशीं लक्ष नृपें शरानें जाळी क्षणें जेविं हुताश[6] रानें; ।
तो नेसुनी पिंगट वस्त्र एका विराटसद्मा[7]प्रति भीम ये कां! ॥ ५३

कृतांतसा[8] देखुनियां विराट भयें बहू कांपत थर्थराट; ।
निःशंक ये भीम जसा हरी[9] तो वेतंडगंडस्थळ[10] संहरीतो. ॥ ५४

पुसे समाजीं जन जे तयाचे, जाणा म्हणे लक्षण येत याचें; ।
तेजें प्रतापार्क महारणींचा, भासे गतीनें पति वारणींचा[11]. ॥ ५५

कोणी न बोले जन लक्षणा त्या, न देखिलें दक्ष सुलक्षणा त्या; ।
तो धीट ये त्या नृपती सभे जी! जेथें सदा खड्गकरी[12] उभे जी! ॥ ५६

---

१. सागर. २. राजसभेत. ३. मदोन्मत्त हत्ती. ४. दहा सहस्र. ५. गजगती. ६. अग्नि. ७. गृहास. ८. यमासारखा. ९. सिंह. १०. हत्तीचें गंडस्थल. ११. हत्तींचा. १२. तरवारी आहेत हातीं ज्यांच्या.

म्हणे, 'राया धर्मा! प्रियकर तुझ्या चित्तकमळा
सदा अम्लानत्वें विकसित महावित्त कमळा; ।
असा ऐश्वर्याचा उदधिरव नेव्हीं परिसतां,
तुझ्या गेहा आलों उदरभरणा थार नसतां. ॥ ५७

पुससि कोठिल? कोण? कसा? तरी, सकळ सांगिन ऐक तुं अंतरीं. ।
प्रथित जो नृपवर्य कुरूपती, सकळ मान्य तुम्हांस हि भूपती. ॥ ५८

ऐसा युधिष्ठिर गुणी नृपवारिधी तो दुर्योधनें दवडिला वनिं सारथी तो; ।
मी श्रेष्ठ बैल्लव तया घरिं पाकशाळा नानापरी पचविं अन्नरसा विशाळा. ॥५९

भक्षावया अन्नरसा कराच्या माझ्या मनीं प्रीति कृपाकराच्या; ।
न अन्यदासासम आकराचा लेखी मला क्षुल्लक चाकराचा. ॥ ६०

कनिष्ठ बंधू मजलागिं मानी, संतोषवी नित्य विशेष मानीं. ।
मी ही तयाच्या चरणद्वयातें सेवीं मनें निर्मळ अद्वयातें. ॥ ६१

सत्सूद मी नृपति! बल्लव नाम मातें, जाणोनि धर्मवत रे! तुज उत्तमातें ।
सेवीन जोंवरि कृपा तव एकभावें, माझ्या गुणा निरखिशील पुढें स्वभावें!' ॥

ऐकुनी सुधातुल्य बोल रे! ज्याचिया गुणा नाहिं मोल रे! ।
फार हर्षला तो महीपती, काय बोलिला ऐक सन्मती! ॥ ६३

'प्राशोनियां तव सुधारसवाक्यधारा, संतोषलों' म्हणउनी वदला उदारा! ।
'अंगप्रभा तव प्रचंड विराजते जे, तीच्या पुढें मलिन सर्वहि राजतेजें. ॥ ६४

तूं दीससी मान्य समस्त देवां, चतुर्थ वर्णी म्हणसी सदैवा. ।
अवश्य एथेंचि कृपाकरा या मानोनि धर्मासम ओक राया.' ॥ ६५

जोडोनियां पुनरपी करपंकजासी, बोलें नृपेंद्र वर बल्लव अंक ज्यासीं. ।
'मद्देशिंचें सकळ वैभव आंवरावें; सर्वांस मान्य तुज मानल तें करावें. ॥ ६६

मूर्धाभिषिक्त अवघे नरकेसरी रे! त्यांला तुझी तिळभरी न टिके सरी रे! ।
ते तूं कसा धरुनि बल्लववेषका या, आच्छादिशी निज पराक्रमलेशका या.' ॥६७

वंदोनि मत्स्यचरणा करपल्लवानें, केली बहूत विनती मग बल्लवानें. ।
'पाकक्रियेवरि ठिवीं नृपराज! मान्या! म्यां बोलिल्या सुवचना न करीं अमान्या.'॥

हें ऐकतां नृप म्हणे, 'बरवें मनातें वाटे तशीच पुरवा मनकामना ते; ।
या वेगळें इतर आणिक काम नाहीं. हा हेत पूर्ण तरि पूरित कामना ही.' ६९

---

१. घरीं. २. धर्मराज. ३. सैपाकी. ४. चवथ्या शूद्रवर्णीचा. ५. नरश्रेष्ठ.

असा पाकशाळापती भीम झाला. पुढें पार्थ हो! भेटला भूभुजाला. ।
नृपा! ऐक सांगेन त्याच्या प्रकारा. कसा शोभला वेष त्या निर्विकारा.॥७०
नेसला मळकटें चिंर[1] काळें. जो रिपू फळकटे चिरकाळें; ।
काढणार कर मार्गण[3] धारी, त्या करास करकंकण धारी. ॥ ७१
ज्याच्या शरें रिपु विराजित कां जळाले; तो जिष्णु[4] लोचन वधूवत काजळा ले[5]; ।
युद्धांगणीं परम दुर्धर हात चोळी; तो लेइला पघळ कोपरहस्त चोळी. ॥ ७२
कौरवें तृण जया गुरुवीणा घेउनी स्वकरिं घुंगुर वीणा ।
तो धनुर्धर प्रमाण लगामीं गुंतला म्हणुनियां गजगामी. ॥ ७३
वेणी बरी सरळ गुंफुनि आलकांची[6], भाळीं सुरेख करि कस्तुरि तीलकाची[7]; ।
तांबूल घेउनि मुखींच धरी सुदंती. ले पाइं का चरणिं चालत मत्त दंती[8]. ॥ ७४
वेष घेउनि असा [illegible] नारी, ये पुरी नवल तें नरनारी ।
पाहुनी, सकळ कौतुक वाणी बोलती कवण कौतुकवाणी. ॥ ७५
बैसला नृप सभासदनीं तो. वेष घेउनि प्रभा वदनीं तो ।
येतसे नवगजेंद्रगतीनें; देखिला दुरुनि मत्स्यपतीनें. ॥ ७६
पुसे बैसले जे सभालोक सारे; म्हणे, 'येतसे वेषधारी कसा रे? ।
महालंबबाहू उदारा मनाचा, असे वेष कृत्रीम हा अंगनेचा. ॥ ७७
पहा सज्जितां दिव्य कार्मुक[10] ज्याचें घटे हस्तकीं युद्ध निःशंक ज्याचें; ।
जरी वेष बुंथी धरी अंगनेची, तरी लोपवी ना सुतारागणाची[11]. ॥ ७८
महा अक्ष[12] विस्तृत अव्यंग दृष्टी, कसा येतसे निर्भयें पिंगदृष्टी? ।
सुरेंद्रा असें तेज अंगीं विराजे; प्रतापार्क हा या सरी केंवि राजे! ॥ ७९
जो मान्य झाला सुरलोकपाळीं; रणीं बरा तोषविला कपाळी[13]; ।
तो कुंकुमा लावुनियां कपाळीं, वंदी नृपा जो द्विजलोकपाळीं. ॥ ८०
ये अशी समिप त्या नृपतीच्या; पाहे विस्मितमुखा नृप तीच्या. ।
'जयजया' म्हणुनि राजसभेसी बोलिली वचन राजसभेसी. ॥ ८१
'बृहन्नळा गायन नर्तकाची जाणे कळा सुंदर बायकांची; ।
शृंगारलीळा सकळा कराया माझ्या बहू चातुरता करा या. ॥ ८२

१. वस्त्र. २. फार काळानें. ३. बाण. ४. अर्जुन. ५. लेई, घाली. ६. केशांची. ७. टिळा. ८. हत्ती. ९. स्त्रीचा. १०. धनुष्य. ११. उत्तम नक्षत्रांची. सर्वांत तेजस्वी तारा लुब्धकाचा आहे. १२. डोळे. १३. शिव, महादेव.

फुलें गुंफणें, घालणें वेणिका ते, असें जाणतें जें नये आणिकांतें; ।
विडा साजणें, घालणें अंजनासी, बरें शीकवी नृत्य कारी जनासी.' ॥ ८३

बृहन्नळावाक्य अशा रितीं तो ऐकोनि बोले मग भूपती तो. ।
'अंगप्रभा सूर्यसमान साजे; न आणिका लौकिक मानसा जे. ॥ ८४
सांगे स्वभावासि, यथाक्रमानें घे चाप, सज्जीं गुण विक्रमानें; ।
न हात हे भूषण कंकणाचे, होती रिपूंचा कुळनाशनाचे. ॥ ८५
नव्हे पहा योग्य अशी अधीरा तुला प्रचंडा रणरंगधीरा.' ।
म्हणे परीक्षेस्तव भूप, 'हातीं हें चाप सज्जीं.' तंव ते पहाती. ॥ ८६

म्हणे, 'योग्य राया! मला चाप नाहीं; कसें सज्जिजे तें न ठावें मना हीं; ।
सदा राहुनी धर्मगेहीं विचारें बरी द्रौपदी रंजवीं ऊपचारें. ॥ ८७
वना धाडिला धर्म दुर्योधनानें; सबंधू सदारा महादुर्जनानें; ।
म्हणोनी मला प्राप्त झाली दशा ही. तयाचे घरीं भोगिली पादशाही. ॥ ८८
अतां ऐक निर्वाण वाणी सुशीला! जरी ठेविसी तूं मला गा! अशीला. ।
बरें शाहणें तूझिये कन्यकेला करीतें, जरी शब्द हा मान्य केला. ॥ ८९
या वेगळें इतर काम मला कळेना; हें चाप सज्जित कळा मज आकळेना. ।
राया! मला जरि तुं ठेविसि याच कामीं, नाहीं तरी इतर जाइन याचका मीं.'॥९०
म्हणे भूपती, 'योग्य तुम्हांस नाहीं; परी पूरवा आपुली कामना ही; ।
तुझा भाव तोची अम्हीं मान्य केला; करीं शाहणें चातुरीं कन्यकेला.'॥९१

विराट कन्येसह ते विशाळा बृहन्नळा पाठवि चित्रशाळा. ।
माद्रेय त्यानंतर तो स्ववेषें तया नृपाच्या सदनीं प्रवेशे. ॥ ९२

उष्णीष[1] बांधुनि शिरीं बहु उंचमानें, अंगीं झगा चिरें[2] कटीं करि उंच माने ।
खोंवी शिरीं नविन कोमळ अब्जपत्री; घे अश्वसूत्र निजहस्तसहस्रपत्रीं[3]. ॥ ९३

जयाच्या शब्दानें रिपुसमुह हाले खुळखुळा;
नृपा! त्याचे हस्तीं हय सजवण्यातें खुळखुळा; ।
जरीं घे या वेषा तरि तनुप्रभा काय लपती!
दुरूनीयां त्यासी निरखुनि मनीं थक्क नृपती. ॥ ९४

नैकुळकुळरिपूसे[4] बाण ज्याचे कमानी,
नकुळ कुळमणी तो हीन नावेक मानी; ।

१. पागोटें. २. वस्त्र. ३. हस्तकमळीं. ४. सर्पासारखे.

'नृपति शत असे ज्यां स्थापिले हस्तकानें;
करुं नमन असें त्या या अशा मस्तकानें!' ॥ ९५

येतां नकूळ करिची गति पावला जी! देखोनि मत्स्यपति विस्मय पावला जी! ।
मत्स्या असे नृपतिराजित जो नमोजी, जोडोनि तो कर म्हणे, 'नृपती! नमो जी!'॥ ९६

पाहोनि याची मुखचंद्रभा ते तटस्थ झाली अवघी सभा ते; ।
माद्रेय वाणी वदला भुपाळा, ते आयकें सादर तूं कृपाळा! ॥ ९७
'प्रथित पांडव ते जगतींत रे! लपुनि सांप्रत ते जगती तरे. ।
असति यास्तव सर्व जना भया फिरत मी परदेश भयाभया. ॥ ९८
त्या पांडवांच्या सदनीं[1] विशाळा स्वामित्व होतें मज अश्वशाळा. ।
जाणें कळा शिक्षण सैंधवांचें;[2]' ऐकोनि बोले नृपती सुवाचे. ॥ ९९
'दिससि राजसा! राजरूपसा; राजसी कसा तूं असूपसा[3]? ।
राजिवाक्ष[4] तूं विराज वक्ष रे! राज्य रक्ष रे! भाव अक्षरे. ॥ १००
परम वाटसि गा बरवा मना; वद कशी मनिंची मनकामना? ।
दिससि पंचमुखा[5]परि विक्रमी; धरिसि कृत्रिमवेष मही क्रमीं; ॥ १०१
सांडोनि हा वेष समग्र हा रे सेवीं सुखें तूं मम विग्रहा रे! ।
सेनापती सर्वहि वाहिनीचा[6] माझ्या' म्हणे 'हो' पति आवनीचा[7].॥ १०२
अमान्य त्याच्या वचनास राया! करूनि बोले, 'मजला सराया ।
सामर्थ्य नाहीं प्रभु आसनासी; जाणें हयांच्या गतिशासनासी.' ॥ १०३
'अवश्य' बोले नृपती 'मनातें जें मानलें पूर्विं कामना ते.' ।
समस्तही अश्व नृपागृहींचे स्वाधीन केले स्थळविग्रहींचे. ॥ १०४
कनिष्ठ ये पांडव त्या वरी रे! अंगप्रभे कांति विभावरी रे! ।
ज्याच्या रुपाला न पेंती रतीचा पावे सरी; तो नृपती रतीचा. ॥ १०५
सभासनीं बैसुनि त्या नृपानें ये देखिला भास्वतसा[10] रुपानें. ।
विस्मीत पूसे सचिवादिकांसीं, 'हा कोण येतो जन अभ्रंकाशी[11]? ॥ १०६
करीं दोर, दंडीं अनेकां वळीला धरी, दोर काठीस तो कांबळीला; ।
वरी घेतली चीमणी एक जाळी; शरीरप्रभा ते समस्तां उजाळी.' ॥ १०७
ज्याच्या रुपा शचिपती[12] सह देव माने, तो खालती करि नृपा! सहदेव माने; ।

---

१. घरीं. २. घोड्यांचें. ३. अत्यंत. ४. कमलनेत्र. ५. सिंहासारखा. ६. सेनेचा. ७. पृथ्वीचा. ८. रात्र. ९. रतीचा पति मदन. १० सूर्यासारिखा. ११. आकाश. १२. इंद्र.

वंदोनियां-नृपतिलागुनि तेधवां रे ! जो सोयरा सकळयादवमाधवा रे! ॥१०८
'मी तंतिपाळ' अइसें वदला नृपाळा. 'राखीन गोसमुह सर्व तुझा नृपाळा ! ।
आणें क्रिया सकळ गोरससाधनाची, इच्छा नसे मज नृपा! सहसा धनाची. ॥१०९
दे अन्न आच्छादन मात्र मातें; राखेन जी! गोधन उत्तमातें.' ।
ऐकोनि ऐसें नृपती वदे, तो श्लोकत्रयीं भाव समस्त देतों. ॥ ११०
'न झांके रवी झांकिल्या मेघजाळीं; प्रभाकीरणें अंध ओमोघ जाळी; ।
तसा वीर क्षत्रीकुळीं जन्मला हो ! न लोपे दरिद्रें जरी वाम लाहो. ॥१११
तेजप्रभे उजळि जेंवि नभा शशी रे! अंगप्रभेकरुनि त्यासम भासशी रे! ।
तूं निश्चयें नृपकुलोद्भव दीससी मा हे आक्रमी सकळ मत्पुरदेश सीमा. ॥ ११२
न योग्य तूं गोधनरक्षणाच्या संपन्न सर्वा गुणलक्षणांचा. ।
बंधूपरी मानुनि मद्गृहासी, सेवीं सुखें टाकुनि आग्रहासी.' ॥ ११३
न मानूनी तद्वाक्यरत्नावलीला, करीं दोर घे तो स्वहस्तें वळीला; ! ।
म्हणे, 'गोंवळ्याची कळा जाणता रे! तयावीण मी सर्वही नेणता रे!'॥११४
पाहोनियां आग्रह पांडवाचा, 'आवश्य' बोले नृप वैभवाचा; ।
'आलें बरें हेंचि जरी विचारा, सुखें तरी गोकुळवृंद चारा.' ॥ ११५
आतां ते कइशी तरूण वयसी आली शैशांकाननी;
वर्षें द्वादश भोगिली उबगली नाहीं श्रमा काननीं; ।
जें धर्मा प्रिय तेंचि उत्तम असें निर्धारिलें मानसें.
ऐशी ते द्रुपदात्मजा महिभुजा जीची प्रतीमा नसे. ॥ ११६
चालतां गजगती तळवासी सर्वलोक जगतीतळवासी. ।
पाहती परमकौतुकशीला द्रौपदीसति अलौलिकशीळा. ॥ ११७
जरी नाहि तीं भूषणें हस्तनाकीं; शरीरीं जिच्या वस्तही एक ना कीं, ।
तरी काय सांगों तिच्या मी कैराची प्रभा ? लोपवी कांति चामीकराची.॥११८
शिरीं केशभारास अभ्यंग नाहीं. स्वरूपास जीच्या कदा भंग नाहीं. ।
जरी एकवस्त्रा बहू भास शीतें, तरी तुच्छ अंगप्रभा त्या शशीतें. ॥ ११९
द्रौपदीस जन राजआळिचे वेष्टिती जनसमूह आळिचे; ।
पंकजास तरि काय तीचि रे! झांकणार गुणसिंधुवीचि रे ! ॥ १२०

---

१. व्यर्थ न होणारी. २. शोभा. ३. चंद्रमुखी. ४. कंटाळली. ५. अरण्यांत. ६. हाताची. ७. सोन्याची. ८. कमलास. ९. लहरी, लाट.

राजालयासमिप ये द्रुपदी सती ते; जीच्या समीप नगरीजन आसती ते. ।
माडीवरी निरखुनी जंव भूपराणी तों देखिलें जनपदीं वधु रूपखाणी. ॥ १२१
म्हणे सेवकी ज्या तिच्या बद्धपाणी उभ्या घेउनी जान्हवी[1]शुद्धपाणी. ।
'पहा पैल ते कोण नारी विराजे. मृगांकानना[2] रूपरत्ना विराजे. ॥ १२२
रमेच्या[3] परी भासते लक्षणानें; जगा कोपल्या सूख दे ईक्षणानें[4]. ।
असे निश्चयी राजजाया सती ते, फिरे दैवयोगें अशा दुर्गतीतें[5]. ॥ १२३
उभी असे लोककदंबकीं[6] ते; आणा त्वरें खंजनअंबकी[7] ते. ।
राहे जरी मत्सदनीं तरी मी पावें सुखालागुनि अंतरीं मी.' ॥ १२४
त्वरित येउनी राजदासिका म्हणति, 'चाल हो कीरनासिका[8]! ।
वाहते तुला राजसुंदरा धरुनि मानसीं परम आदरा.' ॥ १२५
ऐकतां असें पंकजाक्षि[9] ती टाकि पाउलापंकजा[10] क्षिती. ।
बहुत मानसें चालली जशी गगनमंडळीं झळके वीजशी. ॥ १२६
चढत ऊंपरी[11] ह्रस्व पाउलीं, राजयोषिते[12]जवळि पावली. ।
पाहतां जिचा वदनचंद्रमा, मळिन भासतो सर्व चंद्रमा[13]. ॥ १२७
पुढें बैसले स्तोम[14]ही अंगनांचे[15] जयांचें सदा त्या मही अंग नाचे; ।
बहू राजभाजा[16] तयांचे समाजीं सुदेष्णा[17] असे जेंवि साकार माजीं. ॥ १२८
ये ऐशियांत वधु ते कुरुसंभवांची[18], पाहे सभेंत महिषीवर[19] संभवाची; ।
झाले तटस्थ मग लोचन खंजनाचे[20]; ऐसे तिचे अणि समस्त वधूजनाचे. ॥ १२९
ये द्रौपदी त्या उपरि क्षितीला; जेव्हां सुदेष्णाच परीक्षि तीला; ।
'हे योग्य सामान्य नरास ना जी! नारी दिसे मान्य वरासना जी!' ॥ १३०
पाहतांच द्रुपदी जिस माने, आळवी नृपवधू तिस मानें. ।
बैसवी धरुन हात सतीचे; रंजलें परम मानस तीचें. ॥ १३१
या पुरींत मज सांग मनाचें कार्य कोण तव आगमनाचें? ।
दीससी परम राजसवाणी; बोल कां गुज सुधारसवाणी.' ॥ १३२
'सैरंध्री मी; मालिनी नाम मातें; माझ्या दैवाला नसे ऊपमा ते. ।
गंधर्वांचे पंचकीं या शरीरा वर्णावें[21] कीं बोलिली अशरीरा[22].' ॥ १३३

---

१. भागीरथीचें उदक. २. चंद्रानना. ३. लक्ष्मीच्या. ४. दृष्टीनें, पाहण्यानें. ५. दारिद्र्य, दुर्दशा. ६. समूहांत. ७. खंजनपक्ष्यासारखे अंबक म्ह० नेत्र आहेत जीचे अशी. ८. कीरासारखें आहे नाक जीचें अशी. ९. कमलनेत्री. १०. पदकमळास. ११. माडीवर. १२. स्त्री. १३. पूर्णचंद्र. १४. समूह. १५. स्त्रियांचे. १६. स्त्री. १७. विराटाच्या स्त्रीचें नांव. १८. पांडवांची. १९. पट्टराणी. २०. पक्षिविशेष त्याचे. २१. वर्णावें. २२. आकाशवाणी.

ऐकोनियां वचन भूभुजवल्लभेचें, कृष्णा म्हणे, 'तुज अलौलिक दुर्लभेचें ।
आकर्णिलें परम सत्कुळ शीळ कानीं; तें देखिलें सकळ म्यां निज अंबकांनीं.॥ १३४
ते पांच सिंह जगतींत पराक्रमांनीं आहेत मत्पति अखंडित शक्रमानी; ।
दैवें मला विघड त्या चरणांस माये! तें दुःख काय वदुं या हृदयीं न माये. ॥ १३५
ऐकें विचित्र तरि मत्पति ये कलीला; देखूनि दुर्जन सैंळी मज एकलीला; ।
तेव्हां उगेच बसले मन मानलीसी पाहूनि ही निजवधू अवमानलीशी. ॥ १३६
संकल्पपाणी निज हस्तकांनीं म्यां सोडिलें तेंहि समस्त कानीं ।
आकर्णिलें मत्पतितें सुवाचे आईक तूं स्वामिणि! वैभवाचे. ॥ १३७
मला दुर्जनीं गांजिलें जे घडीला; पतींनीं तयीं स्वल्प ही ऊघडीला ।
नसे नेत्र, तेव्हांच केलें पणाला; असे गोंविलें संकटीं आपणाला. ॥ १३८
तेव्हां पांच करी करीकुळहरी निःशंक जे केसरी;
तैसे मत्पति वीर धीर निधडे ज्यांची पुरेना सरी; ।
होऊनी रिपुचा कुळ प्रतिकुळें ते भंगिती सायकीं;
तेव्हां मत्पण पूर्ण, तोंवरि मला तूं पाळि तो माय कीं. ॥ १३९
म्यां पांडुनंदनवधू द्रुपदी भलीला त्या सेविलें बहुत दीवस माउलीला. ।
दैवें विचित्र घडला वनवास तीतें; याकारणें गति अशी,' वदली सती ते.॥ १४०
सुदेष्णा म्हणे, 'रूपलावण्यपेटी! तुला पाहतां मोह चित्ता लपेटी; ।
अशी देखिल्या मत्स्यरायें तुला गे! न सोडी प्रिये! पाहुनीयां तुला गे!॥ १४१
तूं चंद्रबिंबवदना, तव रूपभागे पाहावया सतत चातक रूप भागे; ।
हे तों कदापि न घडे विघडे मला तो; आहे जरी परम सत्वगुणी भला तो. ॥ १४२
पाहोनि तुझ्या कनकांगमातें प्रसुप्त ही क्षिप्र अनंग माते. ।
झाल्या तुला भूपतिसंगमातें, अप्राप्य तेव्हां पतिसंग मातें. ॥ १४३
हे पंकजाक्ष तव विस्तृत पाहुनी गे! राजा करील तुजला घरपाहुणी गे! ।
येईल फार तव संनिध धांवुनी गे! तेव्हां पडेल बहु गोष्टि मला उणी गे! ॥ १४४
होतां प्रकाशमहिमा रविच्या करांची विच्छिन्न सर्व पदवी न सुधाकराची. ।
होईल काय? वद सत्य चि सौरसाक्षी! ध्यावोनि हृत्कमळिं सौरअसारसाक्षी!' ॥ १४५
ऐकोनियां वचन भूपतियोषितेचें, झालें मळीन बहु तुंड सुभाषितेचें; ।
तेव्हां मनांत बहु आठवि रामराया; नांदे अशा समयिं ठाव धरा मराया. ॥ १४६

---

१. राजस्त्रीचें. २. डोळ्यांनीं. ३. इंद्रासारखे. ४. छळी. ५. ऐकिलें. ६. हत्ती. ७. सिंह. ८. बाणांनीं. ९. मदन. १० कमलनेत्र. ११. किरणाची. १२. चंद्राची. १३. हे कमलनयने. १४. परमेश्वर.

आतां कसें वदुनियां द्रुपदी सती ते राहे विराटघरिं चिद्रुप दीसती ते. ।
'हा भाव कां धरिसि त्या निजमानसीं गे!? तूं माय बाप नृप मला यजमानसी गे! १४७
मत्क्लेश ना या महि माय लेकीं; या कारणें तूं मज माय लेकी; ।
ऐशापरी राहुनि दास्यकामीं भंग मळानें निज आस्य कां मी?॥ १४८
वेणीफणी करुनि शौर्वरिदीन पाशीं तूझे असेन च मि गुंतलि दीनपाशीं. ।
उच्छिष्टभक्षण, धुणें परपाद, हातें या वेगळीं करिन काम शतें दहा तें. ॥ १४९
गंधर्व रक्षिति मला निशिवासरीं गे! तूं ही वरिष्ठगुणखाणि शिवासरी गे!।
कैशापरी नृपतिसे नर भाळती गे! तूं शब्द विंधिसि मला शर भालती गे! ॥ १५०
गेलें जरि क्षणिक वैभव तीव्रतेचें, होईल शासन तयीं पर तीव्रतेचें; ।
आजन्म संगति भली अति शोभलीची, त्या द्रौपदी कुळवधू अति शोभलीची.॥ १५१
ते हर्षली नृपवधू विधुआननेसी 'राहें' म्हणे 'मजपसीं दिन आन नीशीं. ।
तूं प्राणतुल्य मम विग्रहसेवकां गे! होशील वंद्य सकळां गृहसेवकां गे! ॥ १५२
वेच तूं मम घरा करणारी; कोण हो! तुज मना करणारी? ।
नेस उत्तम चिरा जरतासी; दीससी परमराजरताशी. ॥ १५३
शब्द फार तव सारचि लागे. ग्रंथ मोहक रसा रचिला गे.' ।
हेममंडित करी मग तीला. राहवी द्रुपदिदिव्यसतीला. ॥ १५४
जीचे पती रिपुंगणास्त रणीं करीती ते द्रौपदी सुपतिअस्तरणा करी ती; ।
दे याचकां शतसरुक्मवटी करांनी ओवी तशी सति भुपा मणि टीक दानीं. १५५
ऐशापरी नृप युधिष्ठिरचक्रवर्ती जो कंक मत्स्यसदनीं गृहचक्रवर्ती; ।
त्याची वधू द्रुपदि मत्स्यसुतामहीतें राहे पवित्र तव वृद्धपितामही ते. ॥ १५६
झाला तुझा प्रश्न समग्र हा कीं? आतां पुढें दुष्ट दुराग्रहा कीं ।
तरी कसा कीचक भीमहातें मारी तुझा ऐक पितामहा तें. ॥ १५७
अध्याय हा द्वितिय श्रीहरि वामनाचा माझ्या मुखें वदविला सुखकामनाचा. ।
मी नेणता मज मुखें कविता कराया सामर्थ्य ऐक यदुभूषण लेंकरा या. ॥ १५८
हा ग्रंथ फारचि हरी प्रिय वामनासी नाशील संसृतिभया अथवा मनासी; ।
ना शीलवंतजन संगति ते कराया राया न हेत जडवी प्रभु लोकराया. ॥ १५९

---

१. मुख. २. रात्रदिवस. ३. पार्वतीसारखी. ४. चंद्रमुखीला. ५. वस्त्र. ६. सोनें. ७. शत्रुगणांचा संहार. ८. सोनें. ९. पणजी. १०. पणजा. (भीम). ११. संसार.

अध्याय तिसरा.

श्रीगज्ञाननपदीं मन लागे, तेधवां विषय दुर्जन लागे; ।
सूटती न इतरा भजनांनीं केलिया इतर काम्य जनांनीं. ॥ १

मनसुमन हरी जो एक आत्मोंगमाचा,
सकळहि करणारा स्थावराजंगमाचा. ।
करुनि नमन त्याच्या अर्पिलें पादलिंगीं,
निशिदिनिं हृदयाब्जीं ज्यास पद्मा अलिंगी. ॥ २

यदुवंशी वंशीधर किर धणी जो जगतिचा,
गतींचा जो दाता सरसनिरसा या जगतिचा, ।
तिचा फेडी फार प्रियकर करें श्यामल हरी,
हरी तिच्या दुःखा, करि निज सुखानंदलहरी. ॥ ३

ऐकें नृपा! सावधपूर्व कानें आख्यान हें फार अपूर्व कानें. ।
कां मारिलें पांडवि कीचका त्या, ऐकें चरित्रा भवमोचका त्या. ॥ ४

अहो! प्रातःकाळीं उठुनि करि स्नानादिक बरीं
स्वधर्माचीं कर्में मग सकळ बांधोनि कैंबरी ।
शिरींचे हस्तानें धरि वसन जें योग्य पतिला
वदे आशीर्वादा कुरुकुळपती मत्स्यपतिला. ॥ ५

देणार जो गजधनादिक दान आजी, जो मान्य होय सकळां सुरदानवां जी, ।
व्हावा म्हणोनि नृप मत्स्य सदा नवाजी तो धर्मराज निजगुप्त पदा नवाजी. ॥ ६

दशशत वधि वृंदें एकला जो करींचीं,
नृपति बळ करी तो भीम पाका करींची ।
निजकरकमळानें शीजवी सा रसांला
नृपसदनकरी तो कष्ट निःसारसाला. ॥ ७

जो तोषवी समरिं निर्मळ शंकरासी, ज्याचा सखा यदुपती अकलंकराशी, ।
तो कृष्ण नाचवि करें नृपलेंकरां जी! राजीवलोचन जया सुरलोक राजी. ॥ ८

रूपें जसा भवरिपू अशरीर बाणें छेदी रिपूबळ समग्र शरीर बाणें; ।
तो घे नृपा गुण करी निज वंधनांचे, मत्स्याचिया सदनिंच्या गुण गोधनांचे. ॥ ९

---

१ शाल. २. लक्ष्मी. ३. मुरली. ४. केशकलाप. ५. घोडे. ६. स्तुति करी. ७. अर्जुन. ८. कमलनेत्र. ९. शंकराचा वैरी. १०. अनंग, मदन.

जो शासणार रिपु धीट कदंबका जी! तो घे करीं हयसजावण चाबका जी, ।
जे पाहतां रण हरी करिराज याची पंक्ती समर्पित यशो विविधा जयाची. ॥ १०

सुदेष्णेच्या ऐशा शत शतक दासी नवळिल्या,
जिच्या तेजें पृथ्वी नभ दश दिशा त्या कवळिल्या, ।
अशी सौंदर्याची लहरि हरिणाक्षी नृप तिची
वधू सेवी हस्तें कठिण गति ऐशी नृपतिची. ॥ ११

लोटोनियां मासदशास राया. आली पुढें दुष्ट दशा सराया; ।
तो दोंच मासीं निशिवासरी रे! जे भोगिले कष्ट न त्या सरी रे! ॥ १२
द्विजां उभी दे कण पीकदानी, ते घेउनी हस्तकिं पीकदानी ।
उभी असे लक्षित नेत्र तीचे विराटमत्स्येश्वरयूवतीचे. ॥ १३
दावी सुदेष्णेस अदर्शनासी; ते द्रौपदी तों खळ दर्शनासी ।
आला बळी कीचक बंधु तीचा राजांगनेचा प्रिय जो वतीचा. ॥ १४
पाहोनि कृष्णारुपलक्षणातें मनीं म्हणे, 'कोण सुलक्षणा ते?' ।
जरी बरी स्त्री हि शेतामखाची पावे सरी काय इच्या नखाची ?' ॥ १५
जातां घरा दुष्ट खळोपदेशी तो एकली द्वारसमीपदेशीं ।
ते देखिली मागुति खंजनेत्री, म्हणे, 'बरी भेटलि चारुवक्त्री. ॥ १६
संपूर्णचंद्रवदने! कटि केसरीची, या तूज तुल्य वधु कोण असे सरीची ? ।
आपादमस्तक तुला पाहतां मना गे ! बाधा विशेष परिरंभणकामना गे! ॥ १७
हें दास्यकर्म तुजसारखिये भलीला ना योग्य कीं पद गती तव इभेलीलां, ।
तूं चांगली दिससि मन्मथपूतळी गे! स्वर्गांगना उतरलीस च भूतळीं गे! ॥ १८
पाहोनियां तव भली मुखइंदु भो ते, माझ्या वपूंत तव मन्मथसिंधु माते; ।
आतां कृपाच करुनी मजला वरीं गे! भोगीं सुखास दिन आणि विभावरी गे! १९
तूं योग्य माझ्या वधु शोभसी गे! नको पडूं दुष्टदशाभ्रमेंसी गे! ।
होईं समग्रा गृहनायकांची तूं स्वामिणी गे! मम नायकांची. ॥ २०

जडित नग नगारीअंगनेचे सरीचे
करिन तुज अशीला फोरशा कौसरीचे; ।

---

१. समूहाला. २. मृगनयना. ३. जीचे. ४. द्रौपदी. ५. इंद्राची. ६. खंजननामक पक्ष्यासारखे आहेत नेत्र जीचे. ७. सिंहाची. ८. आलिंगनाची इच्छा. ९. हत्ती. १०. मदन. ११. अप्सरा. १२. शोभा. १३. सागर. १४. रात्र. १५. भ्रमी. १६. इंद्राच्या जीचें. १७. कौशल्याचे.

त्यजुनि गति अशी हे जे तुला ना बरी गे !
त्वरित मज उदारा मानसानें वरीं गे ! ॥ २१
मी पूर्वीन तव उत्तम कामनांसी; आलें बरें वचन हें तव काम नासीं; ।
आल्हाद फार गमला तुज पाहतां गे! केव्हां धरीन तुझिया तुरपा हता गे!' २२
ऐशा परी दुष्ट अमंगळाची ऐकोनि वाणी जंवं विंगळाची, ।
संतप्त भाल्यापरि नेत्र तीनें तावोनियां शब्द दिला सतीनें. ॥ २३
'तूं स्वामि कीं नृपतिच्या असती दळींचा, हा शब्द काय वदसी मज शींदळीच्या! ।
शाहेत पांच पति विक्रमकेसरीचे, गंधर्वनाथ सुरलोकपतीसरीचे. ॥ २४
वाणी तुझी परम नीच करी कसाबा ! तो जन्मवी तुज विचित्र खरा कसा बा ?' ।
बोलोनि वाक्य इतुकें अतितीव्रतेनें केलें पलायन घरांत पतिव्रतेनें. ॥ २५
झाला तप्त असक्त कीचक मदें धिक्कारिला जो तिणें,
आला राजगृहा फिरोनि नमिली मैत्स्यांगना भक्तिनें. ।
चित्ती व्याकुळ देखुनी निरखुनी बोले सुदेष्णा तया;
'कां तूं सत्वर जाउनी पुनरपी आलास काळांत या?' ॥ २६
'कनिष्ठबंधु तुजसी खरा गे! ऐशी जरी ही मजला खरा गे! ।
तथापि माया बहु लौकरी सी करूनि माझ्या मनिचें करीसी. ॥ २७
या किंकरींत तुझिया कमळेक्षणा गे! म्यां देखिली परम सुंदरलक्षणा गे! ।
ते भोगिल्याविण नसे मजला अरामा; रामा दया करूनि देई मनोभिरामा. २८
न दे ची कदा ते जरी हस्तकीं गे! तरी मृत्यु मार्तेच्च नेमस्त कीं गे! ।
असाया तुझा वाढलों मी करींचा, तरी लोभ सांडीं तया किंकरीचा.' ॥ २९
अशी संकटीं गोंवितां राजजाया, म्हणे, 'चिन्ह हें दीसतें आजि जाया ।
तुझे प्राण कीं बंधुराया वरिष्ठा! अशी वासना मूळ हेंची अरिष्टा. ॥ ३०
ते सती, जिचे पांच कां पती, परम शूर ही ज्यांस कांपती; ।
गुप्त राहुनी सादर क्षिती, बहुत खंजनाक्षीस रक्षिती. ॥ ३१
चालते परम शुद्ध रितीसी. वाटते जगति उद्धरि, तीसी ।
कोण बोलल अमंगळ वाणी? ते सती परम मंगळवाणी. ॥ ३२
काय अन्य रमणी जगतीच्यां नाहीं त्या कैलभराजगतीच्या? ।
हीवरी धरिसि हेत कशाला? व्यर्थ कां करिसि घोर कसाला?' ॥ ३३

---

१. सिंहासारखे पराक्रमी. २. मत्स्यदेशाचा राजा विराट याची स्त्री सुदेष्णा. ३. दासीत. ४. स्त्री. ५. हत्तीचा छावा. ६. श्रम.

ऐशी सुदेष्णा निजभारतीनें सांगे खळाला बहुतां रितीनें; ।
परंतु त्याला सहसा न मानें; आमंत्रिला जो मरणीं यमानें. ॥ ३४
वदे ऐकुनी गोष्ट राया सतीची; 'नसे चाड माझी तुला, आस तीची; ।
तरी ठेवि तीतेंच, मी जात आहें; बहू पीडिलें कामसंतापआहें.' ॥ ३५
देखोनि बंधू अतिखिन्नशाला, म्हणे, 'करूं काय खळा अशाला? ।
होणार जैशी गति त्या प्रकारें प्रभाव चित्तांत तसा विकारें.' ॥ ३६
म्हणे सुदेष्णा, 'तव काम नीचें आहे जरी दुष्कर कामिनीचें, ।
तथापि तुझ्या मनरक्षणासी मी सांगतें सत्य सुलक्षणेसी. ॥ ३७
परंतु केली कैरभाष तीशीं स्वयें न सांगेन सुभाष तीसी. ।
कांहीं प्रसंगें तुझिया गृहा रे! ते पाठवीतें शुभविग्रही रे! ॥ ३८
सन्मानुनी रंजवि ज्या रितीनें, संतुष्ट कीं होय न ज्यारि तीनें; ।
केलें असे ते बहुशीळवंती यत्नें तिची फार करी विनंती.' ॥ ३९
संकेतवाणी भगिनीमुखाची ऐकोनि मानी घडि ते सुखाची; ।
उठोनियां तो मग ओवरासी गेला त्वरें आपुलिया घरासी. ॥ ४०
साजोनियां कुसुमसेज सुमंचकीं त्या वस्त्रें विचित्र बहु, कंचुकि उंच कीं त्या; ।
पात्रांत ठेवुनि जडावहि, मार्ग तीचा लक्षीतसे खळ अमंगळ दुर्गतीचा. ॥ ४१
येरीकडे नृपवधू द्रुपदीसतीतें पाचारुनी, परम सुंदरदीसतीतें, ।
सांगे, 'अवश्य घरिं जाउनि कीचकाचे आणीं सुधा त्वरित स्वामिणि! बायकांचे.' ४२
कांती जशी निवळ बाळप्रभाकराची, जीची अखंडित असे प्रतिभा कराची; ।
ते द्रौपदी वचन ऐकुनि आणि तीची विज्ञापना करि नृपेंद्र महानितीची. ॥ ४३
'सांगाल जें वचन तें निज मस्तकीं जी! वंदोनियां करिन कास नेमस्त कीं जी! ।
आहे अनर्थकर कीचकओकें जाणें; मी अंतरीं हुनि तयासम ओकें जाणें. ॥ ४४
माते! मला बहु कठीण रवें खळानें केलें श्रमी परम पातकनिःखळानें; ।
आतां धरील कपटी मद मातला गे! तेव्हां कुळास सकळा मम मोंत लागे. ४५
याकारणें मी न कदापि त्याच्या जाईन सैंधास खरोपिलाच्या.' ।
अमानिला शब्द पतिव्रतेनें; बोले सुदेष्णा मग तीव्रतेनें. ॥ ४६

१. वाणीनें. २. कामरूपी अग्नीच्या ज्वालेनें. ३. हातावर हात मारून वचन भाक, देणें. ४. सुंदरी. ५. पाशी. ६. अमृत. ७. सूर्याची. ८. घर. ९. कांती. १०. बोल, शब्द. ११. घरास १२. गाढवाचा बाप, गाढव.

'घालुनी सलिपणास पणाला, जे म्हणे बहु भली अपणाला, ।
व्यर्थ निंदिल परा पुरुषासी, तेचि नष्ट, तिजला यम शासी. ॥ ४७

असो. आतां आर्णी सरसतर मद्या निज करीं;
करीं माझ्या चित्ता सुख बहुत जा हो! झडकरी; ।
कैरीचालीची तूं चतुरतरलावण्य अबळा
बलात्कारें भोगी कवण तुजला दावुनि बळा? ॥ ४८

जरी ठिवी कीचक तो जरा जी! रौजीवनेत्रे! तुजला न राजी, ।
राजीतसे भोगितसे घरा हे! राहे न त्या निश्चित मैद्दिरा हे.' ॥ ४९

ऐकोनि गोष्ट हि तयीं नृपभामिनीची, घाली नृपा! द्रुपदि सद्रुप मान नीची; ।
आतां न जाय तरि बाहिर क्षिप्र घाली, याकारणें वचन मानुनियां निघाली. ५०

तेव्हां नृपा! द्रुपदि ते बहु दीनमानी होऊनि फार स्तविला रति दीनमानीं; ।
'आतां दया करुनि राख कृपाकरा रे! प्रत्यक्ष तूं निरखिसी मज भास्करा रे!' ५१

नानापरी कांचनभास्वतातें स्तवी दिनोद्धारक भास्वतातें; ।
केला नृपा! फार विलाप तीनें; त्या कीचकाचा भय कांप तीनें. ॥ ५२

काळ देखुनि भयें उलटा कीं, भीत भीत सति पाउल टाकी; ।
कीहिलें सकळ श्रेष्ठ विधीचें प्राप्त होइल अचूक विधीचें. ॥ ५३

देखे दुरूनी खळ भव्य रामा; 'आली' म्हणे 'दिव्य मॅनोभिरामा.' ।
उठोनियां कुश्चळ अंगना हो, म्हणे, 'प्रिये! तूं मम अंगना हो. ॥ ५४

पाहाया नेत्र तुला भिकारी, मी दास आतां मज अंगिकारीं; ।
घालीं निजांगीं नग फार शाला; नेसें चिराटा किं असें कशाला? ॥ ५५

समग्र ही वैभव मद्गृहीचें भोगीं सुखें; वांक्य दुराग्रहीचें ।
टाकोनियां ये मम आसनासी; होऊं नको हो! मम आंसनाशी. ॥ ५६

कृपा करोनी निजकिंकराचा ऐसें मला मानि हिमा कराचा ।
कांती तुझ्या आननचांदनीची करी न रविभा शतचांद नीची. ॥ ५७

जोडा तुझा योग्य मला विधीनें निर्माण केला गुणवारिधीनें; ।
आतां मनीं संशय व्यर्थ सांगे. धरूं नको हेतु यथार्थ सांगें. ॥ ५८

तुझ्या प्राप्त होतांचि दंतच्छदासी; गृहींच्या वधू सर्वही तुच्छ दासी; ।
मला तेधवां टाक गे! संगयेवूं पती मीच जाणोनि सारांश ये तूं.' ॥ ५९

---

१. गळगती. २. हे कमलनयने. ३. माझी वाणी. ४. स्त्री. ५. सत्वर. ६. सोनें. ७. दैव. ८. स्त्री. ९. मनोहर. १०. आशेचा भंग करणारी. ११. सेवक. १२. सागर. १३. ओंठाला.

संपूर्ण चंद्र कळिसा चमके नभीं ते तैशी सती द्रुपदि देखुनियां उभी ते, ।
'ये मंचकीं' म्हणुनि संनिध हात नेला, तेव्हां वदे द्रुपदि, 'भोगिसि यातनेला. ६०

जरि असे हरिची वधु एकटी परम सुंदर दिव्य कृशा कटी; ।
वरिल जंबुक चावट काय रे? वदसि धिक् प्रसवे तुज माय रे! ॥ ६१

पतिव्रता मी परसावलीतें नेघें.' म्हणोनी सरसावली ते ।
निसटावया येथुनि सत्कुळाची बुंथी परी घेउनि दूकुळाची. ॥ ६२

'सत्वानिमित्त जरि या महि मान गेली माझी तथापि सहसा महिमा न गेली. ।
या व्यापिलें मज असे खळ दुर्गतीनें;' ऐसें वदोनि धरिला पळ मार्ग तीनें. ६३

मृगी जशी डावलि पारधीतें, पळे त्वरें तेंवि अपारधी ते. ।
धरी त्वरें तो खळ अंचळातें; निसटोनि गेली सति चंचळा ते. ॥ ६४

पळाली तेथूनी द्रुपदतनया अंबुजकरी
करीचाली चित्तें स्मरुनि हृदयीं देव निकरीं, ।
करी तेव्हांची तो कवण मज रक्षील अशिला?
शिळा चिंता झाली नरपतिवधू आज कुशिळा. ॥ ६५

जावें पतींसमिप ते तंव गुप्त भेषी; याकारणें त्वरित ये नृपतीसभेसी; ।
जेथें स्वधर्म बसला नरविक्रमी रे! वेगेंकरूनि सति तें स्थळ आक्रमी रे! ॥ ६६

तों धांवला खळ जवें करुनी धराया; राया! पितामहि तुझी जग उद्धराया ।
जे जन्मली महितळीं, तिजला कसा रे! सारे जनीं निरखिला च कृतांतसा रे! ॥ ६७

मग म्हणे द्रुपदीस कसा खळी, 'करितसें तुज बंधन सांखळी; ।
कवण सोडविता प्रभुराज गे! शरण सत्वर जाउनियां जगें.' ॥ ६८

वदोनि ऐसें मग पापराशी ताणी सतीला पद पापराशी; ।
तेणें पडे ते धरणीवरी रे! हें देखिलें ही धरणीधरीं रे! ॥ ६९

कच धरुनि सतीतें लोळवीलें धरा या,
तरिहि नृपति कोणी हात त्याचा धराया ।
सहज हि उठला ना; मत्स्य ही स्तब्ध मानें;
म्हणति, 'कठिण केलें कर्म या आधमानें.' ॥ ७०

झाला आकांत करिराजगतीवरी रे! तेव्हां अनर्थ नृपती! जगतीवरी रे! ।
राजांगनादिजन सर्व खळाळिले ते; धिक्कारिती सकळ दुष्ट खळा लिले ते. ॥ ७१

---

१. सिंहाची. २. कोल्हा. ३. वस्त्राची. ४. बुद्धिमती. ५. कमलहस्ता. ६. गजगती. ७. राजाची स्त्री. ८. यम. ९. राजानें. १०. केश. ११. गजगामिनीवर.

कच धरुनि कुचा जों स्पर्शणारा कुचाळी
रविदुत तंव वेगें हस्तघातें कुचाळी. ।
अदळुनि घडला त्या या महीपात कीं रे !
वमित रगत सारें या मही पातकी रे ! ॥ ७२

पाहूनी बहु लाजला नृपतिची सारी सभामंडळी
झाला सावध तो खळी मदबळी जो भ्रष्ट भूमंडळीं; ।
तेव्हां सर्व तटस्थ हस्तकमळें जोडोनि रायाकडे
मंत्री आदि समग्र ही निरखिती; कोणी न ये याकडे. ॥ ७३

तटस्थ झाली अवघी सभा रे ! कोणी न बोले क्षितिवल्लभा रे ! ।
आला सभे तो नृप सव्य भागीं; बैसे दुरात्मा नरका विभागी. ॥ ७४

ताडिली सति खळें पदतीक्ष्णें. सावधान उठली नृपती क्षणें. ।
पाहुनी नृपसभा कमळेक्षणी शोकयुक्त उठली शुभलक्षणी. ॥ ७५

'गांजितां मज खळाधम नाहो; भूपती जन करीत मना हो ! ।
कोण मी मज गती असली कां ? श्रीदशा मजवरी रुसली कां ?' ॥ ७६

चुकुर कुरुकुळींची भामिनी तेधवां रे !
चिकुर निज शिरींचे बांधुनी ते धवां रे ! ।
निरखित नयनाब्जीं कीं, 'अशा या आकांतीं
कठिण मन कराया योग्यता काय कांतीं ?' ॥ ७७

करें झाडिले भार त्या कुंतळांचे; बहू माखळे जे तया मंगळाचे; ।
बिदीर्ष्या मळें ताडितां बा खळानें, तया दुष्ट चांडाळशा निःखळानें. ॥ ७८

दुकुल कुलवती ते सांवरोनी करानें,
रडत बहुत राया ! द्रौपदी नीकरानें ।
कठिणतर धवांतें बोलिली तेजराशी
सकळकुळवधूंच्या माजि ते तेजरासी. ॥ ७९

कृष्णा कृष्णकची शचीसम जिची विद्युत्प्रभा देविची;
साची भारतिची तिची करि निची लावण्यतेची विंची; ।
काची नाशुचि सर्वदा खळपदा मंदावली तेधवां
'धांवाधांव करा' म्हणे निज धवां आणी सख्या माधवा. ॥ ८०

---

१. राजाला. २. स्त्री. ३. केश. ४. रस्ता. ५. वस्त्र. ६. पतींना. ७. लहरी, लाट.

बोले पंकजलोचनी सुवचनी राया! नृपाला कशी,
'मेला दुर्मद मातला उलथला दे कां अशी भाकसी; ।
न्यायाचा उदधी[1] स्वधर्म अवघी दृष्टीस त्वां देखिलें
पाप्यानें मज ताडिलें क्षितितळीं रक्तें मुखा माखिलें. ॥ ८१
न दंड देशी खळ पामरा या राया! तरी दे मजला मराया. ।
आज्ञा वृथा कां खळ गांजितो हा? हा काळ मेला कइसा जितो हा. ॥ ८२
याच्या समान नर ज्या महिमा तगे रे! तेथें कशी नरपतीमहिमा तगे रे! ।
तूंही कसा करुनि खालतिं मान राया! ना दंडिसी च असुगी अधमा नरा या! ॥ ८३
महीपती अंश रमाधवाचे[2] याचे जयांचे जन मोघ[3] वाचे ।
वाचस्पतीसे[4] नृपती निधीचे धीचे बरे ठेविति संनिधीचे. ॥ ८४
राया खरा राज न ओकसा हा, साहा मयाचा तुज ओक साहा ।
वाटे बरा संनिध राहवाया; वायां तुला कीं जन दाह या या. ॥ ८५
मी एकली म्हणुनि काय धरी मला हा? लाहान माणुस खरासम[5] मोहला हा; ।
लाहावया मज अशा परनायकेला[6], केला प्रमाद[7] कइ लागल हा भिकेला? ॥ ८६
उस्त्रावधीतुल्य कसाब हा रे! पापी सभेलागिं कसा वहा रे! ।
समग्रही काय उगेचि राया! सांगे निशस्त्री अवघे त्विरा या.' ॥ ८७
ऐशापरी देखुनि तीव्रतेची ते चित्तवृत्तीच्च पतिव्रतेची, ।
तेव्हां वदे भूपति तो सतीला तिला कसें दुर्भय कांप तीला. ॥ ८८
'कां हो! बोलसि दुष्ट नष्ट रव तूं निर्दुष्टचित्तास त्या
नाहीं वाक्य कठोर आणित मुखीं संतुष्टचित्तास त्या; ।
नेणों साच मनांतलें तव भलें हा कां धरापास ये;
जाणा अंतरिं योग्य नाहिं तुज हे निंदा कराया सये! ॥ ८९
संकेत पूर्व नसतां तरुणीकरासी कोणी तरी धरिल काय गुणैकराशी? ।
आतां बरें निज मनीं समजोनि जागे! संतुष्ट होउनि मनांत रिझोनि जा गे! ॥ ९०
कळेना स्त्रियांची कदा मावलीला,' असा शब्द राया! तुझ्या मौंवलीला ।
वदे भूपती जो तया कीचकाचा सदा दर्प भावी स्वमानींच काचा. ॥ ९१
ऐकोनि बाहुजगिरा[11] निज दूषणाची शोकस्थ ते कुळवधू कुरुभूषणाची ।
त्या राजया रव भली वदली कशी रे! जो क्षिप्र[12] मोह मनपंकज[13] वीकसी रे! ९२

---

१. सागर. २. विष्णूचे. ३. व्यर्थ. ४. बृहस्पतीसारखे. ५. गाढवासारखा. ६. परकीला. ७. चूक. ८. शब्द. ९. कपट. १०. पणजीला. ११. राजाचें भाषण. १२. सत्वर. १३. कमळ.

'तूं शब्द सत्य वदसी न खरा खुनी रे हा पापवंत जन नित्य खरा खुनी रे ! ।
हें योग्य काय तुजशा नृपती भल्याला मोडोनि दीन धरणें मद भूलल्याला. ९३

दीना जना निर्मळ लोकराया राया कुलोद्धार कलौ कराया ।
निर्माण केलें विधिनें तुला हो ! कीं तुल्य गूणीं महिमा न लाहो. ॥ ९४

मी दीन, पाळक मला नृप तूं खरा जी ! रक्षूनि हो ! नृप खरा जन सर्व राजी. ।
राजीवलोचनि बरा परमानिनीचा पाहोनि घात करिसी बहु मान नीचा. ॥ ९५

आतां यथार्थ करिसी खळसागरा या राया ! न दंड तरि मी सहसा गेरा या ।
घेऊनि सत्य त्यजितें निज जीवनासी; नाशील त्यासहि पुढें जगजीवनाशी.' ९६

'तूं बोलसी शब्द सुधारसाचा; हाही मला मित्र उदार साचा.।
तथापि तूझ्या मनरक्षणासी सांगेन तूं जाय सुलक्षणासी.' ॥ ९७

ऐकोनि वाणी जगतीपतीची तीची कळा मंदलि कंपतीची. ।
संतप्त कांतावर सावली ते संकेत बोलों सरसावली ते. ॥ ९८

'अभीमानी मानी परम रणदानीं सरस रे !
सरे त्यासीं युद्धा कवण नर शुद्धा न रस रे ! ।
सरे जे इंद्राच्या सबळ पति ऐसे मज न जी
न जीवें रक्षीती तरि मग महा हीन जन जी ! ॥ ९९

धिःकार त्यांच्या बळगौरवा हो; वाहोनि लज्जा खर रौरवा हो. ।
जे योग्य त्याला असती जनींची नीची क्रिया सारुनि भोजनींची. ॥ १००

कां दैन्य आलें प्रतिपंच सारें हा काळ कैसा पति पंच सारें ।
पाहोनि ही जे बहु दीनवाणी झाली जयां मी बहु दीन वानीं. ॥ १०१

खरे षंढ झाले पती आज गा रे ! जयांचा सदा धाक दोंतीं जगा रे. ।
सदा राखिती जे मला पांच राया ! पशू आज गेलेच ते पां चराया.' ॥ १०२

लज्जावती फार सती तथापी बोलोनि ऐसें निज शोक थापी; ।
तेव्हां नृपा ! बल्लव भीम ही तो होता तुझा नाथ पितामहा तो. ॥ १०३

संतप्त कांती जंव विंगळांची दावीतसे लोचन मंगळाची; ।
ते द्रौपदी पाहुनि धर्मराया म्हणे, 'बुडाला पतिधर्म राया !' ॥ १०४

तो कोपला देखुनि भीम भावें संकेत बोले मग भीमभावें. ।
निवारिलें त्या समयास राया ! आली दशा हे जवळी सराया. ॥ १०५

---

१. परस्त्रीचा. २. विष. ३. निखाऱ्यांची. ४. मंगळ ग्रहाचा तारा फार लाल आहे.

‘पतिव्रताचें जरि ही न वाचे तरी न निंदी पतिहीन बाचें; ।
तूं बोलसी शब्द विचार नीचे ! ते योग्य सारे व्यभिचारिणीचे. ॥ १०६
जेव्हां पतीचे गुणदोष वांची, तेव्हां तिला स्पष्ट कळा शवाची; ।
पतिव्रतेला सुकसीं कशीतो भर्तार तूं हो सुकशी कशी तों? ॥ १०७
हे आपदा काय तुलाच नारी! पाहे वधू विंशतिलोचनारी ।
बोलोनियां दुःसह वासना ना निंदी कदा ही कपि आस नाना. ॥ १०८
पतिव्रता तूं बहु सुंदरा गे ! रागें कशी बोलसि मंद रागे; ।
पती आहेत ते तव आसपासी जे गुंतले दुर्जन आसपाशीं. ॥ १०९
कांहीं प्रमाणांतिल दीन जाया ते पाहती दृष्टिस दीन जाया; ।
न त्या वृथा शब्दशरांस हाणीं, येते तुझ्या शीळधरास हाणी. ॥ ११०
जा येथुनी ते नृपती सभागे म्हणेल कीं हा नृपती सभा गे ! ।
बोलोनि कैशी प्रबळा बळा हे बाहेर घाला अबळा बळां हे.’ ॥ १११
ऐकोनियां श्रोत्रि पतीमुखींची वाणी, सती रात्रिपतीमुखीची ।
रडे बहू लोचनिं नीरं वाहे; म्हणे, ‘कसा होइल नीरवाहें. ॥ ११२
हें दुःख आतां कइशा रितीनें लोटूं?’ म्हणे फार इशारतीनें; ।
धर्माप्रती ते द्रुपदी सती रे! जे सर्वदा शीळनदीस तीरे. ॥ ११३
‘भर्तार पांच मजलागुनि जे वयां रे ! पण्यांगणत्व सहजीं मज तेधवां रे ! ।
तूं सांगशी सकळ सत्कुळधर्म राया ! संनीध बैसुनि खराप्रकरें मराया ! ॥ ११४
काचा बळाचा पति एकला जी ! तिला अशी काष्ट न ये कळा जी. ।
माझे पती पांच समर्थ राया ! ते आसतां गोष्ट अली धरा या.’ ॥ ११५
सती म्हणे, ‘मी करूं काय वो ! कीं?’ तेव्हां म्हणे, धर्म ‘तुं जाय ओकीं ।
रायाचिया निर्भय मानसानें; पतीभयें दुर्बळ मान सानें.’ ॥ ११६
द्रौपदी म्हणे, ‘थोर वार वा वदतसें तरी घोर वार वा; ।
खरपतीस दुर्मार मारवा, नातरी तुम्ही जाल रौरवां. ॥ ११७
अनंग जा पाहुनि जीस भाते टाकोनि तेव्हां नृपतीसभा ते ।
गेली सती मंदगती घरासी मत्स्याचिया तेज अमोघराशी. ॥ ११८
पाहे सुदेष्णा दुरुनी सतीसी चित्तीं बहू दुःखित भास तीसी; ।
म्हणे, ‘सती निर्मळ मानसाची हे पावलीसे अपमान साची. ॥ ११९

१. बोले. २. रावणशत्रु राम. ३. जवळ, समीप. ४. बाणाण. ५. कानांनीं. ६. चंद्रवदनेची. ७. अश्रु. ८. वारिणील. ९. घरांत. १०. नरकविशेष.

संपूर्ण चंद्रनयनी नयनीं जळाला नाहीं मिती कवण दुःख तुला जळाला ।
देणार तो सकळ सत्यच सांग माया पाहोनि तूज उठली मनिं आग माया. १२०
कंठीरवा कटकटा करि धाकुटी का मद्वंधु दुर्मद इला बहुधा कुटी कां? ।
'घे साजणी!' म्हणुनि आळवि राजजाया, 'आतां न सांगन परागृहिं तूज जाया. १२१
सांगें समग्र कथला तुजसी बळानें केला कसा परम दुर्मद ओंगळानें? ।
होईल तो निरस या बहु साजणी गे! दुश्चित्त चित्त न करीं बहु साजणी गे!॥ १२२
दिले क्लेश जे ब्रह्म अंडांत माती न माते! पडो त्यास तोंडांत माती. ।
बहू बोलिला दुष्ट लाखोनलाखा कदा श्रीहरि त्या न राखो न लाखा.'॥ १२३
'बहू पाहिले राजराजांगना ही परी नीति कोठें अशी भंग नाहीं; ।
तुम्हीं धाडिलें जाणुनी कां मला हो! तया दुर्जना धावया कामलाहो.॥ १२४
नाहींत काय नर फार भराबळाचे? कोणी तरी धरिल हस्त पैराबळांचे? ।
केल्या असें कठिण कर्म न वाजवी तो व्हावा तया नृप अजीत न वाजवी तो.'॥ १२५
समाधान केलें जरी भूपतीच्या वधूनें, तरी जाइना कोप तीचा; ।
मनींची उगी बैसली खिन्न पौणी न सेवी सती सर्वथा अन्नपाणी. ॥ १२६
अशी शोकसंतापराशी शिवाया जगांतील चित्तें पराशीं शिवा या ।
नसे योग्य ती बैसली एकटी रे! जिला कृष्ण मानी बहिण धाकुटी रे!॥ १२७
ऐशापरी कुरुमणीरमणी उदारा शोकाकुळींत बसली बहु ते सुदारा; ।
नेघेचि अन्न जळ स्वल्प न सर्वथा रे! मानी मनांत निज जीवन ते वृथा रे!॥ १२८
अली रात जों दोन यामास राया! नये नीज तों धर्मवामेस राया!।
म्हणे, 'दुःख नाशावया हें असेना बळी या घडीवीण त्या भीमसेना.'॥ १२९
चालिली पतीभीमजीकडे लपत फारशी शीघ्र तीकडे; ।
जातसे बहू तांतडी तशी झळकली कशी ती तैडीतशी. ॥ १३०
'त्यजीं निद्रा भद्रा! उठ गुणसमुद्रा! नरपती!
पती तूझ्या ऐसा असुनि फिरतें मी विलंपती; ।
पतीतानें नेली सकळ वधुलज्जा तव खरी,
खैरीपुत्राचा त्या वध करिं महाशस्त्र खसरी. ॥ १३१
पती बळी त्यांत हि भीमजी तो असोनियां तो खळ भीम जीतो. ।
अद्यापि हेची मज चित्र मानें कां निर्जिवी मत्पति चित्र माने.' ॥ १३२

१. सिंह. २. हे सखे. ३. इष्टलाभ. ४. परस्त्रियांचे. ५. हस्त. ६. पांडवपत्नी. ७. प्रहर. ८. धर्माची द्रौपदी हला. ९. विद्युल्लतेसारखी. १०. विलाप करणारी. ११. गाढवीच्या पुत्राचा.

ऐकतां असें जो तिचा पती ऊठला जसा जोतिचा पती; ।
म्हणत, 'चंद्रमा तव सखे! देही शाहतां मना बहुत खेद ही. ॥ १३३
दुष्ट शोक हा सर्व हाक हा जाण वोक हा मान वोक हा; ।
नष्ट दीन हे बहुत दीन हे सुखनदी न हे ही नदीन हे.' ॥ १३४
ऐकोनि वाणी निजनायकाची काची मती जीस न वायकांची; ।
ते द्रौपदी बोललि वाक्य भीमा; भी मानसीं जे खळमत्त भीमा. ॥ १३५
म्हणे, 'भीमा! धर्मादिक तंव खरे लाज त्यजिती;
जिती दीना मानें सकळ जनमान्यांत फजिती; ।
जितेंद्री मी ऐसें म्हणति यतिवेषास धरितां
रिता झाला लज्जेविण सकळ तो सौख्य भरिता. ॥ १३६
भिमा! धर्मानें या मज सकळ केली अवकळा;
कळा कांती गेली मजवरि असे पाश कवळा; ।
कैळानाथा ऐसे सरस तुम्हि सारे विबुध रे!
धरेचे स्वामी त्यां जन म्हणति दीन अबुध रे! ॥ १३७
कसें खेळोनीयां घर बुडविलें धर्मतनयें?
नये दुःखाची हे क्रिति तरि करूं सांग विनयें? ।
नये बोलों कांहीं मन कमळ धीरें विकसिजे;
सिजे जो मर्यादारस तव महा नम्र असिजे. ॥ १३८
अशी कोण भोगील रे भोग राजा? बरें सेवणें उग्र संभोग राजा; ।
धरी कंठदेशीं तशा सारख्याला; परि त्रासला जीव संसारख्याला. ॥ १३९
शतशतगजलक्षा घोटकांच्या वैळीसी
निजकरकमळें तूं एकला आंवळीसी; ।
हरिसि मद समस्तां नाटक्या कां बळ्यांचे,
धरिसि वसन तें तूं फाटक्या कांबळ्याचें. ॥ १४०
जो काळखंज करि निर्जिव तो रणीं रे! देवेंद्रपट्टण विराजवि तोरणीं रे! ।
तो पार्थ सांडुनि कशी रसनाचवी रे! राजात्मजा गुणसुधारस नाचवी रे! १४१
नकुलकुल रिपूंचें शासणारा भला हो!
सकळ यश जयाचें सर्वदा लाभ लाहो; ।

१. मुखशोभा. २. झाली. ३. चंद्रासारखे कांतिमान्. ४. शहाणे. ५. संसारसुखाला. ६. घोड्यांच्या. ७. पेलीला. ८. राक्षसविशेष. ९. इंद्राची अमरावती नगरी. १०. धनुष्यांमोडी.

कवण शर तयाचा साह्या पाहयाचा;
वळि करि च असा तो घे ह्या साह्याचा. ॥ १४२
पांचांत जो केवळ धाकटा रे! बोले जशी दिव्य सुधा कटा रे! ।
तो कीं बळी गोधनबांधण्याच्या दोऱ्या धरी त्या जगती धण्याच्या. ॥ १४३
जाऊनियीं तुम्हि समग्रहि खंडखंडीं, खंडोनि शत्रु अणिली बहु खंड खंडी. ।
रत्नें वळी असति ज्यांत नवा रितीच्या, दे भूषणा सकळ चामरवारितीच्या. ॥
केला जई तुम्हि महामख राजकी रे! संतोष दृष्टि दम हा मखराज कीं रे! ।
तेव्हां मला सुखरणी जगतीतलीं या हे धन्य एक म्हणती जगतींतलीया.॥ १४५
तूं याचकां धन सुवर्ण उदार देशी; तेव्हां विराटनृपसे बहु दारदेशीं ।
ते तिष्ठती परि न मार्ग फुटे धंसाया; जातां बळें म्हणसि, 'काढुनि द्या धंसा या.'॥
सुदेष्णा अशा दासिका लक्ष नारी मला ज्या उभ्या सर्वदा लक्षनारी. ।
सदा घालिती वींजणा सारसाक्षी न दे काय त्वच्चित्त कां सारसाक्षी? १४७
नगाचे परी ढीग हेमी नगा रे! नगारिस्नुषा काय हे मी न गारे. ।
दिले याचकां धर्म धर्में महा हा कसा काळ दुर्वृत्त आला अहाहा! ॥ १४८
मयें निर्मिली त्या सभाअंगणाच्या मधें चांदवा स्वच्छ तारागणांचा; ।
हरी भाउ भा श्रीहरी त्यांत राजे वदे मात जे श्रीहरी त्यांत राजे. ॥ १४९
गजांचे थवे धेनुका लक्ष पांच, बहू रुक्म हीरेकण्या शुद्ध पाच, ।
द्विजां घालवी सत्करें दानवारी उभा राहुनी सोयरा दानवारी. ॥ १५०
त्या वैभवाची गणना कराया सामर्थ्य दृष्टी गण नाकराया ।
नाहीं असें धर्मचि एकदां रे! गमाउनी हिंडवि लोकदारें. ॥ १५१
या धर्मरायाकरितां कसे रे! सारे तुम्हीं मी करुं शोक सारे? ।
सारे धरुनी बुडवा उदारा दारा परा लावुनि भाउ दारा.' ॥ १५२
ऐकोनि ऐसा रव खष्ट तीचा त्या द्रौपदी दुर्धर कष्टतीचा. ।
म्हणे, 'जरी बोलसि सार साचें न योग्य कीं लोचनसारसाचे. ॥ १५३
हा धर्म केवळ सखे मननिर्मळाचा याला कलंक सहसा न गिरामळाचा; ।
लावीं कसा निशिदिनीं हरि पूजितो गे! मोहा मदा त्यजुनियां परिपूजि तो गे! ॥
प्रपंचाप्रपंचीं सुखीं कां असेना स्वरूपांत तो आठवीतां दिसेना; ।
दिसे पंचभेदें तया इंद्रियासी प्रपंचींच पाहे निराळा तयासी. ॥ १५५

१. शिराया. २. दांडग्या मनुष्याला. ३. वारा. ४. इंद्राची सून द्रौपदी. ५. सोनें. ६. दैत्यशत्रु कृष्ण. ७. स्वर्गस्वामी इंद्र.

सत्वानिमित्त धरि मौनचि तो भला गे! दैवें तुला पति ममाग्रज लाभला गे! ।
हें सर्वही विभव राजित हारवी गे! आतां तथापि नृपलोचन हा रवी गे!॥ १५६
पाहोनियां काय तुला तयाला संतोष वाटे जगतांत याला ।
परंतु हा काळ असाचि आहे क्लेशाग्निचा भोगवि साच आहे. ॥ १५७
महावंशीं झाले भजुनि हरि झाले नरपती
पती माचा साचा रिपु शरण त्राचा च जपती; ।
पती तैशा जाया चतुर उमजाया निजकळा
कळावंता भाचा विषम दिवसाचा न विकळा. ॥ १५८
तूं दीससी सहपती अवमाननीसी हे टाकली परम तूं वरमाननीसी ।
आला प्रभाव सुख कीं रणदाव याचा आतां न काळ अशि गोष्ट वदावयाचा. ॥
सेवूनियां धीर सुधारसा हे साहोनियां काळ असार साहे. ।
साहों असा एक विचार शीळे शीळे न धीचे प्रिय चारुशीळे!' ॥ १६०
म्हणे भीमा कृष्णा, 'वदसि परमा वाक्यसरसा
रसाळा वाणीनें सुखकर सदा चित्तसरसा ।
रसानीकी सानी विषम दिवसा निःखळ कशी
कशी सत्वा यावें वदुनि सुखरत्नीं झळकसी? ॥ १६१
आधार नाहिं मज साच रती पतीचा, नाहीं सखा जवळि तात रतीपतीचा,[2] ।
कोणा करें करुनि मारवुं कीचकासी? नाविक्रमी पति म्हणोनि मि याचकासी. ॥
भीमा! तुझा भरंवसा मज फारसा रे! सारे[3] पतींत मम मानस सार सारें; ।
तो आज सर्वहि मला कळला उदारा! दारा तुझी रडत हिंडत दारदारा.॥ १६३
करें माझ्या केशा कपटि नरकेशासम धरी;
धरित्रीनाथाची वधु मज कसा दीर्घ अधरी? ।
कसाबा चांडाळा सकळ वर तो निःखळ खळा;'
खळाळोनी सांगे रडत बहु तेव्हां खळखळां. ॥ १६४
'निःशंक मी आजि न भीमराया! न मारितां त्या खळा भीं मराया; ।
ठेवा तुम्ही सत्व समग्र ही रे! राखोनियां दुष्ट दुराग्रही रे!' ॥ १६५
धरूनी करीं भीम तेव्हां सतीला बरा बैसवी त्या मंडी स्वस्तीला; ।
म्हणे, 'निश्चयीं मारितों पापराशी तुला मारिलें ज्या खळें पापराशी.॥ १६६

---

१. द्रौपदी. २. मदनाचा तात कृष्ण, ३. मर्यादा.

धरीं धीर हो पांच सा चार दीना, अम्हीं तोंवरी पांच साचार दीना; ।
पुढें पाहसी आमुच्या विक्रमासी; तुंही भोगिसी श्रीकळा विक्रमासी. ॥ १६७
करीन मी कीचकपात कीं या भूमंडळीं तोंवरि पातकी या; ।
ऐसें मला जाण उदारधींची तूं वेल कीं सद्गुणवारिधीची. ॥ १६८
जे सेवितों तो कण अंबु जांची; हे आण तूझ्या वदनांबुजाची;' ।
म्हणे, 'धरीं स्वल्पचि धीर' तीला; त्या द्रौपदी सद्गुणभारतीला. ॥ १६९
'करीं खळा दुष्कर मार मारी; न मी तरी दुर्धर मार मारीं; ।
त्याच्या पदाची मज आण साची; तूं जाण हो! लोचनसारसाची.' ॥ १७०
समाधान केलें तरीं सारसाक्षी म्हणे सर्वदा चित्त कासारसाक्षी; ।
'मला देइना माझिया कां पती रे! खळा आठवीतां तनू कांपती रे!' ॥ १७१
जरी शांतवीली बहुतांपरी ती न सोडी तरी शोककसंतापरीती; ।
न मारा खळालागिं तों मी न जेंवी; नदी शुष्क तीमाजि तो मीन जेवीं.' ॥ १७२
रामानुज प्रिय जिच्या पतितें पतीतें हे गांजिली परम कीं पततेपतीते; ।
जाणोनि भीम खळ निश्चय मारण्याची पैजा करी सतत जो हरि मारण्याची. ॥
'भीमा! अग्रज जो तुला, पति मला, त्या पाइंची जाण रे!
पार्थादी अवघे पती मम तिघे, त्यांची खरी आण रे! ।
मारायास खरा खराधमकुळा त्या दुर्मदा ओंगळा
कांहीं धीर धरा जरी तरि खरा हा कापिला मद्गळा.' ॥ १७४
बोले भीम, 'न भीं नैंवांबुजमुखे! मारीन त्याला नखें;
राहें फार सुखें मम प्रियसखे! तूं जीवनासारिखे! ।
आतां यत्न कथीन साच चतुरे! तूं साज हो साजणी!
जेणें होतिल दुर्मद प्रियवधू साऱ्या अकेशा जनीं. ॥ १७५
बाह्यरंग अवघा न खरा गे! अंतरीं परमधा न खरा गे! ।
जाणुनी वद तया न खरा गे! ज्यांत भाव परि तो न खरा गे! ॥ १७६
बरा बोल तो बोल त्या मोहवी तो; तया हस्त अग्नींत हो! दाहवीं तो; ।
पतींच्या भया वारिल्या सर्वथा रे! तुझी वासना या मनीं सर्व थारे. ॥ १७७
असा बोल बोलोनियां त्या खळासी, बरी बांधि हो! मोहनी शृंखळासी; ।
करीं चित्रशाळेंत संकेत रातीं निजायास, तेव्हां वधीतों अरातीं.' ॥ १७८

१. समुद्राची. २. कमळाची. ३. कमळनेत्री द्रौपदी. ४. सरोवर. ५. मासा. ६. बळरामाचा धाकटा भाऊ कृष्ण. ७. कमलवदन. ८. गादवाला. ९. शत्रु.

त्यानंतरें नृपति ! पाहुनि संधि सारे, [१] भेटली भरतसुंदरि त्या धैसा रे ! ।
अपांक्त तो निरखि नेत्र अपांग देशीं; [२]तीचा पती धरि रणांतकपांगदेशी. ॥ १७९
जरी नेत्रपक्षीं न ले काजळाला; तरी पाहतां तीव्र तो कां जळाला; ।
स्वरूपें जशी श्रीच कीं पंकजाक्षी; मनीं कीं अशी हे मला ये न लक्षी.॥ १८०

हांसें साच असेंच कल्पुनि मनीं; भावार्थही त्याकडे
चाले मंदगती पवित्र जगती, पाहे खळा बांकडें; ।
तेव्हां तो बहुमानसीं कुसुमुसी कींही अशी कामिनी
भोगावी बहु सानुकूळ करुनी, प्रत्यक्ष सौदामिनी. ॥ १८१

'आतां बोल सखे ! न खेद धरिं हो ! गेल्या दिसाचा, कसा
पाहूनी तुज जीव हा भ्रमतसे कुँल्लालमृच्चाकसा; ।
नाहे वास सुवास मंद तनुचे बाणे तुला साजणी !
कांतांचें भय नाधरीं मज वरीं दावीं तमासा जनीं.' ॥ १८२

पुन्हां हांसुनी बोलली ओंगळाला, 'जरी एक संदेह माझा गळाला, ।
तरी हो सुखें तूजला कामना रे ! करी कोण तेव्हां भला काम ना रे!॥ १८३
माझे पती परम दुर्धर पांच ही रे! जे गुंफिले गुणिं विराजित पांच हीरे; ।
ऐसे अखंडित महाजन हार लेती, ते झुंजुनी जरि तुवां नर हारिलेती; ॥ १८४
तेव्हां समग्र तव कामन कामना हो; त्यावीण होशिल मनीं मनकामना हो! ।
वाटे मला निरस त्यांसह झुंजण्या तूं, नारीमना चतुर मानस रंजण्या तूं.'॥ १८५
वदे ऐकुनी शब्द तीचा कसा बा खरीचा खरा कीं उणा ना कसावा; ।
'अहा टाकिं निःशेष, कांताभयाचा वृथा वाढलाहे मनीं कोंभ याचा. १८६
पती पांच कीं पांचशें सांग साचे करें खंडितों, जेंवि कां मुंगसाचे ।
मुखीं नासती सर्पपंक्ति क्षणानें, तसे भंगितों त्यांस मीं ईक्षणानें.' ॥ १८७
मग म्हणे सति सुंदर मानसा, 'परम उत्तम रे! मम मानसा ।
दिससि, सांग न यत्न तसाच रे! करुनि, दाखविं सर्वहि साच रे! ॥ १८८
पतींच्या भयें भीतसें फार मी रे! जशी नारसिंहास ते का रमी रे! ।
बहू राखिती तासतासीं क्षिती रे! मला हात लावी, तयासी क्षती रे! १८९
अंगीं असे बळ, तरी करिं कामना ही; त्या वेगळें निरस बोलुन काम नाहीं; ।
रात्रीस येइन तुझ्या जवळी, गुजा या मी सांगतें तुज अखंडित रे! निजाया.' १९०

---

१. भरतवंशांतील जे पांडव त्यांची स्त्री द्रौपदी. २. मूर्खाला. ३. वीस. ४. कुंभाराच्या चाकासारखा. ५. दृष्टीनें. ६. नाश. ७. इच्छा.

ऐकोनि शब्द अइसा सतिभारतीचा, अ नंदला मनुज क्षुल्लकसा रतीचा; ।
जेणें तिचा वचनभाव खरीपिता तो; स स्विही सतिपदीं जिव अर्पितां तो. १९१

'बृहन्नळानर्तनचित्रशाळा आहे बरी सुंदर ते विशाळा; ।
एकांत तो ठाव तुला निजाया; अखंड की जाण अशा निजा या.' ॥१९२

जळावीण ना जेंवि तो मीन राहे; तसा जीव संसारकामीं न राहे; ।
वियोगें तुझ्या सारसाक्षी! मला ही करी तप्त संतप्त हा काम लाही. ॥ १९३

सौदामिनीपरिस ती दिसती बरी रे! आहे जरी नरपती मलिनांबरी रे!' ।
ते द्रौपदी नृपवरा! त्यजुनी अभद्रा यें, तों पथीं गवसला वरि जो सुभद्रा. १९४

'राजे देशपती महान्नरपती गोपीपती गोपती
क्षोणीचक्रपती विराटनृपती ज्या संनिधीं भूपती; ।
तो हा अर्जुन लेंकरें निजकरें बा नाचवी त्यांसवें
येतो केवळ दीनदीनपतिसा हें दुःख ना सोसवे.' ॥ १९५

बृहन्नळा तें अइसी उदारा पाहोनि बोले मग तीस दारा; ।
ती कीचकी वेळ गती कशी मा अद्यापि दैवास कशी कशी मा. ॥ १९६

'कां गे! श्रीहरि भागला? उबगला? कोठें सखा गुंतला?
मेला कीचक भंगला, रगडला, माझ्या धरी कुंतला; ।
मारोनी मज लात हात बैसना घाली शुनीतात गे!
ऐसें दुःख विचित्र भागुनि जिवें केंवी वेनीता तगे? ॥' १९७

'बृहन्नळे! मत्पति लाजराहे; मी राखिल्या सन्मति लाज राहे; ।
न सुचतें काय करूं? अशाला सोसूं तरी सांग किती कसाला?' ॥ १९८

'ऐकें विख्यातशीळे! गजगति! विमळे बौलमार्तंडभाचे!
वाचे ऐश्वर्य नाचे, तव वपु सदनीं या जगीं दुर्लभाचे; ।
केलें जें दुष्ट चित्तें तुजवरि उचितें! की असा काळ जाया
आला आहे अशाला कठिण, तरि करीं फारसे काळजा या. ॥ १९९

बृहन्नळा जो नर सव्यसाची, सांगे तया मात सुधारसाची; ।
वाणी जिची ते खळजीव नाशी, जें योजिलें तें निज जीवनाशी. ॥ २००

---

१. पतिव्रता द्रौपदी इच्या वाणीचा. २. गाढवीचा बाप म्ह० गाढव. ३. हे कमलनयने. ४. अकल्याणकारकाला. ५. श्री द्रौपदी. ६. केशाला. ७. बत्काला. ८. कुत्रीचा बाप म्ह० कुत्रा. ९. स्त्री. १०. कष्ट. ११. बालसूर्यासारखी कांति आहे जीची अशी.

दोघें असें बोलुनि स्वस्थळा हो! गेली नृपा! तूं मन स्वस्थ लाहो. ।
जें घे पुढें प्राप्त चरित्र त्याचें, तुझ्याचि त्तें श्रेष्ठपितापिल्याचें. ॥ २०१

गेली द्रौपदि सुंदरा नृपवरा! राजालयाला भली;
तो हा कीचक ओंगळा शवकळा जाला खरी लाभली; ।
पाहूनी निजसेव्य पैद्मनयनीसाठीं बहूशा नँगा
एकांतीं चिर पात्रती करि सती तो बुद्धिपाषाण गा! ॥ २०२

आयुष्यभानू निजपूर्व भाजे टाकावया सिद्ध असे उभा जे; ।
काळीं तसा कीचक हीत मानी, जो ओढिता मृत्युभरा तमानीं. ॥ २०३

होतां राति, अँराति येउनि निजे त्या चित्रशाळेंत रे!
त्याचा मृत्यु तसाच सैल्यपति तो निर्मीच माळांतरें. ।
पाहे चाट कपाट वाट सतिची तो दुर्मनी दांडगा;
तों ये भीम, न भी मदेंद्रपति जो टाकीत मादांड गा. ॥ २०४

घेऊनि संगीं द्रुपदी भलीला आला कसा पांडव ईभैलीला; ।
लेऊनि चीरें नग अंगना हो उभा खळासंनिध अंगनांहो. ॥ २०५

पाहे कीचक तीजला उमजला आली विशाळा भली;
नेणे मत्तमदांध कीं मरणिची हे दुर्दशा लाभली; ।
'ठेवीं कीं सुरतप्रसंगचतुरे! या मंचकीं विग्रेहा;
नाणीं कांहिं मनांत पूर्व करणी टाकीं समग्राग्रहा.' ॥ २०६

धरी हस्तपद्मास त्याच्या करानें, त्वरें भीम हाणी मुखीं नीकरानें; ।
म्हणे, 'घेतलें ऊसणें साच नारी! बरा किंतु चित्तांत तूं साचणारी.' ॥ २०७

पुन्हा हस्त जों लाविला त्या पैंतीतें, बळें ताडिलें मागुती दुर्मतीतें; ।
तरी दुष्ट दुर्बुद्धि, 'ये सुंदरी हो!' म्हणूनि बळें आळवी आदरें हो! ॥ २०८

विचारी मना भीम तेव्हां मनासी, 'वधोनी खळा पूरवूं कामनेसी ।
सती द्रौपदीची जिला वो गळानें वहू गांजिलें दुर्मदा ओंगळानें. ॥ २०९

मानें मानवती सती खरपतीतानें बळें गांजिली;
ओढोनी चिंकुंरा दिवाकर धरा तैशी बहू भाजिली; ।
तीचा वेढून सूड मूढमति हा मारीन एक्या क्षणीं;
याचें पाहुनि प्रेत हर्षित मनीं होईल दिव्यक्षणी.' ॥ २१०

१. पणजोबा अर्जुन यांचे. २. घर. ३. कमलनेत्री. ४. दागिने. ५. शत्रु. ६. ब्रह्मदेव. ७. हत्ती. ८. स्त्री. ९. नाथ. १०. शरीर. ११. पाप्यानें. १२. केश.

भीमें हस्तक ओढिला तंव ढिला आला पलंगातळा;
तेव्हां मंदगती खरी कुळपती जो दुर्मदें मातला; ।
जाणे कीं नवयौवनी कुचघनी नाहींच रामा[1] रिती;
'आमोली करपर्वतोपम कशी निःशंक हे मारिती?' ॥ २११
जशी आवडी ये पलंगीं निजाया पतीच्या करीं घेउनी पुष्प जाया; ।
तसा भीमही हस्तपद्मास आधीं समर्पूनियां, जागवी वीर्यबोधी. ॥ २१२
दोघे मत्त करी करें कर बळी बांधूनियां झुंजती;
पायींचे नग हालती, रुणझुणा भीमापदीं वाजती; ।
केलें एक मुहूर्त मर्दन करें, कोणी नसे आगळा;
तेव्हां भीम विचार सार करि कीं, 'मारूं बळें ओंगळा.' ॥ २१३
तेव्हां छायागतीचा कुरुगजपतिचा कीचकायु क्षयानें
मोडी गात्रें समस्तीं, विघडुनि सकळें इंद्रियें अक्षमानें; ।
गेला टाकोनि मूला भुलुनि मद भला किंशुकाच्या[2] फुलाला;
जैसा हो वर्ण तैसा खळपद सरला वाहवी रक्तलाला. ॥ २१४
खैळाशुद्ध[3] वोरी बहू पूर वाहे; म्हणे वल्लभेला, 'तुम्ही पूरवा हे ।
मनाचे मनोरे, पुढें कामना ज्या त्वरें लाभसी, चेतवीती मना ज्या.'॥ २१५
दोघांचे घटनी दिवा न सदनीं होता परी स्वल्पसा
अग्नी, त्यास दिव्हा नवा करुनियां दावी असद्रूपसा; ।
तो वैरी मृत प्रेत केतकितनूलागीं धरूनी करीं,
शत्रूचा कर शीर पाद उदरीं घालोनि गोळा करी. ॥ २१६
लावी हो! रक्त टीळा निरखुनि कुटिला जो धरी कुंतळाला;
'गेला कीं मत्त हेला, त्यजुनि निजकुळा, आणि या भूतळाला; ।
आतां वार्ता निवेदीं सकळ जन बिदी राजकी लेक जागे;
माझा अन्याय केला, ह्मणउनि वधिला मत्पतीं सांग जागे!' ॥ २१७
खळखळुनि शरीर धूतलें कौरवानें;
निजसदन प्रवेशे आपुल्या गौरवानें; ।
सुखनिधि धरि निद्रा भाव लोकांत राया!
कळवि सति जगीं तो थोर आकांत राया. ॥ २१८

१. स्त्री. २. पळसाच्या. ३. दुष्टाचें रक्त.

कृष्णा कृष्णनिशींत बाहिर उभी राहूनि सांगे कशी.
'मेला कीचक मत्पती निजवरें;' मारी अशी हाकशी; ।
तेव्हां सर्व जनीं ध्वनी अइकतां, थक्कीत दुःखीत ते;
राजा राजवधू सबंधु अवघे दुश्चीत भावीत ते. ॥ २१९
'मेला कसा ? सतत हस्तिसहस्र दाहा; दाहा करी निजबळाग्नित सर्वदा हा; ।
गंधर्वहस्तकमळीं अइसा बळाचा लाचावुनी रतिसुखा परमा बळाचा.' ॥ २२०
आले कीचकबंधु पंच शत या ठाया करी बाळसे;
पाहाया शवरूप अग्रज दिवे लावूनि भंबाळसे; ।
'गंधर्वींच खरा असा विर्टे कसा मारूनियां टाकिला;
नाहीं हस्तक पाद मस्तक महाक्रोधें बळी ठोकिला. ॥ २२१
झाली कां अइशी गती महिपती ज्वाळा सदा मानि ती;
सैरंध्रीस्तव दुर्गती धरि मती सांडोनि ते मा निती; ।
दामाची वधु लाभला, न दिधला आमोल हा जीव जी;
गेला टाकुनि हा कसा निजवपू साकार राजीव जी.' ॥ २२२
तेव्हां दुर्मद कीचकानुज बहू राया ! विलापांत रे !
झाले मग्न कृतघ्न पाहुनि शवा अत्यंत कोपांतरे; ।
ते भैामा कुरुवंशिची करिगची स्तंभापुढें आपुल्या;
झांकाया तनुतेज प्रांजळ तरी दीपप्रभा लोपल्या. ॥ २२३
देखे कीचक धाकटानुजकटाक्षानें तिला ओखटा;
धांवूनी धरिलें पटा, खटपटा ईलागिं कीं चोखटा; ।
'केल्या अग्रजमानसें सुमनसें पाहूनि वक्रास या;
नारीच्या तरि लाभली न अभली जातां जिवें कासया ? ॥ २२४
त्याचा हेत पुरे, अशीस अपुरें आयुष्य जेणें घडे,
दोघां एक जडे कळा न विघडे, ऐसें करूं रोकडें; ।
पाहूं गंधर्व आतां जगविति वैनिता दाउनी विक्रमासी;
कैसीं आम्हांपुढें ते सकळहि निरखूं आज शौर्यक्रमासी.' ॥ २२५
गारूडी जशि हस्तकीं धरुनियां नागीण ते नाचवी,
तैसा दुर्मद वेणि जे फणिविना तीची धरी ना चवी; ।

१. जार. २. कमर. ३. स्त्री.